# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ सोमवार २३ जून २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे १०




## पाऊले चालती दिवे घाटची वाट

आज २२ जून रोजी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे दिवे घाटातील डोळे दिपवणारे फोटो पालखी सासवडचा दिवेघाट पार करुन उद्या सासवडला पोहोचेल, २३ जूनचा पालखीचा मुक्काम सासवड येथे असणार असून २४ जून सासवड ते जेजुरी असा पालखीचा प्रवास असणार आहे. जेजुरी नगरीत पालखीवर भंडाऱ्याची उधळण होणार आहे.;

# अमेरिकेच्या हवाई हल्ल्यानंतर इराणचा होर्मुझ सामुद्रधुनीबाबत मोठा निर्णय!


## भारतासह संपूर्ण जगावर होणार परिणाम

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** इस्रायल-इराण याच्यातील संघर्षाचा आज १०वा दिवस आहे. इराण आणि इस्रायल युद्धात आता अमेरिकेने देखील उडी घेतली आहे. अमेरिकेने इराणच्या तीन अणु केंद्रांवर हल्ला केला आहे. त्यानंतर आता इराणने मोठे पाऊल उचलले आहे. इराणच्या संसदेने अमेरिकेने केलेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून ट्रेट ऑफ होर्मुझ म्हणजेच होर्मुझ सामुद्रधुनी बंद करण्याच्या प्रस्तावाला मंजूरी दिली आहे.

**इराणचा मोठा निर्णय-** ही माहिती इराणच्या सरकारी प्रेस टीव्हीने रविवारी दिली आहे. होर्मुझ सामुद्रधुनी हा जगभरातील तेल व्यापारासाठी खूप महत्त्वाचा मार्ग आहे, येथून जवळपास ३० टक्के जागतिक पेट्रोलियम शिपमेंटची वाहतूक होते. हे बंद करण्याचा निर्णय संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम करू शकतो. सध्या संसदेत या प्रस्तावावर एकमत झाले आहे, मात्र अंतिम निर्णय इराणची सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषद घेईल. ही परिषदच देशाच्या सुरक्षेबाबत महत्त्वाचे निर्णय घेते. संसदेच्या राष्ट्रीय सुरक्षा समितीचे सदस्य मेजर जनरल कोवसारी यांनी सांगितले की, हा प्रस्ताव जनतेची भावना दाखवून देतो, मात्र हा लागू करण्यासाठी सुरक्षा परिषदेची मंजूरी आवश्यक आहे.

**भारतावरही होणार परिणाम-** अमेरिकेने शनिवारी इराणवर हवाई हल्ला केल्यानंतर लगेचच इराणने ते होर्मुझ सामुद्रधुनी बंद करू शकतात असे संकेत दिले होते. तज्ज्ञांच्या मते जर स्ट्रेट ऑफ होर्मुज बंद करण्यात आले आणि जहाजांची ये-जा बंद झाली तर संपूर्ण जगाबरोबरच भारतावर देखील याचा परिणाम होऊ शकतो. इराणच्या या निर्णयानंतर तेलाचा पुरवठा कमी होईल आणि महागाई वाढू शकते. यामुळे☞(पान २ वर)

## ‘आज जागे झाले नाहीत तर अल्लाह’, फारूख अब्दुल्लांचे विधान चर्चेत



अमेरिकेने इराणमधील तीन अणु प्रकल्पांवर हल्ला केल्यानंतर भारतातील अनेक राजकीय पक्षांमधील नेत्यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. जम्मू आणि काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारूख अब्दुल्ला यांनी देखील यावर प्रतिक्रिया दिली आहे. अब्दुल्ला म्हणाले की, ‘मला दुखः या गोष्टीचं आहे की जे मुस्लिम राष्ट्र तेथे आहेत, ते देखील शांत बसून तमाशा पाहात आहेत. आज याची (इराण) ही परिस्थिती आहे, उद्या दुसऱ्यांचे देखील असेच☞(पान २ वर)

# पावसाळ्यातही सुरू राहणार नक्षलविरोधी मोहीम

## आत्मसमर्पण करा, अन्यथा...शाहांचा अल्टिमेटम



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देशातून नक्षलवादाचा खात्मा करण्यासाठी ३१ मार्च २०२६ पर्यंत चा अल्टीमेटम दिला आहे. या दिशेने नक्षलग्रस्त भागात तीव्र मोहिमा राबवल्या जात आहेत. दरम्यान, आता गृहमंत्र्यांनी एक मोठी घोषणा केली आहे. छत्तीसगडमधील एका कार्यक्रमात बोलताना शाह म्हणाले की, देशातून नक्षलवाद्यांचा पूर्णपणे नायनाट करणे, हे सरकारचे ध्येय आहे. या दिशेने केंद्र आणि राज्य सरकार वेगाने काम करत आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले की, पूर्वी नक्षलवादी पावसाचा फायदा घेऊन जंगलात लपून बसायचे, परंतु आता असे होणार नाही. नक्षलवाद्यांना पावसाळ्यातही शांत झोपू दिले जाणार नाही. नक्षलवादा विरुद्धची कारवाई पावसातही सुरुच राहील. ही कारवाई कोणत्याही हवामानावर अवलंबून राहणार नाही. आमचे सुरक्षा दल पूर्ण ताकदीने काम करत आहेत आणि ही लढाई निर्णायक वळणावर पोहोचली आहे. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, नक्षलवाद्यांनी शस्त्रे खाली ठेवावीत. आत्मसमर्पण करण्याची यापेक्षा चांगली संधी मिळणार नाही. गृहमंत्र्यांनी छत्तीसगड सरकारच्या नवीन नक्षलवादी आत्मसमर्पण धोरणाचे कौतुक केले आणि सांगितले की, हा एक सकारात्मक पुढाकार आहे, ज्यामुळे मुख्य प्रवाहात परतणाऱ्यांना चांगले भविष्य आणि सन्माननीय जीवन जगण्याची संधी मिळेल. त्यांनी नक्षलवाद्यांना हिंसाचाराचा मार्ग सोडून देशाच्या विकास प्रवासात भागीदार होण्याचे आवाहन केले. आपल्या भाषणात शाह यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ’विकसित भारत’ च्या दृष्टिकोना चा उल्लेख केला आणि सांगितले की, हे स्वप्न केवळ पायाभूत सुविधा, नवोपक्रम आणि आर्थिक प्रगतीपुरते मर्यादित नाही, तर ते वेळेवर न्याय आणि सामाजिक स्थिरतेवर देखील लक्ष केंद्रित करते.

# ‘शिवसेना हायजॅक करण्याचा प्रस्ताव संजय राऊतांनीच एकनाथ शिंदेंपुढे मांडला होता- गुलाबराव पाटील



**मुंबई/प्रतिनिधी :** महाविकास आघाडीचे दोन शिल्पकार होते एक होते शरद पवार तर दुसरे होते संजय राऊत. या दोघांपैकी आता संजय राऊत हे एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेच्या निशाण्यावर आले आहेत. कारण २०२२ मध्ये शिवसेनेत जे सर्वात मोठं बंड झालं त्यानंतर सातत्याने संजय राऊत हे सातत्याने एकनाथ शिंदेंवर आणि फुटून गेलेल्या आमदारांवर टीका करत होते. मात्र आता शिवसेनेच्या मंत्र्याने संजय राऊत यांनीच शिवसेना हायजॅक करण्याचा प्रस्ताव दिला होता असं या मंत्र्याने म्हटलं आहे.

**२०२२ मध्ये काय घडलं?**

जून २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांनी ४० आमदारांना बरोबर घेत भाजपासह जाणं पसंत केलं. शिवसेनेतलं हे सर्वात मोठं बंड ठरलं. उद्धव ठाकरेंनी बाळासाहेबांच्या विचारांना तिलांजली दिली आणि पदासाठी काँग्रेससह युती केली असं सांगत एकनाथ शिंदे यांनी हे बंड पुकारलं आणि थेट शिवसेनेवरच दावा सांगितला. निवडणूक आयोगानेही एकनाथ शिंदेंना शिवसेना हे नाव आणि पक्षचिन्ह असलेला धनुष्यबाण दिला. दरम्यान संजय राऊत हे सातत्याने एकनाथ शिंदे आणि त्यांच्याबरोबर गेलेल्या सगळ्या आमदारांवर टीका करत राहिले. सुरुवातीला एकनाथ शिंदेसह सगळ्या आमदारांना बरोबर घ्यायचा प्रयत्न झाला. पण त्यात यश आलं नाही. एकनाथ शिंदे त्यांच्यासह असलेले ४० आमदार आणि भाजपा एकत्र आले. ज्यानंतर एकनाथ शिंदे राज्याचे मुख्यमंत्री झाले. उद्धव ठाकरेंसाठी हा सर्वात मोठा धक्का ठरला होता. आता शिवसेना हायजॅक करण्याचा प्रस्ताव हा संजय राऊत यांनीच एकनाथ शिंदेंना दिला होता असा दावा मंत्री गुलाबराव पाटील यांनी जळगावमध्ये ☞(पान २ वर)

# ‘८ वेळा निवडणुका जिंकलो, आता थांबण्याचा विचार करावासा वाटतो’

## भास्कर जाधवांचे सूचक विधान



**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीतील दारुण पराभवानंतर आता ठाकरे गटाला पडत असलेले खिंडार दिवसेंदिवस अधिकच मोठे होताना पाहायला मिळत आहे. शिवसेना शिंदे गटानंतर आता भाजपामध्ये माजी नगरसेवक, पदाधिकारी, नेते प्रवेश करताना दिसत आहेत. तर ठाकरे गटातील काही विद्यमान आमदारांना शिवसेना शिंदे गटाकडून खुली ऑफर दिली जात असल्याचे अनेकदा पाहायला मिळते. शिवसेना शिंदे गटाच्या ऑपरेशन टायगरबाबत राजकीय वर्तुळात चर्चा रंग असते. अशातच ठाकरे गटाचे कोकणातील आमदार भास्कर जाधव यांनी निवृत्तीची भाषा केल्याने राजकीय वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचावल्याचे म्हटले जात आहे. पत्रकारांशी बोलताना भास्कर जाधव यांनी आपली खदखद व्यक्त केली. तसेच मंत्रिपद न मिळाल्याबाबतही खंत व्यक्त केली. मला शिवसेना पक्षात भाषणे करायची संधी मिळते, तसेच पक्षाच्या हितासाठी मी जे करायचे ते करतो. पण, मी कुणाची हुजरेगिरी कर नाहीत, हा ला हा किंवा ना ला ना... असे म्हणणारा कार्यकर्ता आहे. शिवसेनेचा शाखाप्रमुखच हाच शिवसेनेचा कणा होता, पण कुठेतरी शिवसेनेत शाखाप्रमुखच बाजूला होत असल्याचे मला दिसले,☞(पान २ वर)

# ठाकरेंच्या शिवसेनेला मोठा हादरा, सचिवांनी साथ सोडली

## राऊत-दानवेंवर गंभीर आरोप करत राजीनामा



**जालना :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सचिव संजय लाखे पाटील यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. संजय लाखे पाटील यांनी पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचादेखील राजीनामा दिला आहे. विशेष म्हणजे पक्षाला सोडचिठ्ठी देत असताना त्यांनी खासदार संजय राऊत आणि आमदार अंबादास दानवे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. ’पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी १४ महिन्यांपूर्वी जालना लोकसभेचं तिकीट देण्याची हमी दिली होती. तिकीटाची हमी पूर्ण झाली नाही. तर अंबादास दानवे यांनी जालन्याची जिंकणारी जागा पक्षापासून दूर ठेवली’, असा आरोप संजय लाखे पाटील यांनी केला आहे.

’संजय राऊत यांनी सांगलीत जयंत पाटील यांच्यासोबत समझौता केला. सांगलीत पक्षाच्या उमेदवाराचा पराभव झाला’, ☞(पान २ वर)

### पाकिस्तानच्या ISIसाठी हेरगिरी

## जम्मूमध्ये तैनात जवानाला अटक



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** हेरगिरी केल्याचा आणि पाकिस्तानची गुप्तचर संस्था इंटर-सर्व्हिसेस इंटेलिजेंस संबंध असल्याच्या आरोपाखाली अमृतसर पोलिसांनी दोन व्यक्तींना अटक केली आहे, ज्यापैकी एक जण लष्करातील जवान असल्याची माहिती समोर आली आहे. पहलगाम येथे झालेले दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध तणावाचे बनले आहेत, यादरम्यान या दोघांना अटक करण्यात आली आहे. सध्या पंजाब पोलिसांनी संवेदनशील माहिती पाकिस्तानला पुरवणाऱ्यां विरोधात जोरदार मोहिम सुरू केली आहे. दोन्ही आरोपींची ओळख पटली असून गुरप्रीत सिंग उर्फ गोपी फौजी आणि साहिल मसीह उर्फ शाली अशी दोघांची नावे आहेत. अमृतसर (ग्रामीण) एसपी मनिंदर सिंग यांनी सांगितले की, गुरप्रित सिंग हा २०१६ पासून भारतीय सैन्यात नोकरी करत असून त्याला अटक करण्यात आली तेव्हा तो जम्मू येथे तैनात होता.एसएसपी सिंग यांनी पुष्टी केली की गुरुप्रीत याचा आयएसआय हँडलर राणा जावेद याच्याशी थेट संपर्क होता. राणा जावेद हा पाकिस्तानच्या बाजूने मुख्य कॉर्डिनेटर होता. आयएसआय ऑपरेटिव्हज बरोबर संपर्क साधण्यासाठी दोन्ही आरोपींनी वापरलेले फोन जप्त करण्या आले आहेत.

# वारी संदर्भात अबू आझमीचं वक्तव्य अतिरेक्यांप्रमाणे;

## अमोल मिटकरी म्हणाले दंगली घडवण्याचा कट



**मुंबई/प्रतिनिधी :** समाजवादी पक्षाचे नेते आणि आमदार अबू आझमा आज तुळजापू, सोलापूर दौऱ्यावर असताना त्यांनी आषाढीच्या वारीसंदर्भाने केलेल्या वक्तव्यावरुन आता वाद निर्माण होताना पाहायला मिळत आहे. आषाढीच्या वारीचे उदाहरण देत त्यांनी नमाज पाठणासाठी रस्त्यावर येत असलेल्या मुस्लिम बांधवांच्या भावनांची भूमिका मांडली. आजपर्यंत कोणत्याही मुस्लिम व्यक्तीने रस्त्यावर उत्सव का साजरे होतात याची तक्रार केली नाही. मी पुण्यातून येताना मला लोकांनी सांगितलं लवकर जाऊ अन्यथा पालख्यामुळं रस्ता जाम होईल. रस्ता जाम होतोय, पण आम्ही कधी तक्रार केली नाही, असे आझमी यांनी म्हटले. दरम्यान, सध्या पुणे जिल्ह्यात तुकाराम महाराज आणि ज्ञानेश्वर माऊली महाराजांच्या पालखींची उत्साहात पायी वारा सुरू आहे. त्यामुळे, आता आझमींच्या वक्तव्याने राजकीय वादाला तोंड फुटले आहे. त्यावरुन, आता नेत्यांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे आमदार अमोल मिटकरी आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार एकनाथ खडसे यांनी अबू आझमींवर जोरदार टीका केलीय. आमदार अबू आजमी यांच्या वारी संदर्भातील वक्तव्याचा राष्ट्रवादीचे आमदार म्हणून मिटकरी यांनी निषेध केलाय. ऐन वारीच्या वेळेवर अबू आझमी यांचं आलेलं वक्तव्य म्हणजे महाराष्ट्रात दंगली घडवण्याचा कट असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केलाय. अबू आझमी यांना वारकरी संप्रदायाबद्दलचं ज्ञान नसल्याने त्यांनी आधी वारकरी संप्रदायाबद्दल अभ्यास करावा, असा सल्लाही मिटकरी यांनी दिला आहे. तर, एकनाथ खडसेंनी देखील जहाल प्रतिक्रिया दिली आहे. पंढरपूरला पांडुरंगाच्या दर्शनासाठी गेलो होतो. येत असताना मुक्ताईच्या पालखीचे दर्शन घेतले. याचवेळी आमचे ज्येष्ठ नेते शिवाजीराव पंडित यांची देखील भेट घेतली, असे म्हणत ☞(पान २ वर)

# महाराष्ट्र हादरला! १० वर्षाच्या मुलीवर अत्याचार

## विवाहित महिलेच्या प्रियकराचे अमानवी कृत्य



**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राला हादरवणारी घटना मुंबईत घडली आहे. १० वर्षाच्या मुलीवर अत्याचार करून गुप्तांगात स्क्रूड्रायव्हर टाकला आहे. पीडित मुलीच्या आईच्या प्रियकरानेच हे अमानवी कृत्य केले आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी मुलीच्या आईसह तिच्या प्रियकराला अटक करण्यात आली आहे.

मुंबईच्या जोगेश्वरी पूर्व येथील मेघवाडी परिसरात ही धक्कादायक घटना घडली आहे, १० वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून मुलीच्या गुप्तांगात स्क्रूड्रायव्हर टाकला आहे. या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करून आरोपीने याचा व्हिडिओ देखील काढला आहे. या घटनेने मुंबई पुन्हा एकदा हादरली आहे. या प्रकरणी मेघवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल करत २४ वर्षीय पुरुषाला आणि २१ वर्षीय त्याच्या प्रेयसीला अटक केली आहे. पीडित मुलीची आई एका केटरिंग सर्विस फॉर्म मध्ये सुपरवायझर म्हणून काम करते. १४ जून आणि १५ जून रोजी जेव्हा पीडित मुलीची आई कामावर गेली होती तेव्हा आरोपीने दहा वर्षीय मुलीवर चार वेळा लैंगिक अत्याचार केला.

आरोपीने तिच्यावर वारंवार अत्याचार केला आणि तिचा गुप्तांगात स्क्रूड्रायव्हर टाकला इतकेच नाही तर आरोपीच्या प्रेयसीने ☞(पान २ वर)







# पवनार धाम नदीपात्रात बुडून युवकाचा मृत्यू

## -रविवारी फिरायला गेलेल्या चार जणांपैकी एकाचा दुर्दैवी अंत



**वर्धा जनमाध्यम :** पवनार येथील धाम नदीपात्रात रविवारी २२ जून रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास पोहण्यासाठी गेलेल्या २६ वर्षीय युवकाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. यश चव्हाण (रा. रामनगर, वर्धा) असे मृत युवकाचे नाव आहे. मित्रांसोबत आलेल्या यशने खोल पाण्याचा अंदाज न घेताच पाण्यात उडी घेतली आणि काही क्षणांतच गडप झाला.

रविवारी साप्ताहिक सुट्टीचा दिवस असल्याने यश चव्हाण आपल्या मित्रांसह पारस सरोवरे, आशिष गाणार, प्रिन्स यादव पवनार येथे फिरण्यासाठी आले होते. धाम नदीपात्राबरील बंधाऱ्यावर चारही जण गेले होते. या ठिकाणी पोहण्यास सक्त मनाई असतानाही यशने एकट्याने पाण्यात उतरण्याचा निर्णय घेतला. मित्रांनी त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला, मात्र तो ऐकला नाही. पोहता-पोहता काही अंतर गेल्यानंतर परत येताना यशला दम लागून तो पाण्यात बुडू लागला. यावेळी उपस्थित मित्रांनी व काही स्थानिकांनी त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र प्रयत्न अपयशी ठरले आणि यश पाण्यात गडप झाला.

घटनेची माहिती मिळताच पोलीस पाटील आम्रपाली ढोले यांनी सेवाग्राम पोलिसांना सूचित केले. त्यानंतर पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. यशचा मृतदेह शोधण्यासाठी शोधमोहीम सुरु करण्यात आली असून काही वेळानंतर स्थानिक अर्जुन सातघरे आणि दीपक सातघरे यांच्या मदतीने मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात आला.

शवविच्छेदनासाठी प्रेत वर्धा येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले आहे. घटनास्थळी यशच्या कुटुंबीयांनी धाव घेतली असता त्यांचा आक्रोश हृदयद्रावक होता.

**प्रशासनाचे दुर्लक्ष?**

धाम नदी परिसरात शनिवार आणि रविवारी नागरिकांची मोठी गर्दी होत असते. अशा गर्दीच्या दिवशी योग्य बंदोबस्त, जीवनरक्षक कर्मचारी व उपाययोजना नसल्यामुळे अशा दुर्दैवी घटना घडतात, गर्दीच्या दिवशी या ठिकाणी बंदोबस्त लावण्यात यावा आणि अशा अप्रिय घटना टाळाव्या अशी मागणी नागरिकांची होत आहे. या प्रकरणी सेवाग्राम पोलिस ठाण्याचे पोलीस अधिकारी आशिष डफ, मनोज लोहकरे, एम. एच. कातकर तपास करीत आहे.

# विद्यानिकेतन प्राथमिक शाळेत योग दिन उत्साहात



**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री विद्यानिकेतन शिक्षण संस्थेद्वारा संचालित, विद्यानिकेतन प्राथमिक शाळा, रामनगर अमरावती येथे शनिवार दि.२१ जून २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. 'योगः कर्मसु कौशल्यम ',या उक्तीप्रमाणे, पौराणिक काळापासूनच मानवी जीवनामध्ये योग साधनेचे अनन्यसाधारण महत्व आहे. भारतीय संस्कृतीला लाभलेला मौल्यवान ठेवा म्हणजे योग. योग हा संस्कृत शब्द असून मन आणि शरीर यांना एकत्र जोडणारी एक कला आहे. शाळेच्या मुख्या.देशमुख मॅडम यांनी सगळ्यांना आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या व नवीन शैक्षणिक सत्राच्या शुभेच्छा दिल्या.

शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका देशपांडे मॅडम या आजच्या 'योग गुरु',त्यांच्या मार्गदर्शनाखाली सगळ्यांनी योगाभ्यासाचे धडे गिरवले. व्यक्तीची शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुदृढ असेल तर त्याचे प्रतिबिंब त्याच्या वृत्तीत उतरते म्हणूनच आज योग दिनाचे औचित साधून या प्रसंगी, साध्या सोप्या शारीरिक हालचाली करून सुरुवात करण्यात आली. यामध्ये पर्वतासन, ताडासन, वृक्षासन, भ्रामरी, अनुलोम-विलोम, सूर्यनमस्कार व ओमकार जप करण्यात आला. उत्तर काळात येणाऱ्या आजच्या सगळ्यात मोठ्या दिवसाचे सोबत जोडल्या गेलेले अध्यात्मिक व उपासनेचे महत्त्व याबर चर्चा करण्यात आली. एक शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांची जबाबदारी लक्षात घेता, सगळ्यांना शिक्षिकांनी, मन बुद्धी, आत्मा, व शरीर यांचा समतोल साधण्याकरिता, मानसिक व शारीरिक दृष्ट्या सुदृढ राहण्याकारिता, नेहमी योग साधना करण्याचा संकल्प केला. शेवटी शांतिपाठ घेण्यात आला. शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यात सहभागी झाले.

# गुरुसिद्धी संगीत विद्यालयात जागतिक संगीत दिन साजरा



**तिवसा/ प्रतिनिधीः-** स्थानिक तिवसा येथील गुरुसिद्धी संगीत विद्यालयात जागतिक संगीत दिन साजरा करण्यात आला. सर्वप्रथम सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन संगीत विद्यालयाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा. सुनिल इंगोले यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या कलेचे सादरीकरण केले. त्यामध्ये धार्मिक इंगोले यांनी शास्त्रीय संगीताच्या गायनाने कार्यक्रमाची सुरूवात केली. त्यावेळी राग पूरिया धनश्री, गाऊन सर्व रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले . त्यांना हार्मोनियम साथसंगत उपदेश इंगोले व तबला संगत मंदार अमृतकर यांनी केली . या संगीत दिनी बराच संगीत श्रोता वर्ग उपस्थित होता . त्यानंतर रूपक तालात स्वतंत्र तबला वादन प्रणव कुबडे यांनी केले तर सुगम संगीत संकेत बंड, समर्थ निपाने, उपदेश इंगोले यांनी सादर केले.त्यावेळी तबला संगत रोणित कडू , पखवाज सागर मुंदाने यांनी केली. या कार्यक्रमाचा समारोप संगीत विद्यालयाचे संस्थापक बलदेवराव इंगोले यांच्या बासरी वादनाने करण्यात आला . कार्यक्रमाचे सुत्र संचालन पार्वती इंगोले यांनी केले तर आभार प्रदर्शन मोहन इंगोले यांनी केले.

# सुरवाडी गावात योग दिन




**तिवसा/प्रतिनिधीः-** स्व.आर जी देशमुख कृषी महाविद्यालय तिवसा येथील ग्रामीण कृषी कार्यानुभव आणि कृषी औद्योगिक प्रशिक्षण रावे उपक्रमाअंतर्गत सुरवाडी या गावात योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी उपस्थित ग्रामस्थांसह बच्चे कंपनीने यात भाग घेतला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच ललिता बोराळकर तर प्रमुख पाहुणे म्हणून सचिव सुरेंद्र चिकटे व प्राथमिक शाळेच्या शिक्षिका संध्या जामकर,सविता कठाने उपस्थित होते. तसेच विद्यार्थीनी चांदणी राठोड हिने दैनंदिन जीवनात योगा चे महत्व उपस्थितांना पटवून दिले. यावेळी महाविद्यालयाचे विद्यार्थी गोपाल पोल्हाड, यश पाटील, गायत्री पटले आदी उपस्थित होते. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य अरुण डहाके,रावे समनव्यक सावन राठी यांचे मार्गदर्शन लाभले.मोठ्या संख्येने यात ग्रामस्थांनी सहभाग घेतला होता.

# श्री हव्याप्र मंडळाच्या शूटिंग विभागाला सुवर्ण पदक

## -मुंबई येथील २८ व्या कॅप्टन इझेकीएल स्पर्धेत यश

**अमरावती /प्रतिनिधीः-** मुंबई येथे नुकत्याच पार पडलेल्या २८ व्या कॅप्टन इझेकीएल २०२५ स्पर्धेत श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या शूटिंग विभागाला ला एक सुवर्ण व एक रजत पदक प्राप्त झाले. श्री हव्याप्र मंडळ शूटिंग विभाग प्रमुख आयएसएसएफ - सी प्रशिक्षक राहुल उगले यांच्या मार्गदर्शनाखाली शूटिंग विभागाचा समर्थ वारे याने २५ मीटर स्टॅंडर्ड पिस्टोल शूटिंग प्रकारात २७५/३०० असा स्कोर करून सुवर्ण पदक जिंकले.



तर खालिद खत्री ह्याने ५० मिटर थ्री पोजिशन रायफल शूटिंग प्रकारात रजत पदक जिंकले. विशेष म्हणजे, मंडळाच्या शूटिंग विभागातील खेळाडू सलग तीन वर्षांपासून पदक जिंकत आहेत.

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या शूटिंग विभागाच्या सातत्यपूर्ण यशाबद्दल मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, अध्यक्ष एड. रवी देशपांडे, कार्याध्यक्ष एड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, सचिव प्रा. डॉ. माधुरी चेंडके, कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, सचिव डॉ. विकास कोळेश्वर, सचिव प्रा. रवींद्र खांडेकर, प्रा. ललित शर्मा, आनंद महाजन यांच्यासह मंडळाचे सर्व पदाधिकारी, प्रशिक्षक यांचेसह सर्व खेळाडूंतर्फे विजेत्या खेळाडूंवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# १ व १० वरील उर्वरित

### अमेरिकेच्या हवाई हल्ल्यानंतर

भारताच्या आर्थिक गतीवर देखील परिणाम होऊ शकतो.

**होर्मुझ सामुद्रधुनी काय आहे?**

होर्मुझ सामुद्रधुनी ही पर्शियन खाडीला अरबी समुद्राशी जोडते. हा एक अत्यंत महत्त्वाचा रस्ता आहे. जगभरात पुरवठा केले जाणारे तेल आणि एलएनजी याचा जवळपास ३० टक्के हिस्सा याच मार्गावरून जातो. जर हा रस्ता बंद झाला तर तेलाचा पुरवठा कमी होईल आणि किंमती देखील वाढतील.

### 'आज जागे झाले

हाल होतील, मी तुम्हाला सांगून ठेवतो आणि अमेरिका त्यांना देखील संपवण्याचा प्रयत्न करेल जे आज गप्प आहेत.'

फारूख अब्दुल्ला म्हणाले की, 'मला पूर्ण विश्वास आहे की त्यांची वेळ देखील नक्की येईल, आज जागे झाले नाहीत तर अल्लाहष्ठ त्यांनी वाट पाहावी त्यांची वेळही येणार आहे.'

या युद्धाचा भारतावर काय परिणाम होईल? असा प्रश्न विचारला असता फारूख अब्दुल्ला म्हणाले की तेल सर्वाधिक प्रमाणात तेथूनच येथे जेव्हा ते बंद होईल तेव्हा याचा आपल्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होईल.

### 'शिवसेना हायजॅक करण्याचा

माध्यमांशी बोलताना केला आहे.

काय म्हणाले गुलाबराव पाटील?

'शिवसेना हायजॅक करण्याचा प्रस्ताव हा संजय राऊत यांनीच एकनाथ शिंदेंच्या पुढे मांडला होता. त्यावेळी तो एकनाथ शिंदे यांनी नाकारला होता. सर्वात आधी संजय राऊतच फुटणार होते पण ते थांबले.' असं गुलाबराव पाटील म्हणाले. काही दिवसांपूर्वी शहाजीबापू पाटील यांनीही असाच दावा केला होता.

### '८ वेळा निवडणुका जिंकलो

म्हणून त्याच अनुषंगाने शिवसेना पक्षाच्यावतीने शिबिराचे आयोजन केले होते, असे भास्कर जाधव यांनी सांगितले. कार्यकर्ते कमी होत आहे, म्हणून निवृत्ती घ्यायचे काहीच कारण नाही. ३९ जागांपैकी मी एकटा निवडून आलो आहे. शेवटी आठ-आठ वेळा वेगवेगळ्या निवडणुका जिंकल्यानंतर असे वाटते की, आता थांबायचा विचार करावा, यापेक्षा वेगळे कारण नाही, असे भास्कर जाधव यांनी म्हटले आहे. तसेच राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना, आपल्याला मंत्रि?पदाची संधी मिळाली नाही. मला मंत्रिपद का दिले नाही याचे उत्तर कोणाकडे असेल तर त्यांनी द्यावे. माझ्यावर झालेला अन्याय उघडपणे सांगितला, यापुढेही सांगेन, असे भास्कर जाधव यांनी स्पष्टपणे सांगितले.

दरम्यान, मला मंत्रिपद मिळायला पाहिजे होते, मी तेव्हा बोललो. मी आजही बोलेन. उद्याही बोलेन. मला मंत्रिपद का मिळायला नको, हे मला कोणी सांगायला हवे. मला मंत्रिपद मिळाले नाही म्हणून काय रडत बसायचा का? उलट लढायचे. मला मंत्रिपद मिळाले नाही, म्हणून जे फुटून गेले त्यांच्याबरोबरही मी गेलो नाही. मी लढत आहे, असे भास्कर जाधव यांनी नमूद केले.

### ठाकरेंच्या शिवसेनेला मोठा

असा आरोप संजय लाखे पाटील यांनी केला आहे. तसेच 'गेल्या १३-१४ महिन्यात संघटनात्मक जबाबदारी नाकारुन बेदखल करण्यात आलं. दैनिक सामन्यात नाव नोंदवून न घेणं, मानहानीकारक वागणूक यामुळे राजीनामा देत आहे. मराठवाड्यातील संघटना कमकुवत होत आहे. उद्धवजी तुम्हाला शुभेच्छा', असं संजय लाखे पाटील राजीनामा देताना म्हणाले आहेत.

**संजय लाखे पाटील नेमकं काय म्हणाले?**

'तुम्ही आमच्याकडे प्रवेश करा. जालना लोकसभा आम्ही शिवसेनेला सोडवून घेऊ आणि सांगली कॉंग्रेसला देऊ, असं उद्धव ठाकरे यांनी मला आश्वासन दिलं होतं. मी त्यांच्या शब्दाखातर शिवसेनेत प्रवेश केला. त्यांनी दोन ते तीन वेळेस संजय राऊत यांना जालना मतदारसंघ सोडवून घेण्याच्या स्पष्ट सूचना केल्या. पण शिवसेनेत संजय राऊत हे त्यांचा वेगळा अजेंडा चालवतात. त्या अजेंड्यानुसार त्यांनी सांगलीतील प्रस्थापित कॉंग्रेस विरोधी नेत्याबरोबर साटलोटं करुन विशाल पाटील खासदार होणार नाहीत, सांगली कॉंग्रेसकडे जाणार नाही आणि एक कमकुवत उमेदवार त्या ठिकाणी देणं अशा पद्धतीची तडजोड केली आणि सांगली शिवसेनेकडे ठेवली', असा आरोप संजय लाखे पाटील यांनी केला.

### वारी संदर्भात अबू आझमीचं

ज्येष्ठ नेते शिवाजीराव पंडित यांची देखील भेट घेतली, असे म्हणत एकनाथ खडसे यांनी आजच पंढरपूरला जाऊन विठुरायाचे दर्शन घेतल्याची माहिती दिली. तसेच, अबू आझमी जे भाष्य करतात ते वादग्रस्त असतं, ते अतिरेक्यांप्रमाणे आणि धर्माशी जोडलेले वक्तव्य करतात, असे एकनाथ खडसेंनी म्हटले. नमाज पठणाला कोणीही विरोध केला नाही, आणि पांडुरंगाच्या वारीला देखील केला नाही. या देशात आणि राज्यात दोन्ही समाज एकत्र नांदत असताना राजकारण्यांच्या सोयीसाठी काही लोक वेगवेगळे वक्तव्य करत आहेत, असे अबू आझमींच्या वक्तव्यावरुन एकनाथ खडसेंनी म्हटले.

काय म्हणाले होते अबू आझमी

कोणत्याही मुस्लिम व्यक्तीने आजपर्यंत रस्त्यावर उत्सव का साजरे होतात याची तक्रार केली नाही. पण ज्यावेळी मशीद पूर्ण भरते तेव्हा काही मशिदीतील लोकं ५ ते १० मिनिटं रस्त्यावर नमाज पठण करतात, त्यावेळी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री म्हणतात रस्त्यावर नमाज पठण केलं तर पासपोर्ट रद्द करु. मी पुण्यातून येताना मला लोकांनी सांगितलं लवकर जाऊ अन्यथा पालख्यामुळे रस्ता जाम होईल. रस्ता जाम होतोय, पण आम्ही कधी तक्रार केली नाही. पण नमाजसाठी तक्रार होते असे अबू आझमी म्हणाले. याचा अर्थ जाणीवपूर्वक काही लोक मुस्लिम बाबतीत हे करत आहेत, असं वक्तव्य अबू आझमी यांनी केले आहे.

### महाराष्ट्र हादरला! १० वर्षाच्या

या संपूर्ण कृत्याचा व्हिडिओ शूट केला. यानंतर आरोपीने महिलेवर टोकदार वस्तूने हल्ला केला. घटनेबाबत जर कोणाला माहिती दिलं तर काढलेला व्हिडिओ व्हायरल करण्याचे धमकी सुद्धा दिली, या घटनेनंतर मुलीने मेघवाडी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. यानंतर मेघवाडी पोलिसांनी पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करत २४ वर्षीय पुरुषाला आणि त्याच्या २१वर्षीय प्रेयसीला अटक केली आहे. अटक आरोपीकडून अधिक तपास मेघवाडी पोलीस करत आहेत.

### बिबट्याची एसआरपीएफ

जंगल परिसरात अलीकडच्या काळात बिबट्यांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे. या जंगलाला लागूनच एसआरपीएफ कार्यालय आणि काही निवासी वसाहती आहेत. जंगलात शिकार कमी उपलब्ध झाल्याने बिबटे मानवी वस्त्यांकडे येत असून, विशेषत: रात्रीच्या वेळी कुत्र्यांची शिकार करतात. यापूर्वीही विद्यापीठ परिसरात बिबट्यांचे दर्शन झाले असून, तिथे सावधगिरीचे निर्देशक फलक लावण्यात आले आहेत.

या घटनेनंतर वनविभागाने परिसरातील नागरिकांना सतर्क राहण्याचा सल्ला दिला आहे. रात्रीच्या वेळी अनावश्यक फिरणे टाळावे आणि पाळीव प्राण्यांची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. वनविभागाने स्पष्ट केले आहे की, बिबट्या किंवा वाघाचा माणसांवर थेट हल्ला करणे दुर्मिळ आहे. परंतु धोक्याच्या परिस्थितीत ते प्रत्युत्तर देऊ शकतात. त्यामुळे जंगलाला लागून असलेल्या परिसरातील रहिवाशांनी सावधगिरी बाळगावी. विशेषत: रात्रीच्या वेळी मुलांवर लक्ष ठेवावे, पाळीव कुत्र्यांना मोकळे सोडू नये आणि परिसर स्वच्छ ठेवावा, जेणेकरून जंगली प्राण्यांना आकर्षित करण्याचे कोणतेही कारण मिळणार नाही.

### प्रेम नाकारले म्हणून जीव

तक्रारीवरून पोलिसांनी अनिरुद्ध झटाले याच्यावर गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करून त्याला तत्काळ अटक केली.पुढील तपास पोलिस करत आहेत.

### शहरात वाहतूक शाखेचे आता

, असेही सांगण्यात येत आहे. शहरवासीयांना अधिक सुकर, सुरक्षित आणि नियोजित वाहतूक व्यवस्था लवकरच अनुभवता येईल, अशी अपेक्षा आहे.

पूर्वी केवळ दोन विभागांवर संपूर्ण शहराची वाहतूक जबाबदारी होती. त्यामुळे पोलीस निरीक्षकांवर ताण होता आणि शहरातील वाहतुकीची शिस्त अबाधित ठेवण्यात अडथळे येत होते. आता नव्याने केलेल्या त्रिसूत्री विभागीय पुनर्रचनेमुळे जबाबदाऱ्या विभागून कार्यक्षमता वाढेल आणि वाहतूक शिस्त सुनिश्चित होईल, असा विश्वास पोलीस प्रशासनाने व्यक्त केला आहे.

### विदेशी दारूची वाहतूक

हद्दीतील व्ही.एम.व्ही. कॉलेजसमोर पोलिसांनी झडप घालून नाकाबंदी केली. थोड्याच वेळात लाल रंगाची टाटा झिप गाडी पोलिसांच्या जाळ्यात अडकली. तपासणी केली असता, गाडीमध्ये विविध कंपनीच्या ३६४ विदेशी मद्याच्या बाटल्या सापडल्या. याची एकूण किंमत ६६ हजार ८१० रुपये इतकी असून, संपूर्ण वाहतूक परवाना व परवानगीशिवाय वाहतुक केली जात होती. यामुळे हा सारा माल जप्त करून मनोज चौधरीला अटक करण्यात आली.

### मोटर सायकल चोरटा जेरबंद

तपास करण्यात बाबत आदेशीत केले असता गुन्हे प्रकटीकरण पथक मोर्शी यांनी सदर गुन्हयाचा छडा लावुन आरोपी हरिभाऊ वासुदेवराव निमकर्डे (रा. आष्टगाव) याचे ताब्यातुन सदर गुन्हयात चोरी गेलेली मोटर सायकल होंडा ॲक्टीव्हा कंपनीची मोपेड गाडी क्र.एम.एच.२७ बि.वाय ६२२८ किं. अं. ७००००/-रू.ची जप्त करण्यात आली.तसेच पोलीसांनी त्याला विचारपुस केली असता त्याने त्याचा मुलगा विधिसंघर्षीत बालक याला सदर मोटर सायकल चोरी करण्याकरीता सांगीतले होते. त्याच्या मुलाने सदरची मोटर सायकल चोरी करून आणुन आरोपी यास दिली असल्याचे त्याने कबुली दिली असल्याचे पोलीस सुत्रांनी सांगीतले.

सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक विशाल आनंद,अप्पर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांचे नेतृत्वात पो.स्टे.मोर्शी येथील पोउपनि अमोल बुरकुल, छत्रपती करपते,स्वप्नील बायस्कर यांनी केली. पुढील तपास पोलीस हवालदार सुमित पिडेकर हे करीत आहे.

### २५ ला पीपल्स रिपब्लिकन

स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेता त्या दृष्टीने पुढील राजकीय भूमिका ठरविण्यात येईल. संघटनात्मक बांधणीच्या संबंधाने कृतीबद्ध नियोजनार्थ आयोजित करण्यात आलेल्या या राजकीय दृष्ट्या महत्त्वपूर्ण बैठकीला राज्यातून राज्य कार्यकारणी पदाधिकाऱ्यांसह पक्षांतर्गत विविध आघाड्यांचे अशा ३०० प्रमुख पदाधिकाऱ्यांना निमंत्रित करण्यात आले असल्याची माहिती पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष व बैठकीचे निमंत्रक चरणदास इंगोले यांनी दिली आहे.

### टाकरखेडा संभू ते आष्टी

करणाऱ्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे.स्थानिक नागरिकांनी बांधकाम विभागाचे याकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला असला तरी अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. स्थानिक प्रशासन आणि बांधकाम विभागाने तात्काळ पावले उचलून रस्ता साफ करावा, काटेरी झाडे हटवावी आणि रस्त्याची डागडुजी करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

### श्री विठोबा संस्थान सावंगाचे

प्रसंगी संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल, तसेच सर्व विश्वस्त विनायक पाटील, वामन रामटेके, गोविंद राठोड, चरणदास कांडलकर, लक्ष्मण राठोड, वैभव मानकर आणि स्वप्नील चौधरी उपस्थित होते.नवीन विश्वस्त प्रविण कुकडकर यांचे पुष्पहार, शाल व श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले. त्यांच्या सहभागामुळे संस्थानच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यात नवा उत्साह आणि गती निर्माण होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### जनावरांची कत्तल करून गोमास

मासाचे तुकडे व कातड्याची दुर्गंधी येत असल्याने व ते आरोग्यास धोकादायक असल्याने तात्काळ विल्हेवाट लावण्यासाठी नगर परिषद मोर्शी यांना पत्र व्यवहार करून सदर गोमांस जमीनमध्ये पुरून पंचासमक्ष विल्हेवाट लावण्यात आली. यातील आरोपी न्याज अहेमद मोहम्मद हनिफ (वय ३६ वर्षे मोर्शी) हा गोवंश जनावरांची कत्तल करून गोवंश जनावरांचे मांस व कातडे विक्री करण्याच्या उद्देशाने मिळून आला.आरोपी विरुद्ध कलम ३२५ भारतीय न्याय संहीता,सहकलम ५,५ (ब),५(क),९,९(अ), महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम सकलम ११९ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली. ही कार्यवाही उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार नितीन देशमुख यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक अमोल बुरुकुल,स्वप्निल बायस्कर,छत्रपती करपते,विजय वागतकर,मंगेश बदुकले,विलास कोहळे, प्रीती शिंदे,सचिन भाकरे यांनी केली.

### तडीपारीचे आदेश डावलत शस्त्र

असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत त्यालाही अटक केली. त्याच्याविरुद्ध कलम १४२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम, ४/२५ आर्म ॲक्ट व १३५ महाराष्ट्र पोलिस कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही कारवाया पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, कल्पना बारकर, सागर पाटील व सहाय्यक आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात पार पडल्या. या कारवाईमध्ये सपोनि महेश इंगोले, संजय वानखडे, गजानन ढेवले, दीपक सुंदरकर, आस्तिक देशमुख, मनोज ठोसर, मंगेश शिंदे, योगेश पवार, राजीव रायलीवाले, विशाल वाकपांजर, सागर ठाकरे, संदीप खंडारे, चेतन शर्मा आणि राहुल दुधे यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली.

### नागपूर महानगर अध्यक्षपदी

आणि जबाबदारी जिल्हा आणि महानगराचे दोन्ही अध्यक्ष लवकरच जाहीर करतील असे निर्देश भट्टलवार व धर्माधिकारी यांनी दिले. याप्रसंगी श्रीपाद भट्टलवार, संजय धर्माधिकारी, राजू पुसदेकर, अनिरुद्ध गुप्ते, गणेश शिरोळे अरविंद हाडे आदी उपस्थित होते.

### आंदोलनाच्या इशाऱ्याने

दिवशी सांगळूदकर नगर प्रमुख रस्त्यावर मुरूम टाकला आहे. त्यामुळे पावसाळ्यात व्यापारी व नागरिकांना काही प्रमाणात त्रास कमी होणार आहे. परंतु सदर रस्त्याचे कॉंक्रीटीकरण लवकरात लवकर करावे अशी मागणी सुद्धा जोर धरत होत आहे.शासनाच्या लाखो रुपयांच्या योजना रस्ता बांधकाम संबंधी उपलब्ध असतात. यासह विविध विकास कामांसाठी निधी हा संबंधित विभागाला प्राप्त होत असतो. असे असताना सुद्धा संबंधित लोकप्रतिनिधी, अधिकारी यांची पूर्णपणे डोळेझाक आहे. सागळूदकर नगर, पंजाबराव कॉलनी आदी लगतच्या परिसरातील रस्त्यांच्या पंक्या बांधकाम करण्यासाठी उदासीनता दिसून येत आहे. परिणामी वयोवृद्ध ,शाळकरी विद्यार्थ्यांना, वाहन चालकांना उखडलेल्या रस्त्यावरुन मोठी तारेवरची कसरत करावी लागत असल्याचे वास्तव चित्र आहे.

# महर्षी वाल्मिकी योगसाधना केंद्र वायगाव येथे योग दिन

**टाकरखोडा संभू / प्रतिनिधीः-** वायगाव येथे जागतिक योग दिनानिमित्त दि.२१ जून २०२५ रोजी महर्षी वाल्मिकी योगसाधना केंद्राच्या वतीने भव्य योग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार अजितकुमार येळे, सेवानिवृत्त तालुका कृषी अधिकारी राजेंद्र मस्के, संस्था अध्यक्षा सुनीता डोंगरे, भाजपा महिला आघाडी अमरावती जिल्हा शहर अध्यक्षा सुजाता मस्के, ग्रामसचिव सुरज भोपसे, सरपंच शांताबाई गाडे, अशोक डोंगरे, तसेच गावातील मान्यवर रामराव खर्चा, प्रल्हादराव ढोरे, शांताराम गोड, आणि इतर अनेक नागरिक उपस्थित होते.

गावातील आबालवृद्ध, महिला, पुरुष, विद्यार्थी आणि शिक्षकवृंद यांनी मोठ्या संख्येने सहभागी होत योगाभ्यासात सक्रिय सहभाग घेतला.

कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता चिरंजीव आकाश डोंगरे, अनिल राऊत व आदित्य डोंगरे यांचे विशेष योगदान लाभले. कार्यक्रमास अमरावती महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त सचिन कलंत्रे, श्यामकांत मस्के, चंद्रपूरचे उपजिल्हाधिकारी नितीन व्यवहारे तसेच विभागीय आयुक्त श्वेता सिंगल यांनी दूरध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमानंतर उपस्थित सर्व योगप्रेमींना संस्थेच्या वतीने फराळाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमासाठी गावातील नागरिकांनी संस्थेचे मनःपूर्वक आभार मानले.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला | वाशिम | बुलडाणा

■ सोमवार, २३ जून २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com


# पातुर तालुक्यात पांदण रस्ता योजनेत कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार ?

## शासनाच्या शेतकरीहिताच्या योजनेचा गैरवापर

■ प्रदीप काळपांडे ■

**पातुर : शासनाने शेतकऱ्यांना शेती मार्ग सुलभ व्हावेत या हेतूने सुरू केलेली पांदण रस्ता योजना सध्या पातुर तालुक्यात चर्चेचा आणि संशयाचा विषय ठरत आहे. या योजनेचा गैरवापर करून काही राजकीय प्रभावशाली व्यक्तींनी, अधिकाऱ्यांनी व संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्यांनी संगनमताने कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याची गंभीर चर्चा तालुक्यात खमंगपणे रंगत आहे.**

पातुर तालुक्यातील अनेक गावांमध्ये उन्हाळ्याच्या काळात रोजगार हमी योजनेअंतर्गत दाखवलेली पांदण रस्त्यांची कामे प्रत्यक्षात जेसीबी मशीन (व्हॅं) वापरून कामे करण्यात आली आहेत. मात्र, कागदोपत्री ही कामे मजुरांमार्फत झाल्याचे दाखवले गेले आहे. यात विशेष म्हणजे, जे मजूर दाखवले गेले आहेत, ते प्रत्यक्षात उच्च उत्पन्न गटातील व्यक्ती, बँक खात्यात कोट्यवधींच्या ठेवी असणारे, शासनाचे कर भरणारे नागरिक असल्याचेही समोर आले आहे.

या प्रकरणाची माहिती जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्याकडे तक्रारीच्या माध्यमातून पोहोचवण्यात आली असल्याची माहिती सूत्रांकडून प्राप्त आहे.

### स्थानिक रोजगार सेवकाची भूमिका संशयास्पद

या सर्व प्रकरणात स्थानिक रोजगार सेवक, काही अभियंते आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची संमती व सहभाग असल्याचे बोलले जात आहे. शासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमतानेच हे प्रकरण एवढ्या मोठ्या प्रमाणात घडले असावे, अशी शंका व्यक्त होत आहे.

### मालेगाव घटनेची पुनरावृत्ती?

अशाच स्वरूपाचा प्रकार शेजारील वाशिम जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यात ४ वर्षांपूर्वी समोर आला होता. तेव्हा अनेक कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते आणि काही अधिकाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले होते. आता पातुर तालुक्यात देखील तसाच प्रकार घडत असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

त्यांनी प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पांदण रस्ता योजनेतील कामांची सखोल चौकशी करण्यासाठी स्वतंत्र समितीची स्थापना केल्याची चर्चा असून ही चौकशी समिती लवकरच संबंधित गावांमध्ये जाऊन कामांची प्रत्यक्ष पाहणी करणार आहे.

### फोटो फसवणूक व वयोवृद्ध मजुरांची नावं

अनेक प्रकरणांमध्ये एकाच गटाचे फोटो वेगवेगळ्या ठिकाणच्या कामांमध्ये पुन्हा-पुन्हा वापरण्यात आले आहेत. तसेच या कामांमध्ये महिला मजुरांचा कुठेही सहभाग दिसत नाही, हे ही संशयास्पद ठरत आहे.

अधिक धक्कादायक बाब म्हणजे, ७० वर्षांवरील वृद्ध, जे शारीरिकदृष्ट्या मजुरीसाठी सक्षम नाहीत, अशा व्यक्तींना देखील योजनेच्या लाभार्थी मजुरांमध्ये सामील दाखवण्यात आले आहे.

शासनाच्या शेतकरीहिताच्या योजनेचा अशा प्रकारे दुरुपयोग होणे म्हणजे शेतकऱ्यांवर अन्यायच आहे. पातुर तालुक्यातील नागरिक, विशेषतः शेतकरीवर्ग यामुळे हतबल झाल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई होऊन वास्तव बाहेर यावे, अशी जनतेची मागणी आहे.

## दिशा निरीक्षण गृहातील अनागोंदी उघड

### बालीका सापडली, पण प्रश्न कायम



■ प्रतिनिधी | वाशिम ■

दिशा मुलींच्या निरीक्षण गृहातून पलायन केलेली बालीका अखेर नाट्यमय पद्धतीने पुन्हा हजर झाली असली तरी संस्थेतील व्यवस्थापन, सुरक्षा आणि प्रशासनाच्या भुमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. बालीका सापडली तरी सुत्रधार मात्र फरार असल्याचे चित्र आहे.

**गंभीर व्यवस्थापन त्रुटी :** वाशिम येथील गव्हाणकर नगरमध्ये असलेल्या 'दिशा' या मुलींच्या निरीक्षण गृहात अनेक गंभीर त्रुटी असल्याचे उघड झाले आहे. बुलढाणा येथील पिपल्स एज्युकेशन सोसायटीतर्फे चालवले जाणारे हे गृह 'काळजी व संरक्षण' या उद्देशाने चालवले जाते. मात्र, येथे कायमस्वरूपी महिला अधीक्षिका आणि महिला सुरक्षारक्षक नसल्यामुळे मुली असुरक्षित असल्याचे वारंवार निदर्शनास आले आहे.

**पालकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष :** पलायन केलेल्या बालीकेच्या पालकांनी पूर्वीच निरीक्षण गृहातील असुरक्षिततेची तक्रार जिल्हाधिकारी आणि महिला व बालविकास विभागाकडे केली होती. मात्र, या तक्रारींकडे दुर्लक्ष करण्यात आले. वेळेत योग्य ती कार्यवाही केली असती, तर बालीकेच्या पलायनाची वेळ आली नसती, असे पालकांचे म्हणणे आहे.

**नाट्यमय हजेरी, पण प्रश्न अनुत्तरित :** पलायन केलेली बालीका सहा दिवसांनंतर नाट्यमय पद्धतीने स्वतःच हजर झाली. या काळात ती नेमकी कुठे होती? तिने पलायन का केले? निरीक्षण गृहात तिच्यासोबत काय घडले? या प्रश्नांची उत्तरं अजूनही मिळालेली नाहीत.

**प्रशासनाची निष्क्रियता? :** महिला व बालविकास विभाग, पुणे आणि जिल्हा प्रशासनाकडून खाजगी संस्था चालकांना पाठीशी घालण्याचा आरोप वारंवार होत आहे. लाखो रुपयांचा निधी काळजी व संरक्षणासाठी देण्यात येतो, पण अधिकारी व कर्मचारीच त्याचा लाभ घेत असल्याच्या तक्रारी समाजात उठत आहेत.

**मुलींच्या संरक्षणात पुरुष कर्मचारी? :** दिशा निरीक्षण गृहात मुलींसाठी महिला अधिकाऱ्यांची गरज असूनही येथे पुरुष कर्मचारी कार्यरत आहेत, ही बाब अधिक चिंताजनक आहे. एक महिला स्वयंपाकी आणि दोन महिला काळजीवाहक रात्रीच्या ड्युटीवर असतात. मात्र, सुटीच्या दिवशी सुरक्षा व्यवस्था कोणी पाहते? हा गंभीर प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे.

**मुदतवाढ नाकारण्याची मागणी :** या सर्व प्रकारावरुन संतप्त झालेल्या सामाजिक संघटना आणि राजकीय पक्षांनी दिशाला पुढील कालावधीसाठी मुदतवाढ न देता संस्थेवर कठोर कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. जिल्ह्यात शासकीय निरीक्षण गृह स्थापन करण्यासाठी लवकरच आंदोलन छेडले जाणार आहे.

**जनतेची मागणी :** संबंधित दोषींवर तातडीने कार्यवाही करण्यात यावी, दिशाच्या कारभाराची सखोल चौकशी व्हावी, आणि बालिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शासकीय निरीक्षण गृह सुरु करण्यात यावे.

## मोकाट वळूची वेदनेतून डॉ. वनवे व पशु सेवकांनी केली सुटका

■ प्रतिनिधी | कारंजा ■

शहरातील बायपास परिसरात एक मोकाट वळू सांड हा लंगडत लंगडत वेदनांना चालत असलेला काही पशुसेवकांना दिसला. त्याच्या वेदनाचं कारण पाहिलं तर त्याच्या पायामध्ये एक भला मोठा तार खिळा घुसल्याचे लक्षात आले व तो वेदनेने चालत असल्याचे निदर्शनास आले. तेव्हा परिसरातील पशुसेवकांनी त्याला थांबवून तो खिळा काढण्याचा प्रयत्न करून पाहिला, परंतु तो वळू ताकतवान असल्याने पशु सेवकांना कुठल्याच प्रकारे दाद देत नव्हता. अनेक प्रयत्न करून सुद्धा तो वळू आटोक्यात येत नव्हता.

शेवटी गोसेवक अक्षय लोटे यांनी पशुवैद्यकीय अधिकारी डॉक्टर वनवे व त्यांची चमू यांना पाचारण केले. यामध्ये पशु गोसेवक अक्षय लोटे व ईतर सेवक सुद्धा हजर होते.



अनेक प्रकारे प्रयत्न करून शेवटी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्या वळूला गुंगीचे इंजेक्शन मोठ्या शिताफिने देऊन अर्ध्या तासानंतर त्या वळूला थोडीशी गुंगी आली व तेवढ्यात सर्व पशु सेवकांनी त्याचे पाय बांधून मोठ्या हुशारीने वळूच्या पायातील खिळा काढला. डॉ. वनवे, आकाश देशमुख व वैभव यांनी ताबडतोब इंजेक्शन ड्रेसिंग करून वेदनेतून त्या वळूची सुटका केली.

## दिशा गृहातील पळून गेलेल्या बालीकेला गजानन पडघान यांच्या मध्यस्थीने राजकुमार पडघान यांनी केले दिशा गृहात सादर

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील गव्हाणकर नगर येथे असलेल्या दिशा मुलींचे निरीक्षण गृह एका शासनमान्य संस्था चालवते.या दिशा निरीक्षण गृहामधून मुलगी दि १४ जून रोजी दिशा गृहाच्या निष्क्रियतेमुळे पलायन केले होते.

त्यामुळे हे दिशा निरीक्षण गृह किती क्रीयाशील आहे.यावर प्रश्न चिन्ह निर्माण होत आहे.सविस्तर वृत्त असे की,या मुलीला मंगरूळपीर पोलीस स्टेशन च्या सांगण्यावरून दिशा निरीक्षण गृह वाशीम येथे दाखल केले होते.परंतु या निरीक्षण गृहाच्या निष्क्रियतेमुळे व निष्काळजीपणाने या निरीक्षण हे गृहातील कर्मचारी हे कीती कर्तव्यदक्ष आहेत यावरून दिसून येते.

ही मुलगी दि.१४ जून रोजी निरीक्षण गृहातून पळून गेल्याने दिशा निरीक्षण गृहाच्या कर्मचारी यांची तारांबळ उडाली होती.परंतु एक महीला व पलायन केलेली मुलगी अचानक पणे वाशीम जिल्हा न्यायालयाच्या परिसरात मध्ये दि २० जून रोजी अंदाजे १२:०० वाजता समाजसेवक राजकुमार पडघान व अरूण शेळके असतांनाही त्या महीलेने व मुलीने ओळख नसतानाही जवळ येऊन परिस्थिती कथन केली.त्यावरून राजकुमार पडघान यांनी जिल्हा महीला व बालविकास अधिकारी गजानन पडघान यांना फोन करून हकीकत सांगितली.

त्यांवर गजानन पडघान यांचेकडे त्या मुलीला राजकुमार पडघान व अरूण शेळके घेऊन गेले.गजानन पडघान यांनी त्या मुलीला चांगल्याप्रकारे समजावून सांगितले व गजानन पडघान यांनी जिल्हाधिकारी यांचेशी चर्चा करून मुलीला पुढील कार्यवाहीसाठी व मुलींच्या सुरक्षेसाठी दिशा निरीक्षण गृहाच्या कर्मचारी यांच्याकडे दि २१ जून रोजी राजकुमार पडघान व अरूण शेळके समक्ष स्वाधीन केले.नंतर पुढील कार्यवाही सुरू होती.

त्यामुळे जिल्हा महीला बालविकास अधिकारी गजानन पडघान यांच्या कार्याची प्रशंसा होवून समाजसेवक राजकुमार पडघान व अरूण शेळके यांचे कौतुक होत आहे.

## भाजपा शहराच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा



■ प्रतिनिधी | वाशिम ■

योग ही भारताने संपूर्ण जगाला दिलेली प्राचीन आणि अमूल्य देणगी आहे. योग ही केवळ शारीरिक आरोग्याची नव्हे, तर मानसिक व आध्यात्मिक आरोग्याची वाट आहे. 'योगा फॉर सेल्फ अँड सोसायटी' या संकल्पनेवर आधारित हे अभियान आज जागतिक पातळीवर विस्तारत आहे,' असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अकराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आपल्या संदेशात स्पष्ट केले.

त्याच प्रेरणेतून आणि वाशिम-मंगरुळचे आमदार श्याम रामचरण खोडे यांच्या उत्साही आवाहनामुळे वाशिम शहरात विविध ठिकाणी मोठ्या उत्साहात योग शिबिरे संपन्न झाली. विविध समाजघटक, संस्था आणि नागरीकांनी या शिबिरांमध्ये आपला सक्रीय सहभाग नोंदवला. त्याचाच एक भाग म्हणून भारतीय जनता पक्ष वाशिम शहराच्या वतीने योग दिनानिमित्त योग शिबिराचे आयोजन श्री बालाजी मंदिर समोरील प्रांगणात करण्यात आले. शिबिरात देव पेठ, काळे फाईल, गोंदेश्वर परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

या योग शिबिराचे मार्गदर्शन वाशीम येथील सुप्रसिद्ध पतंजली योगपीठ द्वारा पदवी प्राप्त योग प्रशिक्षिका सौ. तारा राजू कलवार यांनी केले. त्यांच्या कुशल मार्गदर्शनात योगाच्या विविध आसनांबरोबरच प्राणायाम, ध्यान व दिनचर्येत योगाचे महत्त्व यावर मार्गदर्शन करण्यात आले. शिबिरादरम्यान वेदिका भालेराव, सानवी नवलकर व वैष्णवी राऊत या लहान मुलींनी सादर केलेले लाठीकाठीचे आकर्षक प्रात्यक्षिक विशेष कौतुकास्पद ठरले. योगाच्या प्रचार-प्रसारामध्ये बाबा रामदेव आणि पतंजली योगपीठ यांचे योगदान अत्यंत मोलाचे ठरले आहे. त्यांनी योग आणि आयुर्वेद या भारतीय परंपरेला आधुनिक स्वरूपात लोकांपर्यंत पोहोचवले. त्यांचे योग सत्र, प्रशिक्षण शिबिरे, आणि टीव्हीवरील कार्यक्रमांमुळे सामान्य माणसालाही योग सुलभ व उपयोगी वाटू लागला.

## जिल्हास्तरीय खुल्या पुरुष गट खो-खो स्पर्धा उत्साहात



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वत्सगुल्म क्रीडा मंडळ आयोजित तसेच वाशिम जिल्हा खो-खो असोसिएशन च्या मान्यतेने खो -खो चा महासंग्राम जिल्हास्तरीय खुल्या पुरुष गट खो-खो स्पर्धा नुकत्याच वाशिम जिल्हा क्रीडा संकुल येथे पार पडला असून यामध्ये जिल्हा भरातून विविध क्रीडा मंडळाचे खो-खो चे संघ दाखल झाले होते. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे बक्षीस ५००१ रुपये तथा ट्राफि मालेगाव तालुक्यातील चिवरा येथील तुळजाई क्रीडा मंडळाने तर दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस ३००१ रुपये तथा ट्रॉफी वाशिम येथील यजमान असलेले वत्सगुल्म क्रीडा मंडळ वाशिम यांनी तर तिसऱ्या क्रमांकाचे २००१ रुपयांचे बक्षीस वाई येथील बिरुजी मस्के विद्यालय वाई यांनी पटकावले आहे. या कार्यक्रमाचे उदघाटन ,जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर बोंडे ,सुमित मापारी यांच्या हस्ते करण्यात आले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजस्थान कॉलेज चे प्राचार्य प्रा डॉ ओमप्रकाश झंवर हे होते ,तर प्रमुख उपस्तिथी म्हणून जिल्हा खो-खो असोसिएशन चे सचिव गोविंद राऊत ,प्रा डॉ पुरुषोत्तम वानखेडे ,सुनील कांबळे ,विशाल राऊत ,कैलास भोयर हे होते.

# कृषी विभाग कारंजा व वाशीम यांच्याकडून शासकीय अधिनियमांची ऐशी तैशी

## ■ आरिफ शाहांचे अज्ञान... ? की अधिका-याचा बचाव करण्याचा प्रयत्न... ?
## ■ ता.कृ.अधिकारी भोसलेनी नियमाला टांगले वेशिवर.

■ प्रतिनिधी | कारंजा ■

**तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कारंजा (लाड) येथील कर्मचारी व अधिकाऱ्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाला अक्षरशः वेशीवर टांगून, नियम व अटींचे उल्लंघन करून मनमानी कारभार सुरू केला आहे. संबंधित कर्मचारी व अधिकाऱ्यांची मनमानी व शासनाच्या अधिनियमांची अवहेलना करून नियमाला तिलांजली देणाऱ्या कृतीची तक्रार प्रशांत ठाकरे यांनी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, वाशिम आरिफ शाह यांच्याकडे सादर केली असता त्यांनी कर्मचारी व अधिकाऱ्याची चुकीची बाजू लावून धरून संबंधितांचा बचाव करण्याचा प्रयत्न करीत आहेत.**

सविस्तर वृत्त असे की, शासनाची अति महत्वाकांक्षी योजना 'नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प' (पोकरा योजना ) अंतर्गत कारंजा तालुक्यातील दोन गावामध्ये झालेल्या कामामध्ये भ्रष्टाचाराची साशंकता असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम अन्वये रीतसरपणे अर्ज सादर करून जनमाहिती अधिकारी, ता.कृ.अधिकारी कार्यालय, कारंजा (लाड) यांना रीतसर माहितीची विचारणा केली. परंतु संबंधित जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत कर्मचाऱ्याने विहित मुदतीत माहिती पुरविली नाही.

विहित मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम अन्वये सादर केलेल्या अर्जाचे संबंधितांना स्मरण होण्याहेतू स्मरणअर्ज सादर केला. परंतु गेंड्याची कातडी ओढल्याप्रमाणे मठ्ठ प्रवृत्तीच्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या नियम, अधिनियम आणि शासकीय परिपत्रकाचे कोणत्याही प्रकारे सोयरसुतुक नसल्याचे त्यांच्या कृतीतून दिसून आले. विहित मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी अश्विनी भोसले यांच्याकडे रीतसरपणे प्रथम अपील अर्ज सादर केला. माहितीचा अधिकार अधिनियमाचे पुरेसे ज्ञान नसणाऱ्या अपिलीय अधिकाऱ्यानी त्यांच्या अधिनस्थ कर्मचाऱ्याप्रमाणे शासनाचे नियम, परिपत्रक व अधिनियमाला फाट्यावर मारण्याची कृती केली. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार अपील अर्जावर निर्णय घेणे हे न्यायिकवत कार्य आहे. म्हणून न्याय फक्त दिला जाऊ नये तर तो दिल्याचे दिसूनही यायला हवे याकडे अपिलीय प्राधिकाऱ्याने लक्ष देणे आवश्यक आहे.असे करताना अपीलीय प्राधिकाऱ्याने दिलेला आदेश हा त्यांनी घेतलेल्या निर्णयाचे समर्थन करणारा असा आदेश असायला हवा. पहिल्या अपिलीय प्राधिकाऱ्याने अपील प्राप्त झाल्यानंतर तीस दिवसाच्या आत अपील निकालात काढावे, अपवादात्मक प्रकरणात





अपिलीय प्राधिकारी प्रकरण निकालात काढण्यासाठी ४५ दिवस घेऊ शकेल. याप्रकारचा स्पष्ट उल्लेख मा.अ. अधिनियमामध्ये असतांनाही कोणताही निर्णय, आदेश प्राप्त झाला नाही. कृषी विभाग कारंजा(लाड) येथील कर्मचारी व अधिकाऱ्यांनी शासनाच्या नियमाची, अधिनियमाची व शासकीय परिपत्रकाची अवहेलना केल्यामुळे दि. ०५ मे २०२५ रोजी आरिफ शाह जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,वाशिम यांच्याकडे 'नियमाचे, अधिनियमाचे व शासकीय परीपत्रकाचे उल्लंघन करून कर्तव्यात कसूर केल्यामुळे संबंधिताविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्याकरिता' तक्रार सादर केली. परंतु 'एकमेका सहाय्य करू,अवघे धरू सुपंथ' या उक्तीप्रमाणे आरिफ शाह जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, वाशिम यांनी आपल्या अज्ञानपणाचे दिवे लावून 'आपण आपणास माहिती मिळाली नाही किंवा दाखल केलेल्या अपिलावर सुनावणी झाली नसेल तर, आपणास राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करता येईल.' या प्रकारचा अमूल्य सल्ला देण्याचे महान कार्य करण्यात आले आहे. मा.अ.अधिनियमाद्वारे रीतसरपणे अर्ज करून माहिती मागणे व मागणी केलेली माहिती विहित मुदतीत पुरविणे याबाबत शासनाकडून शासन निर्णय,परिपत्रक व अधिनियमाची निर्मिती झालेली आहे. शासनाच्या कार्यात पारदर्शकता यावी या दृष्टीने माहितीचा अधिकार अधिनियम याची निर्मिती झाली. याबाबत शासनाने वेळोवेळी अधिनियमामध्ये संशोधन करून शासन निर्णय व परिपत्रक निर्गमित केलेले आहे. तालुका कृषी अधिकारी यांचे कार्यालयामध्ये मा.अ.अधिनियम संबंधित कोणत्याही कृतीची, नियमाची अंमलबजावणी करण्यात आली नाही. त्यामुळे शासनाने मा.अ. अधिनियमा संबंधित निर्गमित केलेल्या शासन निर्णय व परिपत्रकाची अवहेलना होऊन नियमाचे उल्लंघन झालेले असल्यामुळे वरिष्ठ अधिकारी आरिफ शहा यांच्याकडे रीतसर लेखी तक्रार दाखल केली. परंतु संबंधित वरिष्ठ अधिकारी शासनाच्या नियम, निर्णय, परिपत्रकाची कायदेशीर बाजू न घेता दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांचा बचाव करण्याची भूमिका बजावण्यात धन्यता मानीत आहे. शासन परिपत्रक,अधिनियम, नियम व कायदा हा फक्त सामान्य नागरिकांना लागू असून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन अमलात आणणे व पालन करणे हे फक्त आणि फक्त सामान्य नागरिकांनाच लागू आहे काय असा प्रश्न उपस्थित होतो. शासकीय कर्मचारी व अधिकारी यांना शासनाच्या कोणत्याही नियमाचे याबाबतीत कोणत्याही प्रकारचे बंधन असल्याचे दिसून येत नाही. शासकीय कार्यालयात जबाबदार व्यक्ती व पदावरील अधिकाऱ्यांने सामान्य नागरिक,जनतेची दिशाभूल करून त्यांना त्यांच्या अधिकारापासून वंचित ठेवणे हे कृत्य अधिकाऱ्याच्या कर्तव्यपालनाच्या विरोधातील बाब आहे.

शासनाला अधिनियमानुसार किंवा परिपत्रकानुसार अपेक्षित असलेली कृती, कार्य न करणे म्हणजेच शासनाच्या परिपत्रकाचे व अधिनियमाचे उल्लंघन करणे होय. शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध कायद्यातील कलम (१०)( २)( ३) प्रमाणे 'शासकीय अधिकाऱ्याने /कर्मचाऱ्यांनी नेमून दिलेले काम त्यांच्याशी संबंधित असलेले कर्तव्य पार पाडताना जाणून बुजून किंवा हेतू पुरस्सर दुर्लक्ष केले असेल तर त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा, शिस्त व अपील नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करता येते' अशा अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या गोपनीय अहवालात कर्तव्यपालनात केलेली कसूर नमूद करण्याच्या तरतुदीप्रमाणे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी. अशा प्रकारचा स्पष्ट व अर्थबोध होणारा नियम व कायदा कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्याकरिता शासनाने अस्तित्वात आणलेला आहे. कृषी विभागातील जिल्ह्याचे वरिष्ठ अधिकारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, वाशिम आरिफ शाह यांच्याकडे सादर केलेल्या तक्रार अर्जामध्ये सविस्तरपणे लिखित स्वरूपात, सपुरावा तक्रार सादर करूनसुद्धा या वरिष्ठ अधिकाऱ्यांना तक्रार अर्जाचे गांभीर्य लक्षात आलेले दिसत नाही. उलटपक्षी दोषी कर्मचारी व अधिकाऱ्याचा बचाव करून मागणी केलेली माहिती मिळविण्यासाठी द्वितीय अपील सादर करण्याचा अमूल्य सल्ला देण्यास मात्र अजिबात विसरले नाही. सादर तक्रार अर्जानुसार मूळ मुद्दा माहिती मिळविण्याचा नसून शासनाचे कर्मचारी व अधिकाऱ्यांनी शासनाच्या नियम, अधिनियम, परिपत्रक यांचे हेतूपुरस्सरपणे केलेले उल्लंघन होय.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक २०८ ■ सोमवार, २३ जून २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## वर्धा भाजी बाजारात निम्म्याहून अधिक भाजीपाला येतोय जिल्ह्याबाहेरून, तरीही शेतकऱ्यांचा विरोध !

### -भाजी बाजार भरणार पहाटे ३ ते सकाळी ८ पर्यंत





**वर्धा जनमाध्यम-** सध्या जिल्ह्यात भाजीपाला बाजारपेठत येण्याची आवक घटली आहे. इतकेच नव्हे तर निम्म्याहून अधिक भाजीपाला जिल्ह्याबाहेरून वर्ध्यात येत आहे. तरीही भाजी बाजाराच्या वेळेत एक जुलैपासून बदल होत असून. अडते आणि शेतकऱ्यांनी विरोध केला आहे, जर वर्धा भाजी बाजारात निम्म्यापेक्षा जास्त भाजी बाहेर जिल्ह्यातून येत असेल तर येथील शेतकऱ्यांचा विरोध का असा प्रश्न काही भाजी विक्रेतां समोर येत आहे.

स्थानिक बजाज चौक येथील मुख्य भाजी बाजार कोरोना काळात कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात गेला होता, तेव्हापासून कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात भाजी बाजार सुरू होता, आता या भाजी बाजारात होलसेल भाजी बाजार पहाटे ३ ते सकाळी ८ वाजेपर्यंत चा आदेश काढण्यात आला आहे, चिल्लर भाजी बाजार बजाज चौक येथे भरणार असल्याचे सांगण्यात आले, मात्र यासाठी अडते आणि शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला आहे,

सध्या वर्धा भाजी बाजारात बाहेर जिल्ह्यातून भाज्या येत आहे, विशेष म्हणजे संभाजीनगर व आंध्र प्रदेशातील टोमॅटो सध्या वर्ध्यात विक्रीसाठी येत असून हाच टोमॅटो वर्ध्याकरांना आंबट-गोड चव देत प्रत्येक घर व हॉटेल मधील खाद्यपदार्थ रुचकर करीत आहे.

वर्धा जिल्ह्यातील शेतक-यांनी पिकविलेली चवळी, पालक, मेथी, वांगी, गवार, ढेमस हा भाजीपाला सध्या जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या वर्धा बाजार समितीच्या भाजी बाजारात विक्रीसाठी येत आहे.

तर इतर निम्म्याहून अधिक भाजीपाला जिल्ह्याबाहेरूनच वर्ध्यात विक्रीसाठी येत आहे. संभाजीनगर व आंध्र प्रदेशातून टोमॅटो, यवतमाळ जिल्ह्यातून कोथींबीर, बुलढाणा जिल्ह्यातील फुल कोबी, मुलताई येथील पत्ता कोबी प्रामुख्याने वर्धा येथील भाजी बाजारात विक्रीसाठी येत असल्याचे सांगण्यात आले.

**बजाज चौकातील भाजी बाजाराला विरोध तर सर्व भाजी बाजार समितीच्या आवारात**

होलसेल भाजी विक्रेतांना सोडून चिल्लर भाजी बाजार बजाज चौक येथील भाजी बाजारात स्थलांतर करण्यासाठी समितीने आदेश काढले आहे, मात्र या आदेशाला काही भाजी विक्रेत्यांनी केराची टोपली दाखविली आहे, जर बजाज चौकात चिल्लर भाजी बाजार येत नसेल तर सर्व भाजी बाजार समितीच्या आवारात भरविण्यात यावी अशी मागणी काही भाजी विक्रेत्यांनी केली आहे,

या भाजी मार्केटमध्ये अंदाजे २७० अडते आहेत, त्यात २५ अडते ठोक व्यापारी, तर २५ अडते आलू कांद्याचे व्यापारी आहेत, उर्वरित २०० अडते चिल्लर विक्रेते असून कृषी उत्पन्न बाजार समितीने रीतसर परवाना देऊन अडत्यांपासून वर्षाला २५०० ते ५००० रुपये शेष घेतात, मात्र या चिल्लर विक्रेत्यांनी बजाज चौकातील भाजी बाजारातील दुकाने १० ते १५ हजार रुपयांनी किरायाने दिले आहे, याच कारणाने हे अडते बजाज चौकात भाजी बाजार आणण्यासाठी विरोध करीत असल्याचे बोलले जात आहे.

## अल्लीपूर पोलिसांनी अवैध रेतीचा ट्रक पकडला

### -२५ लाखांचा मुद्देमाल जप्त



**अल्लीपूर जनमाध्यम :** अवैध रेतीची वाहतूक करणाऱ्या टिप्परवर कारवाई करीत अल्लीपूर पोलिसांनी २५ लाख १५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई रविवार २२ जून रोजी अलमडोह फाट्याजवळ करण्यात आली. याप्रकरणी टिप्परचा चालक व मालकावर अल्लीपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

अल्लीपूर पोलिस ठाण्यातील सहाय्यक पोलिस निरीक्षक विजयकुमार घुले, पोलिस उपनिरीक्षक अश्विनकुमार खेडीकर, कर्मचारी अजय रिठे, निखिल वासेकर, गणेश आव्हाड हे गस्तीवर असताना सिरसगावकडून अल्लीपूरकडे एक टिप्पर अवैधरित्या वाळूची वाहतूक करीत असल्याची माहिती पथकाला मिळाली. माहितीच्या आधारे अलमडोह फाट्याजवळ नाकाबंदी करण्यात आली.

यावेळी रेतीने भरलेला एक टिप्पर सिरसगावकडून येताना दिसला. टिप्परला थांबवून चौकशी केली असता परवाना तसेच वाहनाचे कागदपत्रही चालकाकडे आढळून आले नाही. त्याचे नाव विचारले असता गजानन नागोसे (४९) रा. साटोडा ता. वर्धा असे सांगितले.

पोलिसांनी त्याच्या ताब्यातून एम. एच. २९ बी. ई. ८६०४ क्रमांकाचा २५ लाख रुपये किंमतीचा टिप्पर तसेच १५ हजारांची रेती असा २५ लाख १५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी चालकासह मालकावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई ठाणेदार विजयकुमार घुले, पोलिस उपनिरीक्षक अश्विनकुमार खेडीकर, अजय रिठे, निखिल वासेकर, गणेश आव्हाड यांनी केली.

## पवनार धाम नदीपात्रात बुडून युवकाचा मृत्यू

### -रविवारी फिरायला गेलेल्या चार जणांपैकी एकाचा दुर्दैवी अंत



**वर्धा जनमाध्यम :** पवनार येथील धाम नदीपात्रात रविवारी २२ जून रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास पोहण्यासाठी गेलेल्या २६ वर्षीय युवकाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. यश चव्हाण (रा. रामनगर, वर्धा) असे मृत युवकाचे नाव आहे. मित्रांसोबत आलेल्या यशने खोल पाण्याचा अंदाज न घेताच पाण्यात उडी घेतली आणि काही क्षणांतच गडप झाला.

रविवारी साप्ताहिक सुटीचा दिवस असल्याने यश चव्हाण आपल्या मित्रांसह पारस सरोवरे, आशिष गाणार, प्रिन्स यादव पवनार येथे फिरण्यासाठी आले होते. धाम नदीपात्रावरील बंधाऱ्यावर चारही जण गेले होते. या ठिकाणी पोहण्यास सक्त मनाई असतानाही यशने एकट्याने पाण्यात उतरण्याचा निर्णय घेतला. मित्रांनी त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला, मात्र तो ऐकला नाही. पोहता-पोहता काही अंतर गेल्यानंतर परत येताना यशला दम लागून तो पाण्यात बुडू लागला. यावेळी उपस्थित मित्रांनी व काही स्थानिकांनी त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र प्रयत्न अपयशी ठरले आणि यश पाण्यात गडप झाला.

घटनेची माहिती मिळताच पोलीस पाटील आम्रपाली ढोले यांनी सेवाग्राम पोलिसांना सूचित केले. त्यानंतर पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. यशचा मृतदेह शोधण्यासाठी शोधमोहीम सुरु करण्यात आली असून काही वेळानंतर स्थानिक अर्जुन सातघरे आणि दीपक सातघरे यांच्या मदतीने मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात आला. शवविच्छेदनासाठी प्रेत वर्धा येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले आहे. घटनास्थळी यशच्या कुटुंबीयांनी धाव घेतली असता त्यांचा आक्रोश हृदयद्रावक होता.

**प्रशासनाचे दुर्लक्ष?**

धाम नदी परिसरात शनिवार आणि रविवारी नागरिकांची मोठी गर्दी होत असते. अशा गर्दीच्या दिवशी योग्य बंदोबस्त, जीवनरक्षक कर्मचारी व उपाययोजना नसल्यामुळे अशा दुर्दैवी घटना घडतात, गर्दीच्या दिवशी या ठिकाणी बंदोबस्त लावण्यात यावा आणि अशा अप्रिय घटना टाळाव्या अशी मागणी नागरिकांची होत आहे. या प्रकरणी सेवाग्राम पोलिस ठाण्याचे पोलीस अधिकारी आशिष डफ, मनोज लोहकरे, एम. एच. कातकर तपास करीत आहे.

## गोशाळांनी गोवंश संवर्धनासाठी पुढे येऊन अनुदानाचा लाभ घ्यावा - पालकमंत्री डॉ.भोयर

### -गोशाळांना नोंदणी प्रमाणपत्राचे वितरण



**वर्धा जनमाध्यम :** राज्य शासनाने गोमातेला राज्यमातेचा दर्जा दिला आहे. अशा गोमातेच्या संवर्धन व संरक्षणासाठी राज्य शासनाच्यावतीने अनुदान देण्यात येते. गोशाळा संचालकांनी गोमातेच्या संरक्षणाची जबाबदारी स्विकारुन अनुदानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले.

पालकमंत्र्यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात गोशाळांना नोंदणी प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. जगदीश बुकतरे, जयंत येरावार, श्री. संत लहानुजी महाराज संस्थांचे अध्यक्ष सुरेश पावडे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. राजकुमार बिडकर आदी उपस्थित होते.

गोमातेचे मल, मुत्र विविध असाध्य आजारावर गुणकारी असून गाईचे दुध मानवी आहारात पौष्टिक मानले जातात. हिंदु संस्कृतीत गोमातेला पुज्यनिय स्थान प्राप्त झालेले आहे. अशा गोमातेचे संवर्धन करणे ही काळाजी गरज आहे. गोमातेचे संरक्षण व संवर्धन करणाऱ्या गोशाळांना शासनाच्यावतीने पुर्वी प्रत्येक जिल्ह्यात एका गोशाळेला १ कोटीचे अनुदान देण्यात येत होते. परंतु शासनाने आता जिल्ह्यातील जास्तीत जास्त गोसेवा आयोगाकडे नोंदणी केलेल्या गोशाळांना अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे गोशाळा संचालकानी गोसेवा आयोगाकडे नोंदणी करुन अनुदानाचा लाभ घ्यावा, असे पालकमंत्री म्हणाले.

देशी गायीचे पालनपोषण करण्याकरीता प्रेरीत करण्यासाठी राज्य शासनाने देशी गायीस राज्यमाता गोमाता म्हणून घोषित केले आहे. देशी गोवंश संवर्धन व कल्याणासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांचे पर्यवेक्षण करण्यासाठी गोसेवा आयोग गठीत करण्यात आला आहे. आयोगाकडे नोंदणी केलेल्या गोशाळांना गोसेवा संवर्धनासाठी प्रती गाय अनुदान वितरीत करण्यात येत असल्याचे डॉ.बुकतरे यांनी सांगितले.

यावेळी पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्याहस्ते पिपल्स फॉर अनिमल्स पिपरी मेघे, गौरक्षण संस्था हिंगणघाट, श्री.लक्ष्मी नारायण मुरलीधर आणि आबाजी महाराज देवस्थान सोनेगाव आबाजी देवळी, हरीओम बाबा गोशाळा लसनपुर, सर्वोदय गोशाळा चरीटेबल ट्रस्ट पडेगाव, गोपिका गोरक्षण केंद्र माळेगाव ठेका, स्व. राधाकृष्ण बजाज गोशाळा चॅरीटेबल ट्रस्ट नालवाडी, श्री.संत लहानुजी महाराज संस्था टाकरखेडा, विद्या ग्रामीण शहरी डेव्हलप फाऊंडेशन, विश्व शांती साधना प्रतिष्ठाण मनोहरधाम दत्तपूर, जीवरक्षक फाऊंडेशन हिंगणघाट या गोशाळेच्या संचालकांना गोशाळा नोंदणी प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमला गोशाळांचे संचालक उपस्थित होते.

## शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करून सातबारा कोरा करा

### उपविभागीय कार्यालयावर राकाँची धडक



**हिंगणघाट जनमाध्यम :** विधानसभा निवडणूक काळात शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. सरकार स्थापन होऊन ६ महिने लोटल्यानंतरही अद्याप शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जमाफीच्या आश्वासनाची पूर्तता करण्यात आलेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी असून राज्य सरकारने शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करून सातबारा कोरा करावा, यासह अन्य मागण्यांना घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने उपविभागीय कार्यालयावर धडक दिली.

सन २०२१ पासून जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी शेती पंपांसाठी महावितरणकडे पारंपरिक विद्युत जोडणीसाठी अर्ज केले आहेत. मात्र, २०२५ उजाडूनही अनेक अर्ज अद्याप प्रलंबित आहेत. जिल्ह्यात सुमारे ११९० शेतकऱ्यांनी विहिरी पूर्ण करून डिमांड अर्ज सादर केलेले असतानाही त्यांना विद्युत जोडणी मिळालेली नाही. महावितरणकडून आता या डिमांड अर्जाचे धनादेश परत करण्याच्या सूचना देण्यात येत असून, शेतकऱ्यांवर सोलर पंप घेण्याची सती करण्यात येत आहे. ही सती पूर्णपणे अन्यायकारक आहे. सोलर पंप हे आर्थिकदृष्ट्या महागडे असून त्यातून मिळणारा पाण्याचा फोर्स अपुरा असतो, जो ओलितासाठी पुरेसा नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना पारंपरिक विद्युत कनेशनसह पंपच हवा आहे. महावितरणचे अधिकारी मंत्रालयातील आदेशाचे कारण देत शेतकऱ्यांच्या अडचणी अधिकच वाढवत आहेत. परिणामी, अनेकांची शेती रखडली असून पाण्याअभावी उत्पादनात घट झाली आहे. त्याचे नुकसान कोण भरून काढणार, असा प्रश्नही उपस्थित केला आहे.

'सन २०२१-२५ या कालावधीत पारंपरिक विद्युत कनेक्शनसाठी केलेल्या सर्व डिमांड अर्जांना तात्काळ मंजुरी द्यावी, सोलर पंपाची सती थांबवून शेतकऱ्यांना पर्याय निवडीचा अधिकार द्यावा, ११९० विहीरधारक शेतकऱ्यांना प्राधान्याने पारंपरिक विद्युत कनेक्शन द्यावे, २०२१ पासून झालेल्या शेती नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली.राज्य सरकार व महावितरणने यावर तात्काळ निर्णय न घेतल्यास राष्ट्रवादी काँग्रेस शप गटाच्या वतीने लढा तिव्र करण्याचा इशाराही निवेदनातून दिला आहे. यासंदर्भातील निवेदन उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

यावेळी वर्धा जिल्हाध्यक्ष सुनील राऊत, माजी आमदार वसंत बोंडे, प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले, जिल्हा निरीक्षक सुरेश गुडधे पाटील, माजी नगराध्यक्ष बबन हिंगणेकर, नागपूर जिल्हाध्यक्ष प्रवीण कुंठे पाटील, समुद्रपूर तालुकाध्यक्ष महेश झोटिंग पाटील, सहकार नेते वासुदेव गौळकार, तालुकाध्यक्ष विनोद वानखेडे, समाजसेवक सुनील डोंगरे, सुधाकर खेडकर, प्रशांत घवघवे, प्रभाकर रेवतकर, मारोती महाकाळकर, शेखर जाधव, प्रशांत लोणकर, संदीप किटे, प्रणय कदम, यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गोठ्यात बांधून असलेल्या म्हशीवर वाघाच्या हल्ल्यात म्हैस ठार

**गिरड जनमाध्यम :** भवानपूर येथील गावाशेजारील गोठ्यात बांधून असलेल्या म्हशीवर वाघाने हल्ला करून ठार केले. ही घटना रविवार २२ जून रोजी पहाटे ५ वाजताच्या सुमारास घडली. यात शेतकऱ्याचे ४० हजारांचे नुकसान झाले. भवानपूर येथील शेतकरी शंकर वाकडे यांची गावाशेजारील गोठ्यामध्ये ५ म्हशी व जनावरे बांधून होती. दरम्यान, रविवारी पहाटे ५ वाजताच्या सुमारास वाघाने एका म्हशीवर हल्ला करून जागीच ठार केले. तसेच म्हशीला दूर फरफट नेले.

शेतकरी सकाळी ६ वाजता गोठ्यात गेले असता ही घटना निदर्शनास आली. त्यांनी लगेच घटनेची माहिती गिरड येथील वनविभागाला दिली. माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी निलेश गावंडे यांच्या मार्गदर्शनात वनरक्षक पि. डी. बेले यांनी घटनास्थळी पोहचून पंचनामा केला. तसेच वाघाची हालचाल टिपण्यासाठी ट्रॅप कॅमेरे बसवण्यात आले आहे. नुकसानाची भरपाईची मागणी शेतकरी शंकर वाकडे यांनी केली आहे. गावाशेजारी वाघाचा वावर लक्षात येताच गावकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असून रात्रीच्या सुमारास कोणीही गावाबाहेर फिरकू नये, वाघापासून सावध राहावे, असे आवाहन वनपरिक्षेत्र अधिकारी निलेश गावंडे यांनी गावकऱ्यांना केले आहे.

## अरण्यऋषींना जीवरक्षक फाउंडेशनच्या मुक्या प्राण्यांनी दिली श्रद्धांजली !

**हिंगणघाट जनमाध्यम :** येथील जीवरक्षक फाउंडेशन रेस्क्यू सेंटर मध्ये अरण्यऋषी ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मारुती चितमपल्ली यांना श्रद्धांजली देण्याचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात मान्यवरांसह कुत्री, मांजरींनी हजेरी लावून एकप्रकारे अरण्यऋषीला मूक श्रद्धांजलीच दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सतीश वखरे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून वन्यजीवरक्षक राकेश झाडे, दीपक जोशी, शुभम घोडे, मोहन पेरकुंडे, प्रशांत वैद्य उपस्थित होते.

यावेळी सतीश वखरे यांनी चितमपल्ली यांचा जीवन प्रवास उलगडला. १८ जून रोजी संध्याकाळी ७ वाजता अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांची प्राणज्योत मावळली. त्यांनी वयाचे ६५ वर्ष जंगलात घातली. विदर्भातील मेळघाट, नवेगाव बांध, नागझिरा अशी अनेक जंगलात त्यांचे वास्तव्य होते. त्यांना लहानपणापासून त्यांच्या हनमंत मामांनी त्यांना जंगलात नेले. तेच त्यांचे दुसरे गुरू ज्यांनी त्यांना वनस्पती, पक्षी, झाडे-झुडपे याबद्दल माहिती दिली. तेव्हापासून त्यांना पर्यावरणविषयी आवड निर्माण झाली होती, असेही त्यांनी सांगितले. संचालन गोपाल मांडवकर यांनी केले तर आभार नितीन क्षीरसागर यांनी मानले. कार्यक्रमाला जिवरक्षक सेंटरमधील कुत्री, मांजरींनीही मुकपणे कार्यक्रमाला हजेरी लावून एकप्रकारे अरण्यऋषींना श्रद्धांजली अर्पण केली.

## महावितरणचे स्मार्ट मीटर प्रीपेड नव्हे तर पोस्टपेडच - संचालक सचिन तालेवार

**वर्धा जनमाध्यम :** महावितरणकडून बसवण्यात येत असलेले स्मार्ट मीटर हे 'प्रीपेड' नसून, नेहमीच्या मीटरप्रमाणे 'पोस्टपेड'च असतील, असे महावितरणचे संचालक (संचलन व प्रकल्प) सचिन तालेवार यांनी आज (दि. २२) नागपूर येथे सांगितले. या नव्या मीटरमध्ये केवळ 'कम्युनिकेशन'ची अतिरिक्त सुविधा उपलब्ध असून, यामुळे ग्राहकांना आपल्या वीज वापराचे अधिक प्रभावीपणे नियोजन करता येणार आहे.

संचालक तालेवार यांनी स्पष्ट केले की, थकबाकीदार ग्राहकांना पूर्वीप्रमाणेच वीजपुरवठा खंडित करण्यापूर्वी १५ दिवसांची पूर्वसूचना दिली जाईल. विशेष म्हणजे, मोबाईल ?पद्वारे ग्राहक आपल्या वीज वापराचे सविस्तर निरीक्षण करू शकतील आणि त्यावर नियंत्रण ठेवू शकतील. नागपूर येथील विद्युत भवन कार्यालयात आयोजित नागपूर परिक्षेत्रातील नागपूर, गोंदिया, चंद्रपूर, अमरावती आणि अकोला या पाचही परिमंडलांच्या संयुक्त आढावा बैठकीप्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांनी अनेक महत्त्वाचे निर्देश दिले.

ग्राहकांना अखंडित वीज पुरवठा आणि त्यांच्या तक्रारींचे त्वरीत निराकरण करण्यावर विशेष भर देण्याच्या सुचना करीत त्यांनी मार्च २०२५ च्या तुलनेत वाढलेली थकबाकी या महिन्यात शंभर टक्के वसूल करण्याचे तसेच चालू मागणीची संपूर्ण वसुली करण्याचे निर्देश तालेवार यांनी दिले. ग्राहक मॅपिंग, लोड शिफ्टिंग, एमएफ समस्या यांसारख्या विविध कारणांमुळे होणारे नकारात्मक आणि असामान्य नुकसान त्वरित दुरुस्त करण्याचे आदेश त्यांनी यावेळि दिले. एकाच पत्त्यावर असलेल्या एकापेक्षा अधिक वीज जोडण्यांची पडताळणी युद्धपातळीवर करण्याचे निर्देशही तालेवार यांनी दिले. रखडलेल्या प्रकल्पांना गती देण्यासाठी एजन्सींना पुरेसे साहित्य आणि अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करण्यासोबतच कामांची गुणवत्ता सुनिश्चित करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केल्या. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, मागेल त्याला सौर कृषी पंप, शेतीला दिवसा वीज पुरवठा, प्रधानंत्री सुर्यघर मोफ़त वीज योजना, वाहिनी विलगीकरण, सौरग्राम, मॉडेल सौर व्हीलेज, उपकेंद्र सक्षमीकरण, अधिक वीज हानी असलेल्या वाहिन्या, पैसे भरूनही प्रलंबित वीज जोडण्या, वीज वाहिन्यांची देखभाल व दुरुस्ती या विषयांचा देखील आढावा संचालक तालेवार यांनी यावेळी घेतला. या बैठकीला मुख्य अभियंता सर्वश्री सुहास रंगारी, दिलीप दोडके, हरिश गजबे, राजेश नाईक, अधीक्षक अभियंता सर्वश्री अमित परांजपे, मंगेश वैद्य, संजीव वाकडे, अनिल वाकोडे, दिपक देवहाते यांच्यासह नागपूर शहरातील सर्व कार्यकारी अभियंते उपस्थित होते.

# एसटी मालवाहतुकीला ब्रेक?

## कमाईपेक्षा खर्च अधिक असल्याने महामंडळाचा मोठा निर्णय

**मुंबई**-राज्य परिवहन (एसटी) महामंडळाच्या महसूलवाढीसाठी सुरू करण्यात आलेली मालवाहतूक सेवा आता बंद होण्याच्या मार्गावर आहे. एप्रिल २०२४पासून अखेरची घटका मोजत असलेल्या या सेवेने यंदाच्या पाच महिन्यांत केवळ १५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळवले आहे. विशेष म्हणजे, कमाईपेक्षा खर्च अधिक असल्याने महामंडळाने मालवाहतूक सेवा इतिहासजमा करण्याचा निर्णय घेतला आहे. एसटी महामंडळाच्या नियमांमध्ये प्रवासी वाहतुकीसह मालवाहतूक करण्याचा समावेश आहे. याचा आधार घेत २०१९मध्ये मालवाहतूक सुरू करण्याबाबत चाचपणी सुरू करण्यात आली. मालवाहतुकीसाठी आठ वर्षे पूर्ण



झालेल्या प्रवासी बसचे मालवाहतूक ट्रकमध्ये रूपांतर करण्यात आले. त्याचबरोबर राज्यातील ३००हून अधिक मोक्याच्या जागी गोदामे उभारण्याची तयारी महामंडळाने केली. मे २०२०मध्ये रत्नागिरी ते बोरिवली मार्गावर १५० आंब्यांच्या पेट्यांची वाहतूक करत महामंडळाने मालवाहतूक सुरू केली होती.

**गोदाम की, रहिवासी संकुल**

मालकीच्या स्थानक, आगार आणि मोकळ्या जागांचा पुनर्विकास करण्याचा निर्णय एसटी महामंडळाने घेतला आहे. महामंडळाने त्रिस्तरीय धोरणांतर्गत ७२ जागांची निश्चिती केली आहे. गोदाम उभारण्यासाठी महामंडळाने ३०० हून अधिक जागा निश्चित केल्या होत्या. आता मालवाहतूकच बंद होण्याच्या मार्गावर असल्याने गोदाम उभारण्याचा प्रश्नच निर्माण होणार नाही, असे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

### धोरणाचे अपयश

करोनानंतर महामंडळाने प्रवासी आणि मालवाहतूक पुन्हा सुरू केली, मात्र मालवाहतुकीला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. प्रवासी वाहतुकीतून बाद झालेल्या गाड्यांचे रूपांतर मालवाहू ट्रकमध्ये केले होते. त्याचा परिणाम मालवाहनाच्या क्षमतेवर आणि इंधनखर्चावर झाला. बाजारात स्पर्धेत असलेले मालवाहू ट्रक एसटीच्या तुलनेत अधिक माल नेण्यास सक्षम असल्याचे दिसून आले. मात्र, महामंडळाने धोरणात बदल केला नाही.

### कोटींवरून हजारापर्यंत घसरण

गेल्या आर्थिक वर्षात एसटी मालवाहतुकीची अत्यंत वाईट स्थिती होती. एप्रिल २०२४ ते मे २०२५ या कालावधीत एप्रिल आणि मे महिना वगळता अन्य महिन्यांत एक कोटींचा टप्पाही मालवाहतुकीला ओलांडता आला नाही. मे २०२४मध्ये १.६७ कोटींचा महसूल मिळवणाऱ्या मालवाहतुकीने मे २०२५मध्ये केवळ ४८ हजार रुपयांचा महसूल गोळा केल्याची नोंद महामंडळात आहे.

## पालखी सोहळ्याबाबत अबू आजमी यांचे वादग्रस्त वक्तव्य

**सोलापूर**-आपल्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे अनेकदा चर्चेत राहिलेले समाजवादी पक्षाचे आमदार अबू आजमी यांनी आणखी एक वादग्रस्त वक्तव्य केले. महाराष्ट्रात वारकऱ्यांच्या पालखी सोहळा सुरू असताना आजमी यांनी वादग्रस्त वक्तव्य केल्याने मोठा वाद होण्याची शक्यता आहे. पालख्यांमुळे रस्ता जाम होतो, हिंदूंचे सण साजरे केले जातात तेव्हा मुस्लिम व्यक्ती विरोध करत नाहीत. मात्र मुस्लिमांनी नमाज केल्यावर तक्रारी केल्या जातात असं विधान आजमी यांनी केले आहे.

पालख्यांमुळे रस्ता जाम होतो, रस्त्यावर अनेक हिंदूचे सण साजरे केले जातात कोणताही मुस्लिम व्यक्ती हिंदू सणाविरोधात तक्रार करत नाही. तर मग मुस्लिम व्यक्ती दहा मिनिटासाठी रस्त्यावर नमाज पठण केल्यावर तक्रारी केल्या जात आहेत. उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी तर रस्त्यावर नमाज पठण करणाऱ्याच पासपोर्ट रद्द करू अशी धमकी देतातय, असं म्हणत अबू आजमी यांनी



यांनी म्हटलं आहे.

नितेश राणे यांचे नाव न घेता समाजवादी पक्षाचे अबू आजमी यांनी नितेश राणेंवर निशाणा साधला आहे. महाराष्ट्र राज्यात दोन वेळा शपथ घ्यावी लागते. आमदार झाल्यावर आणि मंत्रिमंडळात समावेश झाल्यावर तरीही महाराष्ट्र राज्यातील मंत्री जातीवाद करत आहेत. हिंदी सक्ती बाबत बोलताना आमदार अबू आजमी यांनी भाषिक सूत्र सांगितलं. महाराष्ट्र राज्यात मराठीचा सन्मान झाला पाहिजे पण काश्मीर पासून ते कन्याकुमारी पर्यंत एक हिंदी भाषा होणे गरजेचे आहे.त्यामुळे महाराष्ट्र राज्यात मराठी हिंदी आणि त्यानंतर इंग्रजी असं भाषिक सूत्र असले पाहिजे असं अबू आजमी यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली. राज्यातील मराठी मुद्दे समोर करून राजकीय नेते जनतेची दिशाभूल करत आहेत.

समाजवादी पक्षाचे आमदार अबू आजमी रविवारी सकाळी सोलापुरातील शासकीय विश्रामगृह येथे पत्रकार परिषद घेतली. इजराइल आणि इराण युद्धात अमेरिकेने हल्ला केल्यानंतर आमदार अबू आजमी यांनी इराणच्या समर्थनार्थ वक्तव्य केले आहे. इंदिरा गांधी पंतप्रधान असताना अनेक पॅलेस्टाइनी नागरिकांना भारतात आश्रय दिला होता. सध्याच्या भारतीय पंतप्रधानांनी इराणला पाठिंबा द्यावा, अशी प्रतिक्रिया अबू आजमी यांनी दिली आहे. ज्यावेळी इजराईलने गाजा पट्टीत हल्ले करून अनेक निष्पाप लहान मुलांना ठार केले त्यावेळी अमेरिकेने का रोखले नाही, असा संतप्त सवाल अबू आजमी यांनी उपस्थित केला.

## संक्षिप्त

### 'या छोट्या गोष्टी स्कोअरबोर्डवर दिसत नाहीत'

**मुंबई** -भारत आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या पहिल्या कसोटी सामन्याच्या पहिल्या डावात भारतीय फलंदाजांनी धावांचा डोंगर उभारला आहे. यामध्ये कर्णधार शुभमन गिल, सलामीवीर यशस्वी जैस्वाल आणि यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंत यांनी शतके झळकावली आहेत. दरम्यान, मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने भारतीय फलंदाजांचे कौतुक करत, इंग्लंडविरुद्ध त्यांच्या डावपेचांचे सोशल मीडियावर विश्लेषण केले आहे.भारतीय संघाचा माजी फलंदाज सचिन तेंडुलकरने गिल आणि पंत यांच्या भागीदारीबाबत एक गोष्ट उघड केली. इंग्लंडचा फिरकी गोलंदाज शोएब बशीरच्या स्पेलदरम्यान, गिल आणि पंत हिंदीत बोलत असल्याचे त्याने निदर्शनास आणले. हिंदीत बोलण्यामागे या दोघांची कोणती रणनीती होती, हेही त्याने स्पष्ट केले आहे.सचिनने एक्सवर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे, 'ऋषभचा पॅडल स्वीप हुकणे अपघाती नव्हते. हे त्याने जाणूनबुजून आणि अतिशय हुशारीने केले होते. शॉट खेळताना खाली वाकल्याने त्याला लेग स्लिपवर नियंत्रण ठेवून स्कूप करण्याची संधी मिळते.'या पोस्टमध्ये सचिन पुढे म्हणाला की, 'बशीरच्या स्पेलदरम्यान मला एक मनोरंजक गोष्ट लक्षात आली, शुभमन आणि पंत बशीर गोलंदाजी करत असताना हिंदीत मोठ्याने बोलत होते. हे सामान्य संभाषण नव्हते. ते दोघंही गोलंदाजाची लय तोडण्यासाठी त्याच्याशी मानसिक खेळ खेळत होते. या छोट्या छोट्या गोष्टी स्कोअरबोर्डवर दिसत नाहीत, परंतु त्यांचा सामन्यावर मोठा परिणाम होतो.'

### वडील ठाकरे गटात, मुलगा शिंदे गटाचा

**गोंदिया-** राजकारणात एकाच कुटुंबातील एकाच आडनावाचे दोन प्रमुख व्यक्ती वेगवेगळ्या विचारसरणीच्या पक्षात असल्याचे अनेक उदाहरण आहेत. असंच काहीसं प्रकार गोंदिया जिल्ह्यात पण घडलेला आहे. गोंदिया विधानसभेतून १९९५ आणि १९९९ अशा सलग दोन निवडणुका संयुक्त शिवसेना पक्षातर्फे जिंकणारे माजी आमदार रमेश संपतराव कुथे शिवसेना (उबाठा) पक्षाचे पदाधिकारी आहेत. तर त्यांचे सुपुत्र माजी सभापती जिल्हा परिषद सदस्य रुपेश (सोनू) रमेश कुथे यांची नुकतीच शिवसेना (शिंदे) गटाच्या जिल्हाप्रमुख पदी नियुक्ती करण्यात आलेली आहे. यामुळे गोंदिया जिल्ह्यातील राजकारणात हा चर्चेचा विषय झालेला आहे.तीन ते चार महिन्यात गोंदिया जिल्ह्यात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भविष्यात नगरसेवक होऊ पाहणाऱ्या नेतेमंडळीचे जिल्ह्यात प्रभावी असणाऱ्या भारतीय जनता पक्ष, शिवसेना (शिंदे )गट, शिवसेना (उबाठा), राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (अप) आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (शप) अशा पक्षात प्रवेश करण्याचे सत्र गेल्या काही दिवसा पासून सुरू झालेले आहेत. अशातच वडील माजी आमदार असलेले रमेश कुथे,काका माजी नगर सेवक राजकुमार कुथे शिवसेना (उबाठा) चे पदाधिकारी असताना त्यांचे सुपुत्र रुपेश (सोनू) कुथे यांची शिवसेना (शिंदे) गटाच्या जिल्हाप्रमुख पदी निवड ही काहीशी आजच्या परिस्थितीत आगळी वेगळी ठरणारी राजकीय घटना जिल्हा करिता ठरत आहे.

## पालखी सोहळ्यात वाट चुकलेल्या वारकरी महिलेला पोलिसांची मदत

**पुणे**-पालखी सोहळ्यात दिंडीसोबत आलेली महिला वाट चुकली. वाट चुकल्याने घाबरलेल्या महिलेला पोलिसांनी पाहिले. तिची विचारपूस केल्यानंतर ती वाट चुकल्याचे लक्षात आले. त्यानंतर मार्केट यार्ड पोलिसांनी तातडीने दिंडीचा शोध घेऊन वाट चुकलेल्या महिलेला मदत केले.

पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या दिंड्या शहर, तसेच उपनगरातील विविध भागात मुक्कामी येतात. मार्केट यार्ड भागात आलेल्या दिंडीतील महिला वाट चुकली. मार्केट यार्ड पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनीषा पाटील आणि गस्त घालत होते. पोलिसांनी घाबरलेल्या महिलेला पाहिले. त्यांनी विचारपूस केली. तेव्हा महिलेकडे दिंडीप्रमुखांचा मोबाइल क्रमांक नसल्याचे लक्षात आले.




पोलिसांनी चौकशी केली. तेव्हा महिला मूळची रायगड जिल्ह्यातील उरणची रहिवासी असल्याची समजले. त्यानंतर पोलीस निरीक्षक पाटील यांनी उरण पोलिसांशी संपर्क साधला.

उरणमधून पुण्यात आलेल्या दिंडीप्रमुखांची माहिती आणि मोबाइल क्रमांक मिळवले. त्यानंतर पोलिसांनी दिंडीप्रमुखांशी संपर्क साधला. दिंडी मार्केट यार्ड परिसरात होती. दिंडीप्रमुख पोलीस ठाण्यात आले. त्यानंतर पोलिसांनी महिलेला दिंडीप्रमुखांच्या ताब्यात दिले. पोलिसांनी महिलेला त्वरीत मदत केल्याने दिंडीप्रमुखांनी आभार मानले. पालखी सोहळ्यात महिलांकडील दागिने लांबविले पालखी सोहळ्यात दर्शन घेणाऱ्या महिलांकडील दागिने लांबविण्यात आल्याची घटना मुंबई-पुणे रस्त्यावरील बोपोडी चौक आणि खडकी परिसरात घडली. याप्रकरणी चोरट्यांविरुद्ध खडकी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत एका ६८ वर्षीय महिलेने खडकी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला बोपोडी चौकात श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी आल्या होत्या. दर्शनासाठी गर्दी झाली होती. गर्दीत पालखीचे दर्शन घेणारया महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरट्यांनी लांबविले. पालखी सोहळ्यात आणखी एका महिलेचे दागिने चोरट्यांनी लांबविल्याची घटना घडली. पालखी सोहळ्यात महिलांकडील दागिने लांबविण्याच्या घटना घडतात. यापार्श्वभूमीवर पोलिसंनी साध्या वेशातील पोलिसांचा बंदोबस्त पालखी मार्गावर तैनात केला होता.

## भावा-बहीणने एकत्र आयुष्य संपवले

**सोलापूर :** सोलापूरातील कर्णिक नगरातील सिव्हिल सोसायटीतील गाडे यांच्या घरातील खोलीत गुरुवारी सायंकाळी अश्विनी वीरेश केशापुरे (वय २३) व रोहित भिमू ठणकेदार (वय २३) या दोघांनी गळफास घेऊन आत्महत्या केली होती. एमआयडीसी पोलिसांनी या घटनेची उकल केली असून ते दोघेही मानलेले भाऊ-बहीणच होते. पण, अश्विनीच्या बॉयफ्रेंडने पाच वर्षांचे नाते तोडून दुसऱ्याच मुलीला जवळ केल्याने ती मानसिक तणावात होती. त्यातून अश्विनीने टोकाचा निर्णय घेतला. मानलेल्या भाऊ रोहित ठणकापुरे आणि अश्विनी केसापुरे या दोघांनी गळफास घेतल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. अश्विनी व रोहित या दोघांनी बुधवारचा दिवस एकत्रित घालवला. त्यानंतर रोहित ज्यांच्या गाडीवर चालक होता, त्यांच्या घरी म्हणजेच कर्णिक नगर येथे गेले. अश्विनी आणि रोहित या दोघांनी मिळून चिठ्ठी लिहिली आणि गळफास घेऊन जीवन संपविले. ज्या मुलीमुळे अश्विनीचे बॉयफ्रेंड सोबत ब्रेकअप झाले होते. तिच्याबद्दल अश्विनीच्या मनात खूप राग होता.

## भटक्या मांजरींचे निर्बिजीकरण

**नाशिक –** मोकाट जनावरे, भटक्या कुत्र्यांमुळे शहरवासीयांना अनेक भागात फिरणे अवघड झालेले असताना महानगरपालिका आता भटक्या, मोकाट मांजरींची निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणार आहे. म्हणजे, ज्यांचा रस्ते व प्रमुख चौकात नागरिकांना त्रास होतो, त्यावर उपाय योजण्याऐवजी लवकर दृष्टीपथासही न पडणाऱ्या भटक्या मांजरींना पकडून निर्बिजीकरण करण्यात येणार आहे. मागील काही वर्षात शहरात मोकाट जनावरे, भटक्या कुत्र्यांचा त्रास वाढत आहे. अलीकडेच गांधीनगर कर्मचारी वसाहतीत मोकाट जनावरांच्या हल्ल्यात एक ज्येष्ठ नागरिक गंभीर जखमी झाला होता. शहरातील भाजी बाजार परिसरात मोकाट जनावरांची गर्दी असते. या जनावरांकडून कधीकधी हल्ल्याचे प्रकार घडतात. महत्वाची बाब म्हणजे, मनपा क्षेत्रात भटक्या मांजरींचा उपद्रव आणि तक्रारी कमी करण्यासाठी त्यांची उत्पत्ती थांबविणे व त्यांची संख्या मर्यादित ठेवण्यासाठी मांजरींवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे गरजेचे असल्याचा मुद्दा प्रस्तावात मांडण्यात आला. मोकाट, भटक्या मांजरींना पकडून निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करण्यासाठी वर्षभरासाठी २० लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. इ निविदा प्रक्रिया राबवून हा खर्च करण्यास सभेत मान्यता देण्यात आली.

भटक्या आणि मोकाट कुत्र्यांच्या निर्बिजीकरणावर महापालिका दरवर्षी एक कोटीहून अधिकचा खर्च करते. मागील १० वर्षात साधारणत: ८० हजार मोकाट कुत्र्यांवर ही शस्त्रक्रिया करण्यात आली. या काळात या प्रक्रियेवर सुमारे १० कोटीहून अधिकचा निधी खर्ची पडला.

## गणेशोत्सवाला कोकणात जाणाऱ्यांसाठी गुड न्यूज

**मुंबई**-गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या प्रवाशांसाठी महत्त्वाची बातमी आहे. उद्या, सोमवारपासून सुरू होणाऱ्या आठवड्यात गणेशोत्सवासाठीचे आरक्षण सुरू होणार आहे. यंदा गणरायाचे आगमन बुधवारी, २७ ऑगस्ट रोजी होणार आहे. आगमनाआधीचा शुक्रवार-शनिवार-रविवार अनुक्रमे २२, २३ आणि २४ ऑगस्ट असा आहे. या दिवसांच्या रेल्वे प्रवासासाठीचे आरक्षण उद्या, २३ जूनपासून खुले होणार आहे.

महामुंबईतील लाखो नागरिक गणेशोत्सवासाठी कोकणातील मूळ गावी जातात. उत्सवानिमित्त जादा एसटी, खासगी एसटी चालवण्यात येतात. कोकणात रस्ते मार्गाच्या तुलनेत रेल्वे प्रवास आरामदायी, स्वस्त आणि वेगवान असतो. यामुळे कोकणवासीयांकडून रेल्वे प्रवासाला प्राधान्य दिले जाते.

### आरक्षण वेळापत्रक

| प्रवास तारीख --- | आरक्षण खुले होण्याची तारीख |
|---|---|
| शुक्रवार, २२ ऑगस्ट--- | सोमवार, २३ जून |
| शनिवार, २३ ऑगस्ट --- | मंगळवार,२४ जून |
| रविवार, २४ ऑगस्ट --- | बुधवार, २५ जून |
| सोमवार, २५ ऑगस्ट --- | गुरुवार, २६ जून |
| मंगळवार, २६ ऑगस्ट --- | शुक्रवार, २७ जून |
| बुधवार, २७ ऑगस्ट --- | शनिवार, २८ जून |
| गुरुवार, २८ ऑगस्ट --- | रविवार, २९ जून |

सरकार दिलेला एकही शब्द फिरविणार नाही; शेतकरी कर्जमाफीबाबत ण्श फडणवीस नेमकं काय म्हणाले?

**अधिकृत ॲप**

रेल्वेगाडी कोणत्या स्थानकावर पोहोचली आहे हे पाहण्यासाठी 'नॅशनल ट्रेन इन्क्वायरी सिस्टीम' (एनटीईएस) आणि आयआरसीटीसी रेल कनेक्ट मोबाइल ॲप डाउनलोड करावे. यात रेल्वेगाडीचे लाइव्ह लोकेशन, मार्गावरील नकाशा, रेल्वे वेळापत्रक, थांबे आणि मार्गादरम्यानचे स्थानक अशी माहिती उपलब्ध आहे. काढताना गाडी सुरुवातीच्या स्थानकातून सुटण्याचा दिवस गृहीत धरावा. उत्तर आणि दक्षिण भारतातून सुटणाऱ्या गाड्यांचे महाराष्ट्रातील स्थानकांपासूनचे आरक्षण एक दिवस आधी करावे लागते. दि. २६ ऑगस्ट, २०२५ला १२६१८ हजरत निजामुद्दीन एर्नाकुलम मंगला एक्स्प्रेसने कल्याण ते खेड/चिपळूण/कणकवलीपर्यंत प्रवास करायचा असल्यास २६ जून २०२५ ला आरक्षण सुरू होईल. त्याचप्रमाणे ३ सप्टेंबर २०२५ला १२६१७एर्नाकुलम हजरत निजामुद्दीन मंगला एक्स्प्रेसने किंवा १६३४६ तिरुअनंतपुरम लोकमान्य टिळक टर्मिनस नेत्रावती एक्स्प्रेसने कुडाळ/रत्नागिरी/संगमेश्वर/चिपळूण/खेड ते पनवेल/कल्याण/मुंबईपर्यंत प्रवास करायचा असल्यास ४ जुलै, २०२५ ला आरक्षण सुरू होईल. वेळा लक्षात घ्या-रात्री १२नंतर दिवस बदलतो. त्यामुळे मध्यरात्रीच्या गाड्यांसाठी पुढील दिवसाचे तिकीट काढावे. गुरुवारी रात्री ११००३ दादर- सावंतवाडी तुतारी एक्स्प्रेसने किंवा ११०९९ लोकमान्य टिळक टर्मिनस मडगाव एक्स्प्रेसने जायचे असल्यास शुक्रवारचे तिकीट काढावे.

## दोन एसटी बस धडकल्या

**छत्रपती संभाजीनगर :** धुळे-सोलापूर महामार्गावरील निपाणी फाट्याजवळ बुधवारी सकाळी रस्त्यात थांबलेल्या दुचाकीमुळे मागून येणाऱ्या दोन एसटी बस आणि एक कार एकमेकांवर आदळल्या. या अपघातात जवळपास १४ प्रवासी जखमी झाले.या प्रकरणी बुधवारी (१८ जून ) सकाळी ८.३० ते ९ वाजेच्या सुमारास वाजेच्या दरम्यान छत्रपती संभाजीनगर येथील सिडको बसस्थानकावरून लातूरकडे एसटी बस क्रमांक एमएच-२४-एयू-८२९५ ही निपाणी फाट्याजवळ पोहोचली. याच वेळी समोरून चाललेली दुसरी एसटी बस छत्रपती संभाजीनगर ते इचलकरंजी क्रमांक एमएच-०९-एफएल-७४३५ ही याच महामार्गावर धावत होती. याच शिवाय छत्रपती संभाजीनगरहून निघालेली कार क्रमांक एमएच-४६-एन-१३८ ही पांढरी पिंपळगाव कडे जात होती. निपाणी फाट्याजवळ एका दुचाकीवर जाणाऱ्या दुधाची कॅन घेऊन जाणारी दुचाकी रस्त्यावर पडली.

दुचाकीस्वाराने त्याची दुचाकी रस्त्यात थांबविली. या दुचाकीच्या मागुन येणाऱ्या कारने दुचाकीला वाचविण्यासाठी अचानक ब्रेक लावले. कार चालकाने ब्रेक मारताच, त्या कारच्या मागे असलेली छत्रपती संभाजीनगर - लातुर बसने कारला पाठीमागून धडक दिली. ही बस दुभाजक जवळी ट्रॅकवर जावून आदळली त्यानंतर ती बस छत्रपती संभाजीनगर-इचलकरंजी बसला मागून धडकली. या धडकेत बस आणि कारही अपघातग्रस्त झाली.घटनेचा प्रत्यक्ष साक्षीदार असलेले पाचोड बस स्थानकाचे वाहतूक नियंत्रक एस. एस. पठाडे हे त्या वेळी मागून येणाऱ्या उदगीर बसमध्ये प्रवास करीत होते. अपघात घडताच त्यांनी तातडीने घटनास्थळी उतरून मदतकार्य सुरू केले. पठाडे यांनी रुग्णवाहिकांना, सिडको बसस्थानक प्रशासनाला आणि वाहतूक पोलिसांना या संदर्भात अपघाताबाबत तातडीने माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी तातडीने हालचाली केल्या.

## 'कितने आदमी थे' हा प्रसिद्ध डायलॉग अमजद यांना शिकवला सचिन पिळगांवकरांनी

**मुंबई** -मराठी सिनेसृष्टीचे ज्येष्ठ अभिनेते सचिन पिळगांवकर यांनी अलीकडेच एका मुलाखतीत 'शोले' चित्रपटातील 'कितने आदमी थे' हा प्रसिद्ध डायलॉग अमजद खान यांना नीट बोलता येत नव्हता, असा खुलासा केला. त्यांनी सांगितले की, अमजद खान जेव्हा हा डायलॉग बोलत होते, तेव्हा

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सचिन पिळगावकर यांना त्यांच्या या मुलाखतीवरून डिवचले आहे. त्यांनी ट्विट करत म्हटले, शोले हा सिनेमा १९७५ साली रिलीज झाला. त्यावेळी सिनेरसिकांनी शोले सिनेमा अक्षरशः डोक्यावर घेतला होता. त्यातील एक-एक डायलॉग त्यावेळच्या पिढीच्या तोंडावर होता. डाकू, दरोडेखोर यांच्या भूमिका असलेले अनेक चित्रपट येऊन गेले. मात्र, शोलेमध्ये अमजद खान यांनी साकारलेला गब्बरसिंग जेवढा गाजला, मला नाही वाटत तेवढा कोणता अभिनेता दरोडेखोराच्या भूमिकेमध्ये गाजला असेल.

गब्बरसिंग अन् अमजद खान ही हिंदी सिनेसृष्टीतील अजरामर नावे आहेत. पण, हे काही मनाला पटले नाही की, गब्बरसिंग म्हणजेच अमजद खान यांना डायलॉग फेकण्याचे कौशल्य- आदब हे त्या सिनेमातील बालकलाकार सचिन पिळगावकर याने शिकवली. कारण, अमजद खान यांचे वडील झकारिया खान अर्थात जयंत हेदेखील १९५०-६० च्या दशकातील नामांकित अभिनेते होते. म्हणजेच चित्रपटसृष्टीत खानदान असलेल्या अमजद खान यांना सचिन पिळगावकर याने संवादफेक किवा डायलॉग फेकण्याची स्टाईल शिकवावी,



हे पचनी पडतच नाही. आज अमजद खान आपल्यात नाहीत आज ही जो कोणी शोले बघेल तो अमजद खान म्हणजेच गब्बर सिंगला विसरूच शकत नाही.

**काय म्हणाले होते सचिन पिळगावकर?**

सचिन पिळगावकर यांनी मुलाखतीत म्हटले होते की, शोले सिनेमा आल्यानंतर अनेकांना असे वाटले की, अमजदचा आवाज हा गब्बर सिंहचा आवाज वाटत नाहीय. तो थोडासा पातळ वाटतोय. त्याला मी माईकसमोर उभे केले आणि आमचे सूद नावाचे तेव्हा रेकॉर्डिस्ट होते, असिस्टंट होते ते मंगेश देसाईंचे. त्यांना सांगितले ट्रेबल एकदम बंद करदो और बेस बढादो.

मी अमजदला सांगितले माईकच्या जवळ उभा राहा, आणि वरच्या पट्टीत नको बोलूस खालच्या पट्टीत बोल. कारण माझ्यामागे तो अनुभव होता, जो अमजदच्या मागे नव्हता आणि पहिला डायलॉग 'कितने आदमी थे...' आधी त्याने वरच्या पट्टीत ओरडून म्हटलेले. मी त्याला सांगितले नाही, असे नाही. नीचे के सूर मे बोल. पट्टी पुरी नीचे कर. कारण मी गायक सुद्धा आहे. मला ऑक्टिम्स कळतात. त्यामुळे खालच्या सुरात बोल, कितने आदमी थे, असे सचिन पिळगावकर यांनी म्हटले होते.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# संघर्षाचे परिणाम भारतावर

इराण आणि इस्त्रायल यांच्यात सध्या भीषण संघर्ष सुरू आहे आणि त्याची किंमत भारताला मोजावी लागणार आहे. त्याची किंमत न भूतो न भविष्यती अशी आहे. इस्त्रायलने इराणच्या आण्विक स्थळांवर तसेच त्यांच्या युरेनियम समृद्ध तळांवर हल्ले केले आणि त्यामुळे इराणला फार मोठे नुकसान सोसावे लागले. इराणचे लष्करी अधिकारी जे सर्वोच्च आहेत तेही या कारवाईत ठार झाले. इराणने इस्त्रायलवर हल्ले केले, पण त्यांची व्याप्ती इस्त्रायलच्या तुलनेत काहीच नव्हती. परिणामी भारताला आता नव्या पश्चिम आशियातील युद्धबिंदूला सामोरे जावे लागणार आहे. डावपेचात्मक वर्तुळात इस्त्रायलच्या या चालीचा खूप दिवसांपूर्वीपासून अंदाज व्यक्त केला जात होता. पण आता ती चाल रचली गेली आहे आणि त्याची किंमत इराणला मोजावी लागत आहे. तसेच जगालाही मोजावी लागणार आहे. ही अशी घटना आहे, की जिचे नवी दिल्लीत स्वागत केले जाणार नाही. कारण इस्त्रायल आणि इराण हे दोन्हीही देश भारताचे मित्र देश आहेत. इराणबरोबर तर भारताचे पूर्वापार मैत्री पूर्ण संबंध आहेत, तर इस्त्रायलने भारताला पाकिस्तानसोबत नुकत्याच झालेल्या संघर्षात चांगली साथ दिली आहे. त्यामुळे भारतासमोर असा पेच आहे की कुणाचीही बाजू घेता येत नाही. तरीही भारताला आपले अलिप्तता वादाचे धोरण समोर ठेवून या संघर्षात भूमिका घ्यावी लागणार आहे. इराणचा निर्णायक पराभव झाला अथवा त्याच्या अगदी जवळचे म्हणजे इराण कोसळले तरीही भारतात त्याचे फार मोठे परिणाम होणार आहे. मग भारताला गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल. सध्या भारताची क्रूड तेलाची आयात इराणद्वारेच होते आणि ती केली जाते होर्मुझच्या बंदरातून. त्या प्रदेशात कुठेही युद्ध सुरू झाले की ती युद्धभूमी होते आणि त्यामुळे भारताच्या क्रूड तेलाच्या किमती १५० प्रति बॅरल इतक्या चढू शकतात. त्यामुळे तेलाच्या किमती वाढल्या की, देशांतर्गत महागाई वाढते आणि व्यापारी असमतोल निर्माण होतो. चलनाचा दबाव वाढतो आणि फिस्कल डेफिसिटमध्ये तीव्र स्वरूपाचा चढ होतो. भारताची अर्थव्यवस्था अगोदरच टाईट मार्जिन्समधून हेलकावे खात आहे. तिला हा मोठा फटका बसेल. तेलाशिवाय भारताची डावपेचात्मक भूराजकीय स्थितीशी तडजोड केली जाईल. इराणचे चाबाहर बंदर जे भारताने विकसित केले आहे आणि ते पाकिस्तानला उत्तर म्हणून काम करत आहे ते या युद्धात एक तर बंद होईल किंवा काम करणे सोडून दिले जाईल आणि त्याबरोबरच भारताकडे असलेला एकमेव उपलब्ध दक्षिण उत्तर मार्ग म्हणजे मध्य आशिया आणि रशिया यांच्याकडे जाण्याचा व्यापारी मार्गही बंद होईल. हे नुकसान प्रचंड असेल. कारण हा मार्ग पाकिस्तान आणि चीनमधून जातो. राजनैतिकदृष्ट्याही याचे तोटे अनेक आहेत. कारण भारताने जर इराणची बाजू घेतली, तर इराणसारखा मित्र देश गमावेल आणि त्याचा फटका भारताला बसेल. कारण इराण हा भारताचा इंटलिजन्स शेअरिंगमध्ये अत्यंत महत्त्वाचा भागीदार आहे. तो लाभ भारताला गमवावा लागेल. या सर्व तोट्याबरोबरच भारताला एक फार मोठ्या शत्रूला तोंड द्यावे लागणार आहे. चीनच्या इराणीयन डावपेचात्मक ठिकाणांमध्ये प्रवेश केल्याने पाकिस्तानला सहज प्रवेश मिळू शकेल आणि पाकच्या गुप्तचर संस्थांची क्षमता या भारताच्या धोकादायकरीत्या जवळ आहे इराण-इस्त्रायल यांच्यातील संघर्षाचा तात्कालिक परिणाम म्हणजे भारतातील तेलाच्या किमती ४० ते ५० टक्क्यांनी वाढतील. त्यामुळे भारतातील महागाई एकूणच प्रचंड वाढेल आणि भारताची ८० टक्के गरज ही आयातीतून भागवली जात असल्याने याचा फटका किती प्रमाणात बसेल याचा विचारच न केलेला बरा. सध्याच्या युद्धामुळेच जागतिक तेलाच्या किमती ८ टक्क्यांनी वाढल्या आणि अशी भीती पसरली आहे की हे युद्ध असेच सुरू राहिले, तर महागाई आणखी वाढेल. सध्याच्या इराण-इस्त्रायल संघर्षामुळे अनेक प्रश्न भारतासमोर निर्माण होणार आहेत. जरी भारत इराणकडून थेट पेट्रोल आयात करत नाही तरीही भारताच्या क्रूड तेलाच्या किमतींचा परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर होणार आहे कारण जागतिक तेलाच्या किमती आज अर्थव्यवस्था ठरवतात. शिवाय २० टक्के तेल हे होर्मुझच्या खाडीतून येते. त्यामुळे तेथे युद्ध झाले, तर होर्मुझचा रस्ता बंद होऊन भारताला तेल केप ऑफ गुड होपला वळसा घालून आयात करावे लागेल, त्यामुळे आयात तेलाची किंमत किती वाढेल याची कल्पना येण्यासारखी आहे. या क्षेत्रात व्यत्यय आला, तर त्याचा परिणाम भारताच्या निर्यातीवर होणार आहे. अगोदरच भारताची निर्यात कमी आहे. त्यात हा खर्च वाढला तर भारताची अर्थव्यवस्था बसू शकते. त्यामुळे भारतासमोर सध्या एकच पर्याय आहे तो म्हणजे इराण आणि इस्त्रायल या दोन्ही देशांनी युद्ध थांबवावे यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. या युद्धात कुणा एकाची बाजू घेतली, तर भारताला त्याची फार मोठी किंमत मोजावी लागेल.

# आखाती युद्धात अमेरिकेचा हस्तक्षेप?

**इस्त्रायल-इराण युद्धाने पश्चिम आशियात युद्धाचा भडका उडालेला आहे. अमेरिकेने या युद्धात थेट उतरण्याचे संकेत दिले असले, तरी प्रत्यक्षात अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आपल्या निर्णयाविषयी गुप्तता पाळून आहेत; मात्र हे युद्ध चिघळल्यास त्याचा फटका जागतिक अर्थव्यवस्थेवर होईल. तसेच सद्यपरिस्थितीत हा वणवा विझवायला जगात कोणतीही प्रबळ शक्ती नाही, हीच खरी शोकांतिका म्हणावी लागेल.**

इस्त्रायल - इराण युद्धात थेट सहभागी व्हायचे की नाही, हा अजूनही अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासमोर सर्वात अवघड प्रश्न असल्याने ते याबाबत उलटसुलट संकेत देत असावेत. या युद्धाला आमचा थेट पाठिंबा आणि त्यात सहभाग नसल्याचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो यांनी सुरुवातीला स्पष्ट केले होते; पण इस्त्रायलच्या क्षेपणास्त्र हल्ल्याने इराणच्या अणू केंद्रांची, लष्कराची मोठी हानी झाल्याचे लक्षात आल्यावर ट्रम्प यांचा सूर बदलला हे वास्तव आहे. त्यांनी 'आम्ही' (वुई) असा शब्दप्रयोग वापरायला सुरुवात केली आहे. आमचे इराणच्या हवाई क्षेत्रावर संपूर्ण नियंत्रण आहे, असेही त्यांनी म्हटले आहे. शिवाय 'इराणच्या सर्वोच्च नेत्याने शरण यावे' असा आक्रमक पवित्रा घेतानाच त्यांनी आता तरी त्यांची हत्या करणार नाही, असेही सांगितले आहे. अमेरिकेने या युद्धात थेट उतरावे आणि डोंगरराजीत भूमिगत असलेल्या फोर्डो अणुसंवर्धन केंद्रावर बंकर बस्टर बॉम्ब टाकून ते उद्ध्वस्त करण्यास मदत करावी, अशी आग्रही भूमिका इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी घेतली आहे. त्यामुळे ट्रम्प यांच्यावर सध्या अमेरिकेच्या युद्धवादी आणि युद्धविरोधी गटांचा दबाव वाढत चालला आहे. हे दुधारी शस्त्र असल्याने ट्रम्प सावध पवित्रा घेत असून आपला निर्णय काय आहे, याबाबत गुप्तता पाळत आहेत. इराणने त्यांच्याशी संपर्क साधला असला, तरी चर्चेसाठी आता खूप उशीर झाला आहे, असे सांगून त्यांनी लवकरच कारवाई करण्याचे संकेत दिले आहेतसंघर्षाच्या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी जी-७ बैठकही अर्ध्यातच सोडून मायदेशी गमन केले होते. तसेच आता अमेरिका इस्त्रायलला शस्त्रास्त्रे पुरवठा करीत असल्याचेही समोर आलेले आहे.

ट्रम्प यांच्यावर त्यांच्या मॅगा (मेक अमेरिका ग्रेट अगेन) समर्थकांचा दबाव असल्याने या युद्धात थेट उतरावे लागल्यास आपल्या समर्थकांना समजवण्याचे काम ट्रम्प यांनाच करावे लागेल. अमेरिकाबाहेरील देशांच्या अनावश्यक लष्करी संघर्षात पडणार नाही, असे आश्वासन ट्रम्प यांनी निवडणुकीदरम्यान दिले होते. अमेरिकन कॉंग्रेसमध्ये पुरोगामी आणि कॉन्झर्वेटिव्ह अशा दोन्ही गटांतील काही लोकप्रतिनिधींचा या युद्धाला विरोध आहे. रिपब्लिकन पक्षातील काहींचाही त्यात समावेश होतो. अमेरिकेने यापूर्वी नको असलेल्या परकीय सत्ताधीशांना बदलून जी सत्तांतरे घडवून आणली आहेत, त्यामुळे अमेरिकेची प्रतिमा जगभर मलिन झाली असून त्याची पुनरावृत्ती टाळायला हवी, हे यानिमिताने लक्षात आणून दिले जात आहे.

आखाती युद्धासाठी एखादा लष्करी ॲसेटस् वापरल्याचा प्रतिकूल परिणाम पॅसिफिक क्षेत्रावर आणि चीनवर अंकुश ठेवण्याच्या प्रयत्नावर होतो, असे काही सूत्रांचे म्हणणे आहे, तर युद्धाच्या बाजूच्या इस्त्रायलवादी गटाचे म्हणणे हे की, केवळ इस्त्रायललाच नव्हे, तर अमेरिकेच्या मध्यपूर्वेतील हितसंबधांना इराणच्या संभाव्य अणुबॉम्बचा धोका आहे. अमेरिकेत ज्यू लॉबी प्रभावी असल्याने त्यांच्या मताचा प्रभाव इस्त्रायलविषयीच्या आणि एकूणच आखाती भागाच्या धोरणांवर पडणे स्वाभाविक आहे. आखाती भागाचे नेतृत्व कोणी करायचे , यासाठी आखाती भागातील सौदी अरेबिया, कतार, संयुक्त अरब अमिरात आणि इराण यांच्यात मोठी स्पर्धा आहे. इराणला या भागात आपले नेतृत्व प्रस्थापित करावयाचे आहे. हाही या संघर्षाला एक पैलू आहे.

आखातातील बहारिन, इजिप्त, इराक, कुवेत, कतार, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिरात इत्यादी ठिकाणी अमेरिकेचे सुमारे १९ लष्करी तळ असून त्यापैकी ८ कायमस्वरुपी आहेत. या भागातील मोठ्या जहाजांवर कॅरिअर स्ट्राईक ग्रुपमध्ये त्यांचे बरेच सैनिक कार्यरत आहेत, एकूण ४० ते ५० हजारांवर सैनिक या भागात असून ते इराणी क्षेपणास्त्राच्या कक्षेत येतात. गरज भासल्यास इराणने पोसलेले हमास, हिजबोल्ला, हूथी हे दहशतवादी गट सक्रीय करुन इराण अमेरिकेला अडचणीतही आणू शकतो हेही तितकेच खरे.

इस्त्राईलच्या दृष्टीने ही निकराची आणि त्यांच्या अस्तित्वाची लढाई आहे. या दोन्ही देशांचे कित्येक वर्षांपासूनचे शत्रुत्व आहे. साहजिकच इराणी अणुबॉम्ब तयार झाल्यास त्याचा वापर आपल्याविरुध्द केला जाईल, या शक्यतेने 'रायझिंग लायन ' ही युध्द मोहीम प्री एम्टिव्ह स्ट्राईक्सचा भाग म्हणून वर्षभराच्या तयारीनंतर इस्त्राइलने १३ जूनला सुरु केली आहे. इस्त्राईलने इराणवर केलेल्या हल्ल्याने केवळ पश्चिम अशियातीलच नव्हे तर एकूणच जागतिक स्थिती अत्यंत धोकादायक आणि चिंताजनक झाली आहे . युध्द कसे सुरु करायचे , हे माहीत असते . पण ते कसे संपेल , हे कोणालाच माहीत नसते. हा शतकानुशतके चालत आलेला युध्दाबाबतचा सार्वकालिन नियम असून तो या परिस्थितीचे गांभीर्य पुन्हा अधोरेखित करतो. शिवाय असे जागतिक संघर्ष थांबवू शकेल अशी कोणतीही प्रबळ शक्ती आज दिसत नाही, हीही मोठी शोकांतिका आहे.

पॅलेस्टिनींच्या या हालाला इस्त्राईल जबाबदार असल्याबद्दल त्याचा आंतरराष्ट्रीय पातळीवर निषेधही झाला . हमासविरोधी लष्करी कारवायांमुळे या अतिरेकी गटाची ताकद कमी झाली. तरीही हमास अजूनही गाझामध्ये सक्रिय आहेत. हिझबुल्लाबद्दलही थोडेफार असेच म्हणता येईल. सना विमानतळासह अनेक पायाभूत सुविधा उद्ध्वस्त झाल्या असूनही हूथींनी शस्त्रसंधीचा प्रस्ताव ठेवलेला नाही. हमास गटाने ओलीस धरलेल्या अनेकाची अजून सुटका झालेली नाही . त्यांची सुटका करण्यावर भर द्यावा, अशी तेथील डाव्या गटाची मागणी आहे . मात्र इराणची अण्वस्त्रे तयार करण्याची क्षमता नष्ट करण्याला त्यांचा एकमुखी पाठिंबा आहे . या देशाने आपल्या मोसाद या गुप्तहेर यंत्रणेचा वापर करुन ड्रोन आदिंची तयारी आधीच केली होती.



त्यामुळे काही हल्ले इराणच्या हद्दीतून जमिनीवरुन झाल्याचेही संकेत आहेत. इराणने अणुबॉम्ब तयार करण्यापुर्वीच त्याची यंत्रणा नष्ट करणे, संबधित शास्त्रज्ञांना संपविणे हा उद्देश ठेवूनच सुमारे २०० हून अधिक विमानांनी सुमारे ३०० प्रकारच्या दारुगोळ्यांसह १०० ठिकाणांवर हा हल्ला केला. यात लष्करी आणि क्षेपणास्त्र तळ तसेच नांताझ अणुस्थळ आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मुख्यालय समविष्ट होते. त्यामध्ये इराणचे उच्चपदस्थ लष्करी अधिकारी, अणुशास्त्रज्ञ यात ठार झाले असल्याने इराणची ताकद कमी झालेली आहे हेही वास्तव आहे.

या हल्ल्यामुळे इराणच्या अणुबॉम्ब तयार करण्याच्या क्षमतेचे काही प्रमाणात नुकसान झाले असले तरी ती पूर्णपणे नष्ट झाली आहे, असे मानता येणार नाही. कारण महत्वाची फोर्डो फ्युएल एनरिचमेंट प्लॅंट ही एका डोंगरात भूमीगत असलेली युरेनियम एनरिचमेंट सुविधा अजूनही शाबूत आहे. इथे प्रगत सेंट्रिफ्युजेसचे अनेक कॅसकेडस आहेत की ज्यायोगे ६० टक्क्यांपर्यंत तर कधीकधी ८३ . ७ टक्क्यांपर्यंतचे वेपन्स ग्रेड शुध्दतेचे युरेनियम मिळू शकते. पारंपारिक बॉम्बहल्ल्याने ही सुविधा नष्ट होण्यासारखी नाही, त्यासाठी हेवी बंकर बूस्टर बॉम्बस आणि लॉंग रेंज बॉंबर्सची गरज आहे. हे फक्त अमेरिकाच करु शकते. त्यामुळे ही अणुबॉम्ब तयारी रोखण्यासाठी अमेरिकेने या मोहीमेत सहभागी व्हावे, असा नेतान्याहू यांचा आग्रह आहे.

या युध्दाचा एक मोठा तोटा अमेरिकेला होणार आहे. युरोप आणि आखाती भागातून आपला पाय काढून घेऊन आपले लक्ष अशिया आणि पॅसिफिक भागाकडे, चीनकडे केंद्रित करण्याचा त्यांच्या प्रयत्नाला खो बसण्याची शक्यता आहे. अमेरिका आखाती संघर्षात अडकल्याने आशिया प्रशांत क्षेत्रात चीन आपले प्राबल्य वाढवू शकतो, कदाचित या संधीचा लाभ उठवून तैवानवर हल्लाही करु शकतो ही भीतीही आहेच. एकीकडे इस्त्राइलची युध्दखोरीची खुमखुमी आणि दुसरीकडे इराणचा दहशतवाद्यांना पोसण्याचा आणि अर्थव्यवस्था दयनीय स्थितीत असतांना अण्वस्त्रे तयार करण्याचा अट्टाहास हे दोन्हीही जगाला घातक असून अमेरिका यात दुटप्पी भूमिका घेत असल्याने हा प्रश्न आणखी गुंतागुंतीचा झाला आहे. भारताचे तर आखाती अरब देशांबरोबरचे आर्थिक आणि इतर पातळीवरील संबंध आणि इस्त्राईलशी असलेले अधिक सौहार्दाचे संबंध लक्षात घेता या संकटातून मार्ग काढण्यासाठी भारताने मध्यस्थीचे प्रयत्न करायला हरकत नाही असाही एक सूर आहे.

भारतासाठी धोक्याची घंटा - अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पाकिस्तानचे लष्करप्रमुख फिल्ड मार्शल असीम मुनीर यांना १८ जूनरोजी आपल्या निवासस्थानी भोजन दिले. हे कोणत्याही राजनैतिक संकेतात बसणारे नव्हते; तसेच ते डोनाल्ड ट्रम्प पर्यायाने अमेरिकेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारेही आहे. भारत आणि पाकिस्तानमध्ये नुकताच युद्धसदृष्य संघर्ष झाला आहे आणि पाकिस्तानने विनवणी केल्यानंतर भारताने आपले हल्ले थांबवले होते. या सर्व काळात ट्रम्प यांनी उलट-सुलट विधाने करून खळबळ उडवून दिली होती. अन् आता तर त्यांनी मुनीर यांना सर्व संकेत झुगारून, आपल्या स्थानावरून अनेक पावले खाली उतरत भोजन दिले आहे. ही बाब भारतासाठी निश्चितच धोक्याची घंटा आहे. भारतीय अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम... हे युद्ध चिघळणे हे भारताला घातक ठरू शकते. यात मोठा धोका तेलाच्या दरवाढीचा आहे. सध्या तेलाचा प्रतिबॅरल दर ७४ ते ७५ डॉलर्सच्या घरात आहे. त्यात सध्याच ४ टक्के वाढ झालेली आहे. अमेरिका लढाईत थेट उतरल्यास ब्रेंट क्रूडचा दर ८३ डॉलर्सवर जाऊ शकतो. इराणच्या अधिपत्याखालील होर्मुझ सामुद्रधुनी तेल वाहतुकीसाठी बंद झाली, तर हे दर थेट १२० डॉलर्सपर्यंत वधारू शकतात.

भारताच्या आयात तेलापैकी ६० टक्के तेल या मार्गाने येत असते. तेलाचा दर प्रतिबॅरलला १ डॉलरने वाढला, तरी वर्षाला २ अब्ज डॉलर्सचा जादा भुर्दंड भारताला पडतो. अमेरिकेच्या प्रतिक्रिया लक्षात घेता भविष्यात रशियन सवलतीतून तेल मिळण्याची शक्यता कमी आहे. भारताचे आखाती देशात ८० लाखांवर नागरिक आहेत. त्यांच्या नोकरीचे भवितव्य अधांतरी राहील. हे लोक भारतात दरवर्षी सुमारे ४७ अब्ज डॉलर्स एवढी रक्कम म्हणजे परदेशातून पाठविल्या जाणाऱ्या रकमेच्या ४० टक्के रक्कम पाठवत असतात. त्याचाही फटका बसणार आहे. या टप्प्यावर भारताने आर्थिक सुधारणांचा पाठपुरावा करून देशाची अर्थव्यवस्था मजबूत करण्यावर भर द्यायला हवा.

खासगी क्षेत्रातील व सार्वजनिक गुंतवणूक वाढविण्याचीही गरज आहे. इराण हा असा देश आहे की, त्याने भारताला क्रेडिटवर ५ अब्ज डॉलर्सचे तेल दिलेले असून तो दोस्ताना कायम ठेवला आहे. चाबहार बंदराचा प्रश्न भारतातर्फे इराणमध्ये चाबहार बंदर उभारणीचे, तसेच इंटरनॅशनल नॉर्थ साऊथ ट्रान्सपोर्ट कॉरिडॉर (आयएनएसटीसी) उभारणीचे काम चालू आहे. ही गुंतवणूक धोक्यात येऊ शकते. भारताचे इराण आणि इस्त्रायल हे दोन्ही मित्र देश असले, तरी धोरणात्मक राजनैतिक पेचप्रसंगामुळे भारताला यासंबंधात झालेल्या मतदानात नाईलाजाने तटस्थ राहावे लागले; पण संरक्षण क्षेत्रातील भागीदार असलेल्या इस्त्रायलशी तसेच पारंपरिक मैत्रीच्या नात्यातील इराणशी आपले संबंध चांगले राहण्याची अवघड कसरत भारताला करावी लागेल.

**अनिल टाकळकर**

## सश्रद्ध महाराष्ट्र !

महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य असल्याचे म्हटले जाते. पुरोगामीत्व म्हणजे जेथे सर्व गोष्टी विज्ञानाच्या तराजूत मोजल्या जातात, देवभोळेपणा आणि श्रद्धांना येथे स्थान नाही; मात्र याच महाराष्ट्रात साजरा होणारा श्रद्धेचा महाउत्सव म्हणजेच आषाढीची वारी आज गिनीज बुकात नोंदली गेली आहे. आपली सारी व्यावहारिक कामे बाजूला सारून केवळ भगवंताच्या मुखदर्शनासाठी वारकरी पायपीट करत निघतो. या पायपिटीमध्ये तब्येतीची चिंता, खाण्या पिण्याची व्यवस्था, घरच्या पोराबाळांची काळजी सारे काही त्या पांडुरंगावर सोडून वारकरी भगवी पताका घेऊन पंढरीची वाट धरतो आणि तो भक्ताच्या भक्तीच्या भुकेला आसुसलेला पांडुरंगही आपल्या भक्ताची सर्वार्थाने काळजी वाहतो. पांडुरंगाच्या आणि भक्ताच्या अतूट नात्याच्या मिलनोत्सवाला विज्ञानाचे तराजू तोलू शकेल का ? याच महाराष्ट्राच्या नाशिक नगरीत दर १२ वर्षांनी भरणारा सिंहस्थ कुंभमेळा या श्रद्धेचा आणखी एक महोत्सव अशा श्रद्धाळू भक्तांच्या महाराष्ट्राला पुरोगामी महाराष्ट्रापेक्षा 'सश्रद्ध महाराष्ट्र' हेच विशेषण योग्य ठरेल.

**मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी,**
मुंबई

## मुलांना मुक्तपणे विकसित होऊ द्या

देशात तसेच राज्यात कालपरवापर्यंत दहावी, बारावीच्या परीक्षेच्या निकालाच्या भीतीने विद्यार्थी आत्महत्या करीत होते. काही विद्यार्थी घरातून पळून जात होते. अगदी टोकाचा निर्णय म्हणून आत्महत्येची वाट चालत होते. या निर्णयामागे विद्यार्थ्यांची स्वविचाराची वाट नव्हती तर मनात पालकांची भीती होती. मार्कांचा ताणतणाव होता. आणि हा भीतीचा स्तर अलीकडे दिवसेंदिवस खाली येत आहे. भविष्यात निम्न प्राथमिक स्तरावर हा तणाव आला तर नवल वाटायला नको. अलीकडेच महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूर शहरातील इयत्ता सातवीची विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या निकालाच्या भीतीने घरातून पळून गेली होती. पळून जाताना तिने आपल्या लहान बहिणीलादेखील सोबत नेले होते. पोलिसांची कर्तव्य दक्षता आणि जागरूकतेमुळे मुलगी सापडली आणि पालकांच्या हाती मिळाली. चौकशीनंतर सातवीच्या निकालाच्या भीतीने घर सोडल्याचे तिने सांगितले. ही घटना घडून चार-पाच दिवस होत नाही तर तोच खरगपूरच्या आयआयटीमध्ये शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याने आत्महत्या गेली होती. गेल्या काही वर्षांपासून कोटा येथील आत्महत्यांचे सत्र सातत्याने सुरु आहे. शिक्षणाचा हा परिणाम अत्यंत नकारात्मक आहे. शिक्षणामुळे हे घडत असेल तर शिक्षणाच्या संदर्भाने पुनर्विचार करण्याची गरज आहे. शिक्षणामुळे कोणत्याही बालकाचा मृत्यू हा शिक्षण व्यवस्थेसाठी वेदनादायीच म्हणायला पाहिजे.

जीवन जगण्याची वाट समृद्ध करण्याच्या प्रवासात, वाट समृद्ध होण्याऐवजी अंधारमय होत आहे. शिक्षणाने जीवन समृद्ध व्हायला पाहिजे. जीवनातील समस्यांचे निराकरण करण्यासाठी शिक्षणाने हिंमत देण्याची गरज आहे. मात्र, तसे न घडता ही कोवळी पानगळ होत असेल तर पालक आणि शिक्षण व्यवस्थेने याकडे अतिशय गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. उद्याचे भविष्य ज्या बालकांच्या हाती आहे ती पिढीच निराशाग्रस्त होते. मुलांचे शिक्षण आनंदाने होऊ देणार की नाही, हा खरा प्रश्न निर्माण होतो. पालक म्हणून अपेक्षांचे ओझे सतत लादले जाते. आपले स्वप्न पूर्ण करण्याचा मार्ग म्हणून पाल्यांकडे पाहिले जात आहे. समाजात पालकांची प्रतिष्ठा पाल्यांच्या मार्कांच्या आलेखात दडलेली आहे. शिक्षण म्हणजे मार्क नाही हे लक्षात घेऊन मुलांना मुक्तपणे विकसित होऊ देण्याची गरज आहे.

**मधुकर चुटे** नागपूर
९४२०५६६४०४

# 'लंच डिप्लोमसी' मागे अमेरिकेचा छुपा अजेंडा



इस्त्रायल आणि इराण संघर्षात अमेरिकाही सामील होऊ इच्छित आहे. यादृष्टीने हालचाली सुरू झाल्या असून अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या वक्तव्यावरून तसे संकेतही मिळत आहेत. पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल आसिम मुनीर आणि ट्रम्प यांच्यात दुपारच्या मेजवानीचे आयोजन ही यादृष्टीनेच करण्यात आले होते. या भेटीत दोन्ही देशांचा स्वार्थ दडलेला असून एकीकडे अमेरिकेला तळ म्हणून पाकिस्तानचा वापर करायचा आहे, तर दुसरीकडे पाकिस्तानला भारतावर दबाव आणण्यासाठी अमेरिकेला मदत करायची आहे.

'ऑपरेशन सिंदूर' या भारताच्या यशस्वी मोहिमेनंतर प्रथमच पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल आसिम मुनीर यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट झाली. अमेरिकेतील व्हाईट हाऊसमध्ये दुपारच्या भोजनाच्या वेळी झालेल्या या भेटीला सर्वार्थाने महत्त्व असून ते जाणून घेणे क्रमप्राप्त आहे. इस्त्रायल-इराण संघर्षात अमेरिकेला हस्तक्षेप करण्याची तीव— इच्छा आहे, ही बाब लपून राहिलेली नाही. तथापि, मुनीर यांच्या भेटीतून याला पुष्टी मिळाल्याचे दिसून येते. अमेरिकेने या संघर्षात उडी घेतली, तर त्यांना पाकिस्तानच्या हवाई तळाची गरज भासणार आहे आणि म्हणूनच त्यांनी मुनीर यांच्या भेटीचा घाट घातला. एकप्रकारे या भेटीमागे प्रामुख्याने सामरिक कारणच होते. दुसरे म्हणजे रणनीतीचे. इराणविरोधात अमेरिका मैदानात उतरेल तेव्हा मुस्लीम देश एकत्र होण्याचा धोका आहे. अशावेळी पाकिस्तानला हाताशी धरल्याने त्याची तीव—ता कमी राहू शकते आणि याचा अमेरिकेला फायदा होईल. त्याचवेळी पाकिस्तान अमेरिकेसमवेत असल्याने मुस्लीम जग इराणच्या बाजूने नसल्याचाही संदेशही जगभरात जाईल. तिसरे कारण कूटनीतीचे. इराणमध्ये सत्तांतर झाल्यास नवीन शासकालाही मुस्लीम देशांची गरज भासणार आहे. अशावेळी पाकिस्तानला सोबत ठेवत अमेरिका या स्थितीचा लाभ घेण्याच्या तयारी करत आहे.

पाकिस्तान हा प्रत्यक्षात अमेरिकेसाठी सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा आणि फायद्याचा देश राहिला आहे. पाकिस्तानच्या भौगोलिक स्थितीचा अमेरिकेने अनेकदा फायदा उचलला आहे. शिवाय पाकिस्तान हा मुस्लीम देश असूनही एक कमकुवत देश असल्याने अमेरिकेला त्याला मुठीत घेणे सहज शक्य होत आले आहे. तो भारतासारखा सक्षम लोकशाहीप्रधान देश नाही. पाकिस्तानात लोकशाही पद्धतीतील निवडणुकांच्या माध्यमातून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या हाती सत्तासूत्रे सुपूर्द केली जात असली आणि पंतप्रधानांसह मंत्रिमंडळाकडून राज्यकारभार पाहिला जात असला, तरी प्रत्यक्षात त्यांच्या निर्णय प्रक्रियेवर, धोरणांवर सर्वथा पाकिस्तानी लष्कराचा प्रभाव आणि दबाव असतो. अबोटाबाद येथील अमेरिकी सैनिकांनी लादेनविरोधात केलेली कारवाई हा त्याचाच परिपाक आहे. यावरून भारताच्या तुलनेत पाकिस्तानशी सौदेबाजी करण्यात अमेरिकेला सोपे जाते. त्यामुळे मुनीर आणि ट्रम्प यांची लंच डिप्लोमसी खळबळ उडविणारी नाही. इराण आणि इस्त्रायल संघर्षात अमेरिकेने उडी घेतल्यास आणि या कारणामुळे अमेरिकाविरोधी वातावरण तयार झाल्यास पाकिस्तान त्यांच्या मदतीला धावून जाईल. यासाठी डोनाल्ड ट्रम्प पाकिस्तानचे पंतप्रधान शहाबाज शरीफ यांनाही पाचारण करू शकतात; परंतु प्रत्यक्षात पंतप्रधानांपेक्षा लष्करप्रमुख जनरल मुनीरच तेथे वरचढ असल्याने ते अधिक फायद्याचे राहू शकतात, हे अमेरिकेला ठाऊक आहे. म्हणूनच त्यांनी मुनीर यांच्याशी चर्चा केली.

सध्या दहशतवाद हा अमेरिकेच्या अजेंड्यावर नाही. आता त्यांचे ध्येय इराणला अण्वस्त्रसज्ज होण्यापासून रोखणे हे आहे. यासंदर्भात इस्त्रायलकडून वारंवार इशाराही दिला जात आहे. इराणला वेळीच आवरले नाही, तर तो अण्वस्त्रे तयार करून त्याचा वापर करू शकतो आणि ते जगासमोर मोठे संकट असेल, असे इस्त्रायलकडून सांगितले जात आहे. म्हणूनच इस्त्रायलकडून इराणवर सातत्याने हल्ले केले जात आहेत. सध्याची स्थिती पाहिली, तर सौदी अरेबियापासून ते कतार आणि पाकिस्तानपर्यंतचा प्रत्येक मुस्लीम देश हा इस्त्रायलवर नाराज आहे आणि ही बाब अमेरिका आणि इस्त्रायलला चांगलीच ठाऊक आहे. पाकिस्तानचे सैन्य अप्रत्यक्षपणे अमेरिकेची मदत करत असले, तरी पाकिस्तानच्या दूरचित्रवाणीवर नजर टाका. पाकिस्तानच्या वाहिन्यांवर इस्त्रायलविरोधात विखारी प्रचार केला जात आहे.

एकप्रकारे पाकिस्तानात विरोधाभासात्मक चित्र पाहावयास मिळत आहे. पाकिस्तानमध्ये श्रीमंतच नाही, तर गरीबदेखील इस्त्रायलच्या विरोधात आहेत; परंतु या देशाचे सर्वेसर्वा इस्त्राईलविरोधात भूमिका घेऊ शकत नाहीत. अमेरिका हा नेहमीप्रमाणे अनेक मार्गांनी पाकिस्तानचा वापर करेल आणि स्वत:चे हित साध्य करेल. पाकिस्तानच्या हवाई तळावर अमेरिकन विमान उतरतील, मुक्काम करतील, इंधन भरतील आणि हल्ल्यासाठी उड्डाणेही घेतील. याचा सारासार विचार करत मुनीर यांना भोजनाचे निमंत्रण दिले. ट्रम्प यांचे म्हणणे मान्य केल्याशिवाय मुनीर यांच्यासमोर दुसरा पर्याय नाही आणि त्यांचे म्हणणे ऐकण्यात स्वार्थही आहे. भारतीय उपखंडातील स्थितीची त्यांना चांगली जाणीव असून याकडे ते एक संधी म्हणून पाहत आहेत. अमेरिकेला आताच मदत केली, तर भारतावर दबाव आणण्यासाठी तो अमेरिकेकडे गळ घालू शकतो.

आगामी काळात पाकिस्तान अमेरिकेला पुढे करत भारतावर चर्चा करण्यासाठी दबाव आणू शकतो. तसेच पाकिस्तानला यानिमित्ताने भारताविरोधात मुद्दे मांडण्याची संधी मिळाली आहे.

**प्रा. अश्विनी महापात्रा**

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# 'भिंगरी'च्या आहारी शेतकरी व बेरोजगार ; कुटुंब आर्थिक संकटात



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी आणि ग्रामीण संकटांचा जिल्हा म्हणून ओळखले जाणारे यवतमाळ आता नव्या संकटाच्या विळख्यात सापडले आहे. 'भिंगरी' या संगणकीय जुगार प्रकाराने शहरासह परिसरात मुळ घट्ट रोवले असून, अनेक सुशिक्षित बेरोजगार आणि शेतकरी यामध्ये अडकले आहेत.

जिल्ह्यात सुरू असलेल्या या बेकायदेशीर खेळामुळे आर्थिक आणि सामाजिक नुकसान मोठ्या प्रमाणात होत आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात – स्टेट बँक चौक, मेडिकल चौक, उमरसरा, आठवडी बाजार, कॉटन मार्केट या ठिकाणी भिंगरीचे अड्डे खुलेआम सुरू असून, पोलिसांचे मौन आश्चर्यजनक वाटत आहे. शासनाकडून युवकांसाठी अनेक योजना जाहीर केल्या जात असतानाही रोजगाराच्या अपुऱ्या संधीमुळे अनेक तरुण 'भिंगरी' सारख्या जुगाराकडे वळले आहेत. संगणकावर चालणाऱ्या या जुगारात दिवसभरात हजारो रुपये उधळले जात असून, यातून परत काही मिळेल याची शाश्वती नसते. परिणामी, आर्थिक खाईत अधिक खोल जाण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. 'ऑपरेशन प्रस्थान'च्या माध्यमातून यवतमाळ पोलिसांनी जिल्ह्यातील अवैध व्यवहाराविरोधात कारवाई केली असल्याचा दावा केला जातो. मात्र 'भिंगरी' सारख्या खुलेआम चालणाऱ्या व्यवसायावर मात्र कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. उलट, स्थानिक सूत्रांच्या म्हणण्यानुसार, काही पोलिस कर्मचारी आणि समाजातील उच्चभ्रू वर्ग यामध्ये अप्रत्यक्ष सहभाग घेऊन संरक्षण देत असल्याचे आरोप होत आहेत. शेतकऱ्यांचे खिसे रिकामे, पोलिसांचा मूग गिळलेला अवस्थेत दिसत आहे. शेतकरी, कामगार आणि बेरोजगारांसाठी आधीच आर्थिक संकटाची परिस्थिती आहे. अशावेळी 'भिंगरी' सारख्या अवैध मार्गांनी त्यांच्यावर होणारा आर्थिक अन्याय हा गंभीर आहे. तरीही पोलिसांनी यावर अजूनही कोणतीही ठोस पावले उचलली नसल्याने त्यांच्याच भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होतो.

### शासनाची आणि समाजाची जबाबदारी

भिंगरीसारख्या व्यवसायावर कारवाई करताना केवळ पोलिस नव्हे, तर संपूर्ण यंत्रणेला एकत्र येण्याची गरज आहे. सामाजिक संघटना, युवक संघटनांनी पुढाकार घेऊन हा नाशकारी प्रवाह थांबवण्यासाठी जागृती करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा यवतमाळच्या शेतकऱ्यांचे आणि तरुणांचे भवितव्य अधिक अंधारमय होऊ शकते.

# राळेगावच्या सामाजिक कार्यकर्ते गोपाल आडे यांचा शिवसेनेत प्रवेश

जनमाध्यम प्रतिनिधी



**पालकमंत्री संजय राठोड यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश; अनेक कार्यकर्त्यांचा सहभाग**

यवतमाळ - राळेगाव मतदार संघातील वाढोणाबाजार गावचे सुपुत्र, माध्यमिक शिक्षण मंडळाचे निवृत्त अधिकारी आणि समाजसेवक गोपाल आडे यांनी आज शिवसेनेत अधिकृतरित्या प्रवेश केला. हा पक्षप्रवेश यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री तथा शिवसेनेचे प्रमुख नेते नामदार संजय राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रभावी नेतृत्व आणि पालकमंत्री संजय राठोड यांच्या कार्यप्रणालीने प्रेरित होऊन गोपाल आडे यांनी शिवसेनेत सक्रिय काम करण्याचा निर्णय घेतला. समाजकारणात ठसा उमटवण्याच्या उद्देशाने त्यांनी शिवसेनेच्या माध्यमातून काम करण्याची इच्छा व्यक्त केली असून, जिल्हा नेतृत्वाच्या मार्गदर्शनात ते जनतेसाठी कार्य करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी गोपाल आडे यांच्यासोबत अनेक स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनीही शिवसेनेत प्रवेश केला. यात मधुकर लीलारे (सरपंच), शरद व अमोल रामटेके (उपसरपंच), रामभाऊ धनस्कर, संजय पवार (सरपंच, खैरी), प्रेम आडे, तुलसीदास वाईकर, संजय निनावे तसेच शेळी, खोरद, मोहदरी येथील अनेक कार्यकर्ते यांचा समावेश होता.

कार्यक्रमावेळी शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख हरिहर लिंगनवार, जिल्हाप्रमुख श्रीधर मोहोड, माजी जिल्हाप्रमुख पराग पिंगळे, राजुदास जाधव, गजानन डोमाळे, यशवंत पवार, गणेश गावंडे आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. या सामूहिक पक्षप्रवेशामुळे राळेगाव मतदार संघात शिवसेनेचे बळ वाढले असून, स्थानिक पातळीवर पक्षाच्या संघटनात्मक कामकाजाला अधिक चालना मिळणार आहे, असा विश्वास जिल्हा पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# वकिलांवरील ईडीच्या कारवाईस फॅमिली कोर्ट बार असोसिएशनचा तीव्र निषेध

## बार कौन्सिल ऑफ इंडियाकडे मागणीपत्र सादर

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - अलीकडच्या काळात कायदेशीर सल्ला दिल्याच्या कारणावरून काही वरिष्ठ वकिलांवर अंमलबजावणी संचालनालय (ईडी) कडून समन्स बजावण्यात येत असल्याच्या प्रकारांनी वकिलांमध्ये चिंता निर्माण केली आहे. याच पार्श्वभूमीवर फॅमिली कोर्ट बार असोसिएशन, यवतमाळच्या वतीने बार कौन्सिल ऑफ इंडिया (BCI) कडे यासंदर्भात तातडीची कार्यवाही करावी अशी मागणी करणारे निवेदन सादर करण्यात आले आहे.

असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. वैभव एडके व उपाध्यक्ष ॲड. जितेश पवार यांच्या नेतृत्वाखाली २१ जून रोजी हे निवेदन पाठविण्यात आले. त्यात म्हटले आहे की, अलीकडेच ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. अरविंद दातार व ॲड. प्रताप वेणुगोपाल यांना केवळ दिलेल्या कायदेशीर सल्ल्यासंदर्भात ईडीने समन्स बजावले. या कृतीचा फॅमिली कोर्ट बार असोसिएशनने तीव्र निषेध केला असून, यामुळे वकिलांच्या स्वातंत्र्यावर आघात होत असल्याचे मत त्यांनी मांडले आहे. निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, वकिल आणि त्यांचा पक्षकार यांच्यातील संवाद गोपनीय असतो.

भारतीय साक्ष्य अधिनियमामार्फत संरक्षित आहे. केवळ सल्ला दिल्याबद्दल वकिलांना गुन्हेगारी चौकशीस सामोरे जावे लागणे हे गंभीर व धोकादायक पाऊल असून, अशा घटना रोखण्यासाठी कठोर निर्देश जारी करणे आवश्यक आहे. फॅमिली कोर्ट बार असोसिएशनने केलेल्या मागण्यांमध्ये पुढील मुद्द्यांचा समावेश आहे. वकिलांना दिलेल्या कायदेशीर सल्ल्यामुळे त्रास देण्याचे प्रकार त्वरित थांबवावेत. समन्स किंवा चौकशीसाठी आवश्यक ती कायदेशीर प्रक्रिया काटेकोरपणे पाळावी. वकिलांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारांनी स्पष्ट आणि प्रभावी नियमावली तयार करावी. कायद्याच्या अंमलबजावणी संस्थांकडून वकिलांवर मनमानी कारवाई थांबविण्यासाठी BCI ने तातडीने हस्तक्षेप करावा. "वकिल हा न्याय प्रणालीचा एक आधारस्तंभ आहे.

जर वकिलांना त्यांच्या कर्तव्यात अडथळे निर्माण झाले, तर संपूर्ण न्यायव्यवस्थेच्या पारदर्शकतेवर आणि कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे राहील," असे मत ॲड. वैभव एडके यांनी व्यक्त केले. फॅमिली कोर्ट बार असोसिएशन यवतमाळने स्पष्टपणे सांगितले आहे की, वकिलांच्या हक्कांसाठी आणि स्वातंत्र्यासाठी त्यांचा संघर्ष अखंडपणे सुरूच राहणार आहे.

तसेच, बार कौन्सिल ऑफ इंडियाने या गंभीर मुद्द्याकडे तातडीने लक्ष घालून आवश्यक ती पावले उचलावीत, अशी ठाम मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

# आज वाजणार शाळेची पहिली घंटा

जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - नवीन शैक्षणिक सत्रात राज्यातील शाळा १६ जूनपासून सुरू झाल्या आहेत तर विदर्भातील शाळा आज २३ जूनपासून सुरू होत आहेत. येणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी शाळा प्रवेश महोत्सव हा उपक्रम साजरा करावा लागणार आहे. विशेष म्हणजे यावर्षी पहिल्यांदाच प्रत्येक जिल्ह्यात शाळा प्रवेशोत्सव कक्ष स्थापन करण्यात येणार आहे.

या कक्षामध्ये आवश्यक कर्मचारी अधिकारी यांची नेमणूक करण्यात येणार आहे. शाळांमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी शाळा प्रवेशोत्सव उपक्रम राज्यभर राबविण्यात येणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांची गुणवत्ता व मुलांची उपस्थिती वाढविण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येतो. तर विदर्भात २३ जून रोजी शाळा सुरू होत आहेत. त्यामुळे २३ जून ते २८ जून या ५ दिवस शाळा सकाळच्या सत्रात म्हणजे सकाळी ७ते ११.४५ या कालावधीत घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. २९ जून रोजी रविवार असल्याने सुटी राहील. ३० जूनपासून शाळा नियमित वेळेवर सुरू होणार आहेत. शाळा प्रवेश महोत्सव या उपक्रमाच्या नियोजनासाठी शाळा प्रवेशोत्सव कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. या कक्षामध्ये आवश्यक कर्मचारी अधिकारी यांची नेमणूक करण्यात येणार आहे. विदर्भात शाळा २३ जूनपासून सुरू होत असल्याने २१ व २२ जून रोजी हा कक्ष सतत सुरू राहीला होता.

शाळा प्रवेशोत्सवबाबत आवश्यक पूर्ततयारी करण्याचे निर्देश देण्यात आले असून मागितलेली माहिती तत्काळ द्यावी लागणार आहे.

राज्यस्तरावरून यावर्षी पहिल्यांदाच शाळा प्रवेशोत्सवकक्ष स्थापन होत आहे. विशेष म्हणजे शाळा प्रवेशोत्सव या उपक्रमाची माहिती तत्काळ त्याच दिवशी वरिष्ठ स्तरावर द्यावी लागणार असल्याने गटशिक्षणाधिकारी यांच्या लॉगिनला शाळा प्रणालीमध्ये शाळा भेटीचा अहवाल नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

लोकप्रतिनिधींनी शाळांना भेटी देण्याच्या उपक्रमांतर्गत नामदार इंद्रनील नाईक हे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा श्रीरामपूर येथे आज भेट देणार आहे.

# मराठा सेवा संघ महागावतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा

जनमाध्यम प्रतिनिधी



महागाव - मराठा सेवासंघ महागाव तालुक्याच्या वतीने शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये झालेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा इयत्ता दहावी व बारावीमध्ये गुणवत्ता यादीत प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा दिनांक २२ जुन २०२५ रविवारी मातोश्री विद्यालय येथे उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सुनंदा दिलीपराव कोपरकर नगराध्यक्ष नगरपंचायत महागाव ह्या होत्या तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून शिवश्री सुरेश कदम सर जिल्हाध्यक्ष मराठा सेवा संघ यवतमाळ हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सुरेश पाटील नरवाडे माजी उपाध्यक्ष नगरपंचायत महागाव, राजूभाऊ राठोड शिवसेना तालुकाप्रमुख, प्रमोद उर्फ शाखा भरवाडे शिवसेना जिल्हा उपाध्यक्ष तथा सभापती नगरपंचायत महागाव, प्रमोद जाधव तालुकाध्यक्ष राष्ट्रीय किसान मोर्चा, नारायण शिरबिरे नगरसेवक, संजय कोपरकर मराठी पत्रकार संघ तालुका अध्यक्ष हे होते. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ मासाहेब व विद्येची देवता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व जिजाऊ वंदनेने करण्यात आली. यानंतर प्रमुख पाहुण्यांचे स्वागत संत विचार हे पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले.

नंतर मान्यवरांच्या शुभहस्ते इयत्ता बारावी व इयत्ता दहावी मधून तालुक्यातून प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा मराठा सेवा संघाची शिवधर्म दिनदर्शिका, जिजाऊ चरित्र पुस्तक, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले नंतर तालुक्यातील सर्व शाळेतून प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत सुद्धा जिजाऊ चरित्र हे पुस्तक, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले व सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यानंतर प्रमुख मार्गदर्शक शिवश्री सुरेश कदम सर जिल्हाध्यक्ष मराठा सेवा संघ यवतमाळ यांनी विद्यार्थ्यांना अनमोल असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संदीप शिंदे यांनी केले तर अमोल जगताप यांनी आभार मानले. या गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी उत्तमभाऊ नरवाडे मराठा सेवा संघ तालुकाध्यक्ष, पंकज देशमुख मराठा सेवा संघ तालुका सचिव, डॉ. संदीप शिंदे जिल्हा सचिव, अमोल जगताप जिल्हा कार्यकारणी सदस्य तसेच मराठा सेवा संघाचे सतीश ठाकरे, विठ्ठल वाघमारे, स्वप्निल नरवाडे, किशोर सोळंके, चतुर्वेद अडकिने, सुरज घोंगडे, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष आशिष गावंडे तसेच शिक्षक विजय कदम व रवी भगे यांनी प्रयत्न केले.

# वेचक



## मजूराच्या मुलीची नीट परिक्षेत यशस्वी भरारी, हुजैफाचे डॉक्टर बनण्याचे स्वप्न होणार साकार !

उमरखेड - मोल मजुरीचे हाताला मिळेल ते काम करून आपल्या मुलीला उच्चशिक्षित करण्याचे ध्येय बाळगणाऱ्या शेख जमीर यांची मुलगी कुमारी हुजैफा तहेरीन हिने यंदाच्या नीट परीक्षेत 482 गुण मिळवून वडिलांचे स्वप्न साकार केले आहे. स्थानिक गोपिकाबाई गावंडे महाविद्यालय बारावीचे शिक्षण पूर्ण करून एम पी एस अकॅडमीच्या माध्यमातून तिने आपला उच्चशैक्षणिक प्रवास सुरू केला. डॉक्टर बनण्याचे ध्येय गाठले कुमारी हुजैफा हिनेनीट परीक्षेत 482 गुण मिळविले तिची ऑल इंडिया रँक 74328 आणि ई डब्ल्यू एस कॅटेगिरी रँक 9251 आहे .शहरातील नामांकित एम पी एस अकॅडमी मधून तालुक्यातून ती प्रथम आली आहे .अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत तिने एकाग्रचित्ताने सतत अभ्यास करून जिद्दीने यशोशिखराकडे मार्गक्रमण करीत असल्याने हुजैफाचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## मनसे लोकल ऑटो युनियनची स्थापना



उमरखेड - रिक्षा चालक हा समाजाचा एक प्रमुख घटक असून त्यांना सन्मानाने व संघटीत जगता यावे म्हणून २२ रोजी येथील शासकिय विश्रामगृह येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेना लोकल ऑटो युनियनची स्थापना मनसे शहराध्यक्ष संजय बिजोरे पाटील यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या मनसे लोकल ऑटो युनियनचे अध्यक्षपदी राजू कोथळकर तर उपाध्यक्षपदी सोनू गडदे व श्याम सुरोशे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. याप्रसंगी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष संजय बिजोरे पाटील यांनी शहरातील ऑटो रिक्षा चालकांना एकत्रित करून स्थानिक विश्रामगृह येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेना लोकल ऑटो युनियनची स्थापना करून सर्व सदस्यांच्या सुखदुःखात त्यांच्या उद्भवणाऱ्या समस्या सोडविण्याकरिता आपण ही संघटना स्थापन केली असल्याचे सांगितले. यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनाचे उपजिल्हाध्यक्ष डेविड शहाणे, संजय बिजोरे पाटील, संदीप कोकाटे, लक्ष्मण भांगे, अमोल लामटिळे, आशिष वाकोडे, दीपक डोंगरे यासह अनेक महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## डॉक्टर व आरोग्य भारतीच्या पथकाची वारकऱ्यांना सेवा



पुसद - आरोग्य भारतीच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे सचिव डॉ. संतोषजी गटणे यांचे प्रमुख मार्गदर्शनाखाली आरोग्य भारती पुसद, विदर्भ प्रांतच्या एका पथकाने पंढरीच्या आषाढी वारी निमित्त वारकऱ्यांना ओंकारेश्वर मंदिर पुणे येथे २१ जुन रोजी वैद्यकिय सेवा दिली. आरोग्य भारती पुसद जिल्हा संयोजक डॉक्टर अमोल पाटील यांच्या मार्गदर्शनात सेवेसाठी गेलेल्या पथकात ४महिला वैद्यकिय अधिकारी, २पुरुष वैद्यकिय अधिकारी व इतर आरोग्य भारतीचे कार्यकर्ते अशी ११ जणांची टीम आहे. माणसातील ईश्वर तत्त्वाची सेवा करण्यासाठी आरोग्य भारतीचे कार्यकर्ते स्वखर्चाने सेवाभाव मनात ठेवून जात आहेत. समाजातील अनेक 'अनामिक माऊलींकडून वारकरी आरोग्य सेवा शिबिरासाठी पुसद तसेच धुळे, नागपूर, संभाजीनगर येथून औषधी प्राप्त झाली आहे. आरोग्य भारती 'स्वस्थ व्यक्ती स्वस्थ परिवार - स्वस्थ ग्राम-स्वस्थराष्ट्र 'या संकल्पनेवर काम करून समाजात स्वास्थ्य संबंधित जागरण करते. या पथकात डॉ. सुहासिनी भोपी, डॉ. मीरा डांगे, डॉ. रती वाढवाने (सर्व स्त्रीरोगतज्ञ), डॉ. राखी आरोग्य भारती पाटिल (आयुर्वेदाचार्य) व डॉ. विश्वास डांगे (नाक कान घसा तज्ञ) डॉ. संदिप वाढवाने (त्वचारोगतज्ञ) तसेच प्रगती गावनार, कल्पना हरसुलकर, कैलास गावनार, साईबाबा वड्डमवार, स्वप्निल महाजन, सई पाटिल यांनी सेवा देतील/दिली. या शिबिराचे माध्यमातून वारकरी बांधवांपर्यंत निःशुल्क व गुणवत्ता पूर्ण आरोग्य सेवा पोहोचवून शरीर व मन निरोगी ठेवण्यासाठी एक पाऊल अधिक पुढे टाकण्यात आले.

# खैरखेडा येथील आयईसी शिबीरात ६२० नागरीक सहभाग

## सांस्कृतीक सभागृहाचे उद्घाटन व हस्तांतरण सोहळा

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - तालुक्यातील खैरखेडा येथे आयईसी शिबीराचे उद्घाटन ना. ॲड. इंद्रनील नाईक यांच्याहस्ते करण्यात आले होते. उद्घाटन प्रसंगी तहसीलदार महादेव जोरवार, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी अमोल मेतकर यांनी दि.२१ जुन २०२५ रोजी केले होते.

मौजे खैरखेडा येथे शिबिराच्या यशस्वीते करीता गटविकास अधिकारी अमोले आदेलवाड, कृषी अधिकारी, आरोग्य अधिकारी तसेच क्लस्टर मधील लोकप्रतिनिधी व प्रतिष्ठित नागरीक तसेच खैरखेडा गावातील आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, कोतवाल, पोलीस पटील, तलाठी, ग्रामसेवक, सरपंच, मंडळ अधिकारी, कृषी सहायक, नोडल अधिकारी व इतर संबंधीत विभागाचे सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.खैरखेडा येथील आयईसी शिबीरामध्ये अंदाजे ६२० नागरीकांनी सहभाग घेतलेला आहे.सहभागी नागरीकांना विविध प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आलेले आहे.तसेच नामदार ॲड. इंद्रनील नाईक यांच्या हस्ते शासकीय आश्रमशाळा खैरखेडा येथील सांस्कृतीक सभागृहाचे उद्घाटन करून शाळेला हस्तांतरण करण्यात आले.

मार्गदर्शनामध्ये अनुसुचित जमातीच्या मुलींनी जास्तीत जास्त शिक्षणाच्या प्रवाहात येऊन शिक्षण घ्यावे तसेच धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान योजनेतून जास्तीत जास्त विकास कामे करण्यात येतील असे सांगितलेले आहे. पुसद प्रकल्पांतर्गत एकुण सात तालुक्यातील ६४ ठिकाणी आयईसी शिबीर आयोजन केलेले आहे.

या शिबीरात जास्तीत जास्त अनुसूचित जमातीच्या नागरीकांनी जाऊन कागदपत्रे, दाखले प्राप्त करून घेणे करीता या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन प्रकल्प अधिकारी अमोल मेतकर यांनी केले आहे.

# दिग्रसला १० वी १२ विच्या गुणवंतांचा पालकांसह सत्कार

## पालकमंत्री संजय राठोड यांच्याकडून ५०० विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व भेटवस्तू

जनमाध्यम प्रतिनिधी



दिग्रस - पालकमंत्री संजय राठोड यांनी तालुक्यातील दहावी, बारावीत ७५ टक्केच्यावर गुणप्राप्त ५०० विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत, त्यांचा पालकांसह सत्कार करून प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन पुढील उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

मृद व जलसंधारणमंत्री तथा जिल्हाचे पालकमंत्री या विभागाचे आ. संजय राठोड यांच्या संकल्पनेतून मागील १६ वर्षांपासून अखंडपणे सुरु असलेला वर्ग दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा शिवसेना, युवासेना, विद्यार्थीसेना, युवतीसेना व महिला आघाडी यांच्या पुढाकाराने बी. एन. स्वामी डीएसओ पुसद, ठाणेदार वैजनाथ मुंडे, शिवसेना माजी जिल्हाप्रमुख पराग पिंगळे, शिवसेना महिला आघाडी जिल्हाप्रमुख वैशाली मासाळ, सुधीर देशमुख, राजकुमार वानखडे, उत्तम ठवकर, डॉ. संदीप दुधे, मिलिंद मानकर, विनोद जाधव, बबुसिंग जाधव, प्रा. प्रेम राठोड, डॉ. मनोज टेंभरे, संजीव चोपडे, दिवाकर राठोड, अरुण राठोड, संजिवनी शेरे, वर्षा नैकोट, दुर्गा दुधे, माधुरी महल्ले, प्रावीना अस्वार, शिल्ल होडगीर आदींसह विद्यार्थी व पालक तथा शिवसेनेचे प्रमुख पदाधिकारी यांच्या उपस्थितीत या विभागाचे आमदार, मंत्री मृद व जलसंधारण तथा पालकमंत्री संजय राठोड यांच्याहस्ते येथील जुना दारव्हा रोडवरील अंश मंगलम येथे शुक्रवार ता. २० जून रोजी घेण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक व त्यांच्या आई-वडिलांच्या सत्कार सोहळा कार्यक्रमाने दिग्रसकरांचे लक्ष वेधून घेतले. संचलन पत्रकार सुरेंद्र मिश्रा, प्रास्ताविक भाजपा शहर अध्यक्ष अभय इंगळे तर आभार रामदास पद्मावार यांनी मानले. दीप प्रज्वलन व सरस्वती पूजनानंतर १० वी १२ वीतील विशेष गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांसह पालकांना फेटे बांधून वाजतगाजत कार्यक्रम स्थळी पाचारण होताच . "इतनी शक्ती हमे देना दाता, मन का विश्वास कमजोर ना हो" गायक श्रीकांत टकले यांनी सादर केलेल्या या गीताने सुरुवात झालेल्या या कौतुक सोहळ्यात १०व १२ वि मध्ये ७५% च्यावर गुणप्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, फाईल व इतर भेटवस्तू, व प्रमाणपत्र देऊन तर शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन पालकांचा सत्कार करण्यात आला. संजय राठोड यांनी तब्बल पाच तास एक-एक करित सर्व विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत त्यांचा उत्साह द्विगुणित केला.

# वेगळी भाषा व पेहराव असलेल्या भिकाऱ्यांमुळे आर्णीकर त्रस्त

जनमाध्यम प्रतिनिधी



## कायदा व सुव्यवस्थेला धोका


यवतमाळ - आर्णी शहरातील माहूर रोड व दिग्रस रोडलगत भिक्षा मागणाऱ्या परंतु मराठी किंवा हिंदी न समजणाऱ्या, वेगळ्या वेशभूषेतील असंख्य भिकाऱ्यांनी शहरात दहशतीचे वातावरण निर्माण केले आहे. दुकानासमोरील सार्वजनिक ठिकाणी दारू, गांजा, सोल्युशन यांचे सेवन करत हे भिकारी सतत भांडण तंट्यांमध्ये गुंतलेले दिसतात. त्यांच्या वाढत्या संख्येमुळे आर्णीतील कायदा व सुव्यवस्थेला मोठा धोका निर्माण झाला असून नागरिक व दुकानदारांमध्ये तीव्र अस्वस्थता पसरली आहे.

यापैकी अनेकजण शंकरपट मैदान व हिर टॉकीजच्या लेआऊट परिसरात तात्पुरत्या कापडी झोपड्यांमध्ये वास्तव्यास आहेत. पावसाळा असो वा उन्हाळा, ही मंडळी शहरातील दुकानांपुढे सामूहिकपणे झोपतात, दिवसाढवळ्या नशा करतात, व मोठमोठ्याने ओरडून एकमेकांशी मारामारी करतात. विशेष म्हणजे महिलांबरोबर लहान मुले देखील या नशेच्या गर्तेत सापडलेली दिसून येतात. या प्रकारामुळे छत्रपती शिवाजी चौक ते दर्गा परिसरातील तब्बल 35 दुकानदारांना आपल्या व्यवसायात अडथळा निर्माण होत असून दुकानासमोरील घाण, अस्वच्छता व धोकादायक वातावरणामुळे ग्राहकही येण्यास कचरत आहेत. संबंधित दुकानदारांनी पोलीस ठाणे व नगर परिषद येथे लेखी तक्रार दाखल केली असूनही अद्याप कुठलीही ठोस कारवाई झालेली नाही, असा आरोप व्यापाऱ्यांकडून करण्यात येत आहे. पूर्वी तत्कालीन ठाणेदार पितांबर जाधव यांनी अशा प्रकारच्या भिकाऱ्यांची माहिती गोळा करून त्यांना शहराबाहेर हाकलून लावले होते. मात्र, सध्याचे पोलिस अधिकारी याबाबत उदासीन असल्याची भावना नागरिक व व्यापाऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. "आम्ही रोज या त्रासाला कंटाळलो आहोत. दुकानासमोरील वातावरण इतके खराब झालंय की ग्राहक येत नाहीत. प्रशासनाने तात्काळ पावले उचलावीत," अशी संतप्त प्रतिक्रिया माऊली ऑटोमोबाईलचे अभिषेक नीलापवार, यश ऑटोमोबाईलचे अशोक येरावार व हिर टॉकीजचे व्यवस्थापक अमीन कासम सय्यद यांनी व्यक्त केली. आर्णी शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी आता या विषयावर पोलिस विभाग व स्थानिक प्रशासनाने तात्काळ कठोर कारवाई करावी, अशी एकमुखी मागणी केली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला आहे.

# साडेतीन कोटींच्या 'तारांगण' प्रकल्पाची दुर्दशा

## गुरुदेव युवा संघाकडून भ्रष्टाचाराचा आरोप, पावसाळी अधिवेशनात आंदोलनाचा इशारा

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - यवतमाळ नगर परिषद अंतर्गत 'नाविन्यपूर्ण योजना' अंतर्गत सुमारे ३ कोटी २७ लाख ७१ हजार रुपयांच्या खर्चाने उभारण्यात आलेल्या तारांगण प्रकल्पाचा आज भूतवत अवस्था येऊन 'भूतबंगला' झाली असल्याची संतप्त प्रतिक्रिया गुरुदेव युवा संघाचे अध्यक्ष मनोज गेडाम यांनी व्यक्त केली आहे.

११ ऑगस्ट २०१८ रोजी माजी आमदार मदनभाऊ येरावार (राज्यमंत्री व पालकमंत्री, यवतमाळ) यांच्या शुभहस्ते आणि कांचनताई चौधरी (नगराध्यक्षा) यांच्या अध्यक्षतेखाली भव्य भूमिपूजन समारंभ पार पडला. नेहरू उद्यान परिसरात उभारण्यात आलेल्या या तारांगणाच्या निर्मितीला शासनाच्या निधीतून करोडो रुपयांचा खर्च करण्यात आला. शिक्षण, विज्ञान आणि अंतराळविषयक जनजागृती हा हेतू असूनही आज हे तारांगण ओसाड व निष्क्रिय स्थितीत असून, प्रशासनाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे सार्वजनिक निधी वाया गेला आहे. गुरुदेव युवा संघाने आरोप केला की, इतक्या मोठ्या निधीतून उभारण्यात आलेल्या या प्रकल्पात निष्कृष्ट दर्जाचे काम झाले असून, मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे. संबंधित निधीचा हिशेब मागण्यासाठी व या विषयावर जनतेची फसवणूक रोखण्यासाठी येत्या पावसाळी अधिवेशनात आंदोलन करण्यात येणार आहे. "गोरगरीब जनतेच्या कराच्या पैशातून शासनाकडे येणाऱ्या निधीचा उपयोग जनतेच्या हितासाठी व्हावा, अशी अपेक्षा असते. मात्र येथे साडेतीन कोटी रुपयांचा अपव्यय करून कोणत्याही प्रकारचा फायदा नगरपरिषदेला झाला नाही. एक महिना चालवून दाखवलेले हे तारांगण नंतर बंद करून टाकण्यात आले. जनतेचा विश्वासघात झाला आहे," असे मनोज गेडाम यांनी सांगितले. नगर परिषद आणि प्रशासनाने हा प्रकल्प कार्यान्वित न ठेवता जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्यामुळे, यामागील हितसंबंध, टक्केवारीची प्रथा व भ्रष्टाचार उघडकीस आणण्यासाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे.

# मृग पण कोरडा... शेतक-यांना चिंतेचे वारे



## २० दिवसांत ४९ टक्के पावसाची तूट , पुन्हा २५ जूनपर्यंत उघडी

**अमरावती/ का.प्र.**

यंदा ८ जूनपासून सुरू झालेले मृग नक्षत्र शनिवारी संपत असून, आर्द्रा सुरू होत आहे. दरवर्षीप्रमाणेच हवामानाच्या भाकितांना हुलकावणी देत मृग कोरडा राहिला व पावसाअभावी पेरण्या रखडल्या.

जून महिन्यात आतापर्यंत सरासरी ४९ टक्के पावसाची तूट राहिली आहे व पुन्हा २५ जूनपर्यंत पावसाची उघडीप राहणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आकाशाकडे लागल्या आहेत.

यंदा वेळेपूर्वी मान्सूनचे आगमन राज्यात झाल्याने पेरणीपूर्व मशागतीला वेग आला. मात्र, जिल्ह्यात मान्सून सक्रिय झालाच नाही. 'आयएमडी'ने जिल्ह्यात मान्सूनच्या आगमनाची शुभवार्ता दिली. तीन दिवस हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी कपाशीच्या लागवडीला सुरुवात केली. पावसाची उघडीप झाली. चार दिवसांपासून पावसाचा पत्ता नाही व पुढील चार दिवस येण्याची शक्यता नाही.

मोर्शी, धामणगाव धारणीत कमी पाऊस २० जूनपर्यंत १०४ मिमी पावसाची सरासरी आवश्यक असताना प्रत्यक्षात ५२.६ मिमी पावसाची नोंद झालेली आहे. ही ५०.९ टक्केवारी आहे. जिल्ह्यात आतापर्यंत फक्त सरासरीच्या १०८ टक्के पाऊस अंजनगाव सुर्जी तालुक्यात झाला, तर सर्वात कमी ३०.२ टक्के धारणी, ३१.८ टक्के मोर्शी व ३४.६ टक्के पाऊस धामणगाव तालुक्यात झालेला आहे.

कृषी विभागाच्या १९ जूनच्या अहवालानुसार जिल्ह्यात ३७,०९९ हेक्टर पेरणी झालेली आहे. ही ५.४३ टक्केवारी आहे. यामध्ये सर्वाधिक १३,६४५ हेक्टरमध्ये कपाशी, ८,०८१ हेक्टरमध्ये मका, ४८१० हेक्टरमध्ये तूर, ९९४८ हेक्टरमध्ये सोयाबीनची पेरणी झालेली आहे. पावसाची उघडीप असल्याने खरिपाच्या पेरण्या रखडल्या आहेत.पुरेसा ८० ते १०० मिमी पाऊस झाल्याशिवाय शेतकऱ्यांनी पेरणी करू नये. घरगुती बियाण्यांना बीज प्रक्रिया करावी व उगवण तपासावी. अधिकृत दुकानातूनच निविष्ठा खरेदी करावी व पक्की पावती घ्यावी.

# अपुऱ्या पावसावरच पेरणीची लगबग सुरू

**अमरावती/ का.प्र.**

शेतकऱ्यांनी मे महिन्याच्या सुरुवातीलाच खरीप हंगामासाठी पेरणीपूर्व मशागतीचे कामे पूर्णत्वास नेली; परंतु मे महिन्यातच अवकाळी पावसाचे आगमन झाल्याने शेतकऱ्यांना बऱ्याच अडचणीचा सामना करावा लागला. मे महिन्याभरकधी ढगाळ, तर कधी तापमान अशी परिस्थिती दिसून आली; परंतु मृग नक्षत्र सुरू होताच शेतकरी पावसाच्या आगमनाच्या प्रतीक्षेत आस धरून बसले.

पेरणीसाठी शेतजमीन तयार असल्याने ७ जून नंतर शेतकऱ्यांच्या नजरा आभाळाकडे दिसू लागल्या. त्यानंतर एक दोनदा झालेल्या दमदार पावसामुळे काही शेतकऱ्यांनी या पावसावरच शेतात खरीप पिकांची लागवड सुरू केली. यामध्ये मका, वांगी, हळद, तूर, कपाशी, ज्वारी, एरंडी, मिरची, वाल या पिकांचा समावेश आहे; परंतु त्यानंतर कधी कधी ढगाळ वातावरण तर कधी तापमान, अशी परिस्थिती कायम असल्याचे दिसून आल्यामुळे सरसकट पेरणी होणे आजही बाकी आहे; परंतु



ज्या शेतकऱ्यांनी अपुऱ्या पावसावर लागव केली आहे व ज्यांची लागवड होणे बाकी आहे असे शेतकरी पावसाच्या आगमानाच्या प्रतीक्षेतच आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे जमिनीत रूजवलेली बी बियाणे पावसाअभावी खराब होण्याची शक्यतावर्तवली जात असल्याने ज्यांनी अपुऱ्या पावसावरच पेरणी केली, त्यांच्यावर दुबार पेरणीचे संकट ओढवू शकते, याचा शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसण्याची दाट शक्यताही वर्तवली जात आहे.

गतवर्षी कपाशीला असणारा बाजारभाव व आताची वाढती मजुरी लक्षात घेता यावर्षी बहुतांश शेतकऱ्यांनी कपाशी पिकाकडे पाठ फिरवली असून स्थानिक शेतकऱ्यांचा तूर लागवडीकडे जास्त कल दिसून येत आहे. हळद, मिरची यासारखी पिकेसुद्धा या भागातून दिवसेंदिवस कमी होत आहे. बहुतांश तालुक्यातील शेतकऱ्यांनी संत्रा, मोसंबी, बागा तयार केल्याने मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे संत्राबागांना ताण बसला नाही. त्यामुळे संत्रा झाडांच्या पालवीने चिम घेतली नसल्याने पालवी हिरवीगार असल्याचे दिसत आहे. त्यामुळे मृग बहारसुद्धा शेतकऱ्यांच्या हातून गेला, याचाही फटका संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना बसणार आहे. मृग नक्षत्र संपण्याच्या मार्गावर असून या नक्षत्रात अल्पशा प्रमाणात पाऊस झाल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत अधिक वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

२२ जूनपासून सुरु होणाऱ्या आर्द्रा नक्षत्रात वरूणराज्याची शेतकऱ्यांवर कशी कृपादृष्टी राहील, यावर शेतकऱ्यांचे पुढील भवितव्य अवलंबून आहे.



# वीस दिवसांपासून ग्रामपंचायतचे दुर्लक्ष

## जोडरस्त्यावरील रपटा झाला धोकादायक

**अमरावती/ का.प्र.**

पथ्रोट येथे वार्ड क्रमांक पाच मधील किराडपुरा येथील मेडिकल लाईनकडून येणाऱ्या रस्त्याला लागून असलेल्या किराडपुरा येथील ग्रामस्थांच्या घराकडे जाणाऱ्या जोड रस्त्यावरील रपटा धोकादायक झाल्याने किरकोळ अपघाताला आमंत्रण मिळत आहे.

गजानन वर्मा गुरुजी यांच्या घरासमोरील नाली चोकअप झाल्यामुळे ग्रामपंचायतने त्यावर असलेला रपट्टा खोदला होता; परंतु वीस दिवसांपासून तो बुजवण्याचा साधे सौजन्य दाखवले नाही. जोड रस्ता असल्यामुळे तेथून वाहने घेऊन जाण्यास अपघाताचा धोका निर्माण स्थानिक ग्रामस्थांमध्ये रोष निर्माण झाला आहे. जुन्या नालीची दुरुस्ती करून त्यावर बंदिस्त नाली म्हणून गावातील बऱ्याच ठिकाणी नालीवर सिमेंट कॉंक्रीटने स्लॅब टाकला: परंतु त्या बंदिस्त नालीमधून मध्येच काडीकचरा अडकतो. त्यामुळे रपटे फोडून साचलेले पाणी काढून टाकावे.

लागते. त्यामुळे आधी सिमेंट कॉंक्रीटने हजारो लाखो रुपये खर्च करून ते नालीवरील रपटे फोडावे लागत असल्याने लाखो रुपयांचे नुकसान होत आहे आणि पुन्हा दुरुस्तीसाठी निधीची तरतूद केली जाते;

परंतु कायमस्वरूपी दूरदृष्टी पाहून नालीची दुरुस्ती केली असती तर अशी परिस्थिती पुन्हा आली नसती. अनेक ठिकाणी किराडपुरा येथील रपटा खोदून ठेवला; परंतु तो खोदून ठेवलेलल्या रपट्यामुळे वाहनचालकांना व तेथील स्थानिक नागरिकांना किरकोळ अपघाताला बळी पडावे लागत आहे.

विशेष म्हणजे वार्ड क्रमांक पाच मधीलच उपसरपंच अतुल वाठ असूनसुद्धा रपटा दुरुस्ती करायला वीस दिवसांपेक्षा जास्त दिवस लागला. म्हणजे इतर वार्डातील गल्लीमधील त्पा परिसरात पावसाळ्यात काय परिस्थिती असेल, ग्रामपंचायतच्या विकासकामाची, हे या खोदलेल्या रपट्यावरुन लक्षात येते, अशी चर्चा स्थानिक नागरिकांमध्ये आहे.

# १.१२ लाख विद्यार्थ्यांना मिळणार गणवेश आणि बूट



**अमरावती/ का.प्र.**


समग्र शिक्षा अभियान आणि राज्य सरकारच्या नियमांनुसार, जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांमध्ये पहिली ते आठवीपर्यंत शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना दोन गणवेश, एक बूट आणि दोन जोड मोजे दिले जातील.

यासाठी जिल्हा परिषदेच्या १ हजार ६६८ शाळांमधील अशा १ लाख १२ हजार ४३१ विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी ३ कोटी २१ लाख ४ हजार ५०० रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे, ज्यामध्ये दोन गणवेशांसाठी ६०० रुपये आणि बूट आणि मोजेसाठी १७० रुपये दराने गणवेश वितरित केले जातील. या वर्षी शाळा व्यवस्थापन समितीमार्फत गणवेश वितरित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गणवेशाचा रंग, नमुना आणि तपशील ठरवण्याचे अधिकार शाळा व्यवस्थापन समित्यांना देण्यात येतील, अशी माहिती प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ. अरविंद मोहरे यांनी दिली. नियमांनुसार संबंधित शाळांना हा निधी वितरित करण्यात आला आहे. पीएम श्री शाळेतील सुमारे ५ हजार ७९० विद्यार्थ्यांसाठी गणवेशासाठी १ कोटी ७३ लाख ७ हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

# प्रवीण आखरे यांची पाण्यात योगासने

**अमरावती/ का.प्र.**

पोलिस जलतरण केंद्राचे प्रमुख पोलिस कर्मचारी प्रवीण आखरे यांनी ११ फुट खोल पाण्यात तब्बल १ तास २ मिनीट योगाभ्यास केला. गतवर्षीच्या तुलनेत यंदा योगाभ्यासाचा वेळ जास्त होता. शहर पोलिस मुख्यालयाच्या मार्फत जलतरण तलावाचे संचालन होते. या केंद्राची जबाबदारी पोलिस कर्मचारी प्रवीणआखरे यांच्यावर आहे.



ते येथे येणाऱ्या नागरिकांना जलतरणाचे तसेच जलयोगाचे प्रशिक्षण देतात.

त्यांनी आपल्या योग कौशल्याच्या जोरावर इंडिया बुक ऑफ रेकॉर्डसह एशिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नाव नोंदवले आहे. त्यांनी आज ११ फूट खोल पाण्याच्या आत तब्बल १ तास २ मिनिटे कोणतीही हालचाल न करता सावधान स्थितीत राहून अनोखा विक्रम केला. याशिवाय, त्यांनी २२ मिनिटे ५२ सेकंदात पाण्यावर तब्बल ५० योगासने सादर करून स्वतंत्र विक्रम प्रस्थापित केला आहे.

जागतिक योग दिनाच्या दिवशी त्यांनी जलतरण केंद्रात योगासने करून योगप्रतीची निष्ठा आणि जनजागृतीचा संदेश दिला आहे. त्यांचे कौतुक होत आहे.

# आर जी देशमुख कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राबविला योग दिन

**तिवसा/ वार्ताहर**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त, कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शेंदूरजना बाजार या गावात भेट देऊन एक विशेष कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमाचा उद्देश योगाच्या माध्यमातून आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे तसेच ग्रामीण जीवनशैली व अनुभवातून शिकणे हा होता.



विद्यार्थ्यांनी गावात येऊन योग सत्रात सहभाग घेतला आणि स्थानिक लोकांबरोबर संवाद साधला. या कार्यक्रमादरम्यान गावकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला व सर्वतोपरी मदत केली, त्यामुळे कार्यक्रम अधिक यशस्वी झाला.

प्रत्येक वयोगटातील ग्रामस्थांनी योग सत्रात भाग घेऊन सामूहिक आरोग्याची जाणीव व्यक्त केली. विद्यार्थ्यांना ग्रामीण संस्कृती समजून घेण्याची आणि समुदायाशी जोड निर्माण करण्याची अनोखी संधी मिळाली.सकाळच्या योगसत्रात विद्यार्थ्यांनी गावात येऊन सर्वप्रथम एकत्रित सूर्यनमस्कार, प्राणायाम व ध्यान सत्र घेतले. विशेष प्रशिक्षकांच्या मार्गदर्शना खाली हे सत्र पार पडले.

या कार्यक्रमा मध्ये उपस्तिथ विदयार्थी राज चव्हाण,चिराग धांदे,सारंग हीवसे,साक्षी घोडमारे, तेजस्विनी इंगोले उपस्थित होत.प्रा.अरुण डहाके,समन्वयक प्रा.सावन राठी,प्रा.लुंगे यांचा मार्गदर्शन लाभले.

# अमरावतीत उद्योजक मेळावा

## देआसरा फाउंडेशन आणि महाराष्ट्र सरकारचा उपक्रम

**अमरावती/ का.प्र.**

महाराष्ट्र सरकार आणि देआसरा फाउंडेशनच्या वतीने अमरावती मध्ये उद्योजकता मेळाव्याचे आयोजन करण्यात आलं आहे. राज्य सरकारच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचा यात सहभाग असणार आहे. यात उद्योजकांना मार्गदर्शन करण्यात येणार असून त्यांच्या व्यवसाय वाढिसाठी हे उपयुक्त असणार आहे.



गुरुवार, २६ जून रोजी हा मेळावा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात, मराठी विभागाच्या ए. वि. थिएटर मध्ये सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत होणार आहे.

**काय आहे खास?**

व्यवसाय वाढीवर प्रसिद्ध बिझनेस ग्रोथ स्ट्रॅटजिस्ट डॉ. रवींद्र अहेर यांच्याकडून उपयुक्त टिप्स आणि मार्गदर्शन मिळणार आहे.

तर उद्योजक कट्टा या खास उपक्रमात शहरातील सुप्रसिद्ध उद्योजक अमित आरोकर यांची मुलाखत होणार आहे.

या मेळाव्यात सहभागी होणाऱ्या उद्योजकांना मोफत उद्यम रजिस्ट्रेशन काढून देण्यात येणार आहे.

# फेस्कॉमचा जेष्ठ नागारिक छळवाद जनजागृती दिवस

**अमरावती / का.प्र.**

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक (फेस्कॉम)मुंबई प्रादेशिक विभाग आयोजित ज्येष्ठ नागरिक छळ प्रतिबंधक जनजागृती दिन १५ जून, निमित्ताने प्रमुख वक्ते विधी तज्ञ ॲड. प्रमोद ढोकले फेस्कॉम सल्लागार व यशवंतराव चव्हाण सेंटरचे विधी व सेवा सेंटरचे सक्रिय सदस्य, यांच्या उपस्थितीत संध्याकाळी ५ वाजता श्रमिक ज्येष्ठ नागरिक संघ, डिलायरोड, लोअर परेल, मुंबई येथे संपन्न झाला. सचिव मुकुंद फडतरे यांनी प्रास्ताविक करत सूत्र संचलन केले .फेस्कॉम मुंबई प्रादेशिक विभाग अध्यक्ष सुरेश पोटे यांनी उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.



१५ जून हा आंतरराष्ट्रीय स्तरांवर जेष्ठ नागरिक छळवाद जन जागृती दिवस म्हणून पाळला जातो.

त्याचा एक उपक्रम म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन केले. अस त्यांनी नमूद केले. ना. म. जोशी मार्गचे वरिष्ठ पोलीस अधिकारी अरविंद चंदनशिवे यांनी आपल्या व्यस्त दिनक्रमातून वेळ काढून या कार्यक्रमास उपस्थित राहून ज्येष्ठ नागरिकांना शुभेच्छा दिल्या. पोलीस दल ज्येष्ठांच्या मदती साठी तत्पर असल्याची ग्वाही दिली.

दिलीप गाडेकर, सदस्य फेस्कॉम मुंबई प्रादेशिक विभाग कार्यकारिणी सदस्य यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले या कार्यक्रमास स्वाती फडके, लता पोवार, फेस्कॉम प्रतिनिधी उपस्थित होते.

# दिशा इंटरनॅशनल आय बँक व प्रयास तर्फे नेत्रदान दिवस साजरा

**अमरावती/ का.प्र.**

नेत्रदान चळवळ घरो घरी पोहचावी, दिशा ग्रुपच्या युवा टीमने सुरु केलेल्या अमरावती मधील एकमेव दिशा इंटरनॅशनल आय बँकेची सेवा संपूर्ण देशाला मिळावी व नागरिकांनी या उपक्रमा मध्ये सहभागी व्हावे असे आव्हान श्रीमती कमलताई गवई यांनी जागतीक नेत्रदान दिवसानिमित्त्य कार्यक्रमात केले. या कार्यक्रमासाठी मेडिकल डिरेक्टर डॉ. मनिष तोटे, डेप्युटी मेडिकल डिरेक्टर डॉ. अंकित हरवाणी, अस्मिता शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा डॉ. मीनल भोंडे, प्रयास सेवांकुरचे संचालक डॉ. अविनाश सावजी, दिशा ग्रुपचे संस्थापक विश्वस्थ अरुण गावंडे आदी मान्यवर उपतिथीत होते.



या कार्यक्रमध्ये ३९ नेत्रदाता परिवारांचा सन्मान करण्यात आला. सोबत अंधत्व निवारणसाठी दिवसरात्र झटणाऱ्या १२ कार्यकर्त्यांना देखील सन्मान करण्यात आला. कार्यक्रमा दरम्यान श्रीमती कमलताई गवई पुढे म्हणाल्या कि युवकांनी सुरु केलेल्या या दिशा इंटरनॅशनल आय बँकेला इतर सर्व संस्थांनी व नागरिकांनी मदत करायला पाहिजे. लोक निधीतून सुरु झालेली दिशा इंटरनॅशनल आय बँके गेल्या अनेक वर्ष पासून संपूर्ण अमरावती मध्ये नेत्रदानाची सोय देत आहे व यवतमाळ, बुलढाणा इत्यादी ठिकाणी देखील त्यांनी शाखा सुरु केल्या आहेत.कार्यक्रमाचे संचालन निशांत देशमुख व स्वप्नील गावंडे यांनी केले. कार्यक्रमासाठी डॉ. श्रद्धा ढाकुलकर,प्रणाली चांभारे,हिमांशू बंड,अनिल देशमुख यांनी परिश्रम घेतले.

मृत्यूनंतर सहा ते आठ तासापर्यंत नेत्रदान केले जाऊ शकते. त्यामुळे मृत्युनंतर ताबडतोब दिशा इंटरनॅशनल आय बँकेला संपर्क करावा. मृत व्यक्तीचे डोळे उघडे असल्यास ते बंद करावे व त्यावर ओले कापसाचे बोळे ठेवावे. मृत व्यक्तीच्या डोक्याखाली २ उशा ठेवाव्या आणि पंखा बंद ठेवावा तसेच ए.सी. असेल तर सुरु ठेऊ शकता. नेत्रदानासाठी संपर्क: ७३७८६५६१४५, ७३७८६५६१४४.

# डॉ. उपेंद्रजी कोठेकर यांचे साहित्यिक योगदान अत्यंत मोलाचे – प्रविण पोटे

**अमरावती/ का.प्र.**

साहित्य भारती (विदर्भ प्रांत) यांच्या वतीने आयोजित आणि लाखे प्रकाशन प्रकाशित, विदर्भ भाजपा संघटन मंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर यांच्या 'नाठाळाच्या माथी' या चौथ्या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा विदर्भ साहित्य संघ, नागपूर येथे संपन्न झाला.



हा समारंभ साहित्य, समाज व राजकारणातील अनेक दिग्गजांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साहात पार पडला. या समारंभास माजी राज्यमंत्री श्री प्रविण पोटे पाटील प्रामुख्याने उपस्थित होते.

डॉ. उपेंद्रजी कोठेकर आपली पक्षीय जबाबदारी चोखपणे सांभाळत अत्यंत व्यस्ततेथही काव्य लिहतात त्यांचे साहित्यिक योगदान अत्यंत महत्त्वाचे असून त्यांचे साहित्यामधून, कवितासंग्रहातून सामाजिक जाणीव, मानवी भावना आणि ग्रामीण वास्तव यांचे सुरेख दर्शन घडते असे गौरवोद्गार प्रविण पोटे पाटील यांनी यावेळी काढले.

माजी राज्यमंत्री प्रविण पोटे पाटील यांनी डॉ. उपेंद्रजी कोठेकर यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार व सन्मान करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्यात.

या प्रसंगी डॉ. नितीन जी धांडे जिल्हाध्यक्ष, अमरावती शहर भाजप, मा. शिवराय कुलकर्णी प्रदेश प्रवक्ता, भाजप, चेतन पवार माजी उपमहापौर, अमरावती, नितीन गुडदे पाटील माजी सरचिटणीस, अमरावती जिल्हा, सतीश करेसिया माजी सरचिटणीस, अमरावती शहर, डॉ. विलास कविटकर माजी सरचिटणीस, अमरावती जिल्हा, सचिन साधनकर अध्यक्ष, चंद्रपूर जिल्हा कबड्डी असोसिएशन, लखन राज माजी नगरसेवक उपस्थित होते.

# हिंदीची आ'सक्ती', शिक्षणाची निवृत्ती!

**उत्तम शिक्षण द्यायचे असेल तर आधी मुलांच्या हिताचा सखोल विचार केला पाहिजे. गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण हे मोठे आव्हान आहे. त्यासाठी राज्यघटनेच्या चौकटीतली पक्की वैचारिक बैठक आणि त्यानुसार कृती असावी लागते. वैचारिकतेला निरोप देऊन, लोकभावनेचा अनादर करत हिंदीची सक्ती करणे हे पूर्णपणे लोकशाहीविरोधी आहे.**

'राज्य शालेय अभ्यासक्रम आराखड्या' (राशाअआ)च्या मसुद्यातील 'मनुस्मृती'च्या अवांच्छनीय उल्लेखामुळे गेल्या उन्हाळ्यात पडलेली वादाची ठिणगी 'पहिलीपासून हिंदी'मुळे यंदा पावसाळ्यातही वणव्याचे रूप घेते आहे. महाराष्ट्रासारख्या (भूतकालीन?!) बलाढ्य राज्याचा उपमर्द, मराठीसारख्या वैभवशाली, अभिजात भाषेचे खच्चीकरण होण्याच्या भावनेने राज्यात संतापाची लाट उसळली आहे. विधानसभा निवडणुकांआधी 'राशाअआ'मध्ये घुसडण्यात आलेली 'पहिलीपासून हिंदी'ची तरतूद १६ एप्रिल २०२५ च्या शासन निर्णयानुसार 'सक्ती'ची करण्यात आली. सर्वसामान्य जनतेच्या विरोधामुळे हिंदीची 'अनिवार्यता' १७ जूनला काढून टाकल्याचा, इतर भाषांचा पर्याय दिल्याचा दावा सरकारकडून करण्यात येतोय. मात्र "हिंदीतर भाषांसाठी इयत्तानिहाय किमान वीस पटसंख्ये"च्या अटीमुळे पर्यायाच्या आभासाखाली हिंदीची (अघोषित) सक्ती झाल्याचे जनतेचे म्हणणे आहे.

मुळात 'राष्ट्रीय शिक्षण धोरणा'ने (राशिधो) वय ३ ते ८ म्हणजे अंगणवाडी ते दुसरी हे वर्ग पायाभूत स्तरातले मानले आहेत. त्यासाठी राज्याने स्वतंत्र 'राज्य पायाभूत-स्तर अभ्यासक्रम आराखडा' (रापाभूआ) तयार केला. यानुसार इयत्ता पहिली-दुसरीला दोनच भाषा शिकवायच्या आहेत. मराठी माध्यमासाठी मराठी व इंग्रजी या अनुक्रमे प्रथम व द्वितीय भाषा आहेत. या आराखड्याचे काम पूर्ण झाल्यानंतर तिसरीपासूनच्या वर्गांसाठीचा उपरोक्त 'राशाअआ' तयार झाला. लोकांच्या प्रतिसादासाठी दिलेल्या 'मसुद्या'त पहिलीपासून हिंदीची तरतूद नव्हती, त्यामुळे साहजिकच तेव्हा कुणी आक्षेप घेतला नाही. मात्र 'राशाअआ'ला अंतिम स्वरूप देताना त्यात सक्तीची भाषा म्हणून हिंदी घुसडली गेली. कालानुक्रमे नंतर तयार झालेल्या या आराखड्याने आधीच्या म्हणजे 'रापाभूआ'त तिसऱ्या भाषेची तरतूद करण्याचे आदेश दिले. दोन्ही आराखड्यांच्या तज्ज्ञ समित्या भिन्न असल्या तरी 'सुकाणू समिती' एकच, त्यामुळे कुणी औचित्याचा, समित्यांच्या कार्यकक्षेचा मुद्दा उपस्थित केला नसावा. तसंही आजच्या 'मिनिमम गव्हर्न्मेंट'च्या काळात नियमाप्रमाणे, कायद्यानुरूप कामकाज हा शिक्षण विभागाच्या इतिहासाचा भाग होतो आहे.

नवीन शासन निर्णयातील अटीनुसार कर्नाटक सीमेजवळच्या एखाद्या गावात पहिली ते पाचवीला प्रत्येकी १८-१९ विद्यार्थी असतील, आणि त्या सर्वांनी तृतीय भाषा म्हणून कन्नडची मागणी केली, तरी शिक्षक मिळणार नाही. एकूण ९०-९५ असण्याचा उपयोग नाही, इयत्तानिहाय २० विद्यार्थी हवेत! अशा परिस्थितीत पहिलीपासून तिसरी भाषा ऑनलाइन पद्धतीने शिकवली जाईल, असे सांगितले गेले आहे. ऑनलाइन साधनांमुळं बालकांमध्ये पसरलेल्या लक्ष विखंडनाच्या (अटेन्शन फ्रॅगमेंटेशन) समस्येवर संपूर्ण जग उपाय शोधत असताना आपले राज्य हट्टाने बालकांना ऑनलाइनकडे ढकलतंय. 'पहिलीच्या विद्यार्थ्यांना कोणतीही भाषा ऑनलाइन स्वरूपात शिकवता येऊ शकते', अशा पूर्णतः अशैक्षणिक गृहीतकावर आधारित ही तरतूद शिक्षण विभागातल्या शैक्षणिक विचाराचा अभाव दर्शवते.

१७ जूनच्या शासन निर्णयाच्या तातडीच्या अंमलबजावणीसाठी 'राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदे'ने (विद्या परिषद) १८ जूनच्या मध्यरात्री एका आदेशाद्वारे इयत्ता १-२ साठी नमुना वेळापत्रक प्रसिद्ध केलंय. शारीरिक शिक्षणाच्या वेळात ही कपात ४२ टक्के इतकी आहे. दोन सत्रांत भरणाऱ्या म्हणजे मुख्यतः शहरी शाळांसाठी सुट्ट्यांमधली कपात तब्बल ७२ टक्के आहे. शाळेच्या औपचारिक वातावरणात मधल्या सुट्ट्यांचा वेळ बालकांना मुक्त खेळ व अभिव्यक्ती, समवयस्कांसोबतची तणावरहित आंतरक्रिया, मैदानी खेळजन्य शारीरिक हालचाल अशा अनेक विकासपोषक संधी उपलब्ध करून देतो. मुक्त



खेळातला आनंद, विस्मयाचा भाव, जय-पराजयापलीकडचा ध्येय गाठण्याचा प्रयत्न, कल्पनाशक्ती व समस्या निराकरण कौशल्यांचा लागणारा कस, स्वतः नियम रचून ते पाळण्याची लोकशाहीपूरक सवय या सर्व बाबींपेक्षा तिसरी भाषा महत्त्वाची ठरलीय, हे खेदजनक आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान'च्या (AIIMS) अभ्यासानुसार ६-१९ वयोगटातील १३ टक्क्यांहून जास्त विद्यार्थी स्थूल असून ७.५ टक्के विद्यार्थी उच्च रक्तदाबग्रस्त आहेत. २००६ च्या तुलनेत लठ्ठपणात तब्बल २६८ टक्के वाढ दिसतेय. (इंडियन एक्स्प्रेस ३० मे २०२५). सरकारी संस्थांकडूनदेखील असे चिंताजनक आकडे प्रसिद्ध होत असताना खेळाचा, शारीरिक शिक्षणाचा वेळ कमी करणं अनाकलनीय आहे. म्हणूनच पहिलीपासून तिसऱ्या भाषेला विरोध हा केवळ भाषिक अस्मितेचा प्रश्न नसून बालकांच्या आरोग्याचा प्रश्न आहे. स्वयंघोषित 'विश्वगुरू'(!) पदामुळे जगभरातले 'मुक्त खेळ-मुक्त वेळ' कार्यक्रम दुर्लक्षिण्याचा आपला पदसिद्ध अधिकार असला, तरी आपल्या मातीतल्या ताराबाई मोडक, गिजुभाई बधेका, अनुताई वाघ या व अशा अनेकांच्या बालशिक्षणातील कार्यविस्मरणाचे कारण काय? की त्यांचा 'रापाभूआ'तला उल्लेख केवळ शब्दसेवा म्हणून आहे?

तिसऱ्या भाषेची कुऱ्हाड केवळ खेळावर नव्हे तर गणितावरही कोसळलीय. 'रापाभूआ'च्या तुलनेत नव्या वेळापत्रकाने गणित अध्यापनाचा वेळ १२ टक्क्यांनी कमी केलाय. हे वेळापत्रक प्रसिद्ध करणाऱ्या 'विद्या परिषदे'नेच २०२२-२३ मध्ये इयत्ता ३, ५ व ८ साठी केलेल्या 'राज्य संपादणूक सर्वेक्षण'नुसार तिसरी व आठवीची गणितातली सरासरी संपादणूक अनुक्रमे ६८ व ४९ टक्के इतके कमी आहे. याच्या वर्षभरापूर्वी 'एनसीईआरटी'ने केलेल्या याच इयत्तांच्या सर्वेक्षणात गणितात तब्बल ७५ टक्के विद्यार्थी सामान्य ते सामान्यहून कमी पातळीवर होते. औपचारिक गणित शिक्षणाचा अगदी पहिला अनुभवदेखील भविष्यातल्या संपादणुकीवर परिणाम करतो, असं संशोधनांमध्ये दिसत असताना छोट्या वर्गांचा गणित शिक्षणाचा वेळ कमी करायचा की आशयघन गणित अध्ययन अनुभव देण्याचा प्रयत्न करायचा? 'विद्या परिषदे'च्याच उपरोक्त सर्वेक्षणात मराठी प्रथम भाषेची सरासरी संपादणूक तिसरीसाठी ७७ तर पाचवीसाठी ६२ टक्के आहे. पहिलीपासून दोन भाषा असतानाची ही स्थिती आहे.

'एईपी'चा वेळ शाळांना गरजेनुसार लवचीकपणे वापरता येईल. शाळांनी तो सगळा वेळ स्पर्धा परीक्षांसाठी वापरला, तरी आश्चर्य वाटायला नको. स्पर्धा परीक्षांमधून मिळणाऱ्या संभाव्य पदाच्या आशेने आजही हजारो तरुण उमेदीची वर्षे वाया घालवतात. अशा वेळी वीस वर्षांनंतरची स्पर्धा परीक्षांची तयारी आत्तापासून करायची? व्यवस्थात्मक पातळीवरून अस्सल शिक्षण घडवण्यासाठी प्रत्येक बालकाच्या हिताचा सखोल विचार लागतो. गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी राज्यघटनेच्या चौकटीतली पक्की वैचारिक बैठक व त्यानुसार कृती लागते. विचार आणि वैचारिकतेला निरोपाचा नारळ देऊन, लोकभावनेचा अनादर करत घेतलेला हा निर्णय सरकारची हिंदीविषयीची आ'सक्ती' दर्शवतो. मात्र, राज्यकर्त्यांच्या दुराग्रहापायी, तिसऱ्या भाषेच्या अशैक्षणिक मोहापायी २०२५ पासून महाराष्ट्रातून खरे शिक्षणच निवृत्तीपथाला लागले', असे इतिहासात सखेद नमूद केले जाईल. हे टाळण्यासाठी 'राज्य शालेय अभ्यासक्रम आराखडा' व त्यातून निर्मित सारे शासन निर्णय रद्द करून नव्या काळाला सक्षमपणे सामोरे जाण्याची क्षमता देणारा आराखडा विकसित करावा. 'कालसुसंगत शिक्षण कसे असावे' याचा एक समाज म्हणून मूलभूत विचार आपण कधी करणार?

**किशोर दरक**

# करिअर घडवणारे क्षेत्र 'सिव्हिल इंजिनिअरिंग'

सिव्हिल इंजिनिअरिंग हे केवळ एक शैक्षणिक क्षेत्र नसून, हे एक समाज परिवर्तनाचे साधन आहे. जे विद्यार्थी विज्ञान, गणित, आणि सर्जनशीलतेमध्ये रुची ठेवतात, त्यांच्यासाठी सिव्हिल इंजिनिअरिंग हा एक अद्वितीय आणि उज्ज्वल भविष्य देणारा पर्याय आहे.या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना विविध करिअर पर्याय खुले झाले आहेत. मात्र, सिव्हिल इंजिनिअरिंग हे क्षेत्र आजही आपल्या ठोस पाया, नवनवीन संधी आणि समाजनिर्मितीतल्या महत्त्वामुळे विद्यार्थ्यांसाठी एक अद्भुत पर्याय ठरत आहे.



वाहतूक:-वाहतूक ही सिव्हिल अभियांत्रिकीचा एक महत्त्वाचा भाग आहे. सिव्हिल इंजिनीअर्स रस्ते, पूल, रेल्वे, विमानतळ आणि बंदरे यांसारख्या वाहतूक प्रणालींसाठी आवश्यक असलेली पायाभूत रचना तयार करतात आणि उभारतात. यामध्ये मार्गांची आखणी, वाहतूक कोंडीचे निराकरण, वाहन व प्रवाशांच्या हालचालीसाठी मजबूत रचनांची निर्मिती, पर्यावरणीय प्रभावांचा विचार आणि लोक व वस्तूंच्या सुरक्षित व कार्यक्षम हालचालींची हमी यांचा समावेश असतो.सिव्हिल इंजिनीअर्स वाहतूक अभियांत्रिकीच्या तत्त्वांचा वापर करून शहरांमध्ये तसेच देश व खंडांदरम्यान एकात्मिक वाहतूक नेटवर्क तयार करतात. आधुनिक समाजाच्या वाहतूक गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांचे कार्य अत्यंत महत्त्वाचे असते.

इमारती व बांधकाम:-सिव्हिल इंजिनीअर्स इमारतींच्या बांधकामाच्या सर्व टप्प्यांमध्ये नियोजन, डिझाइनपासून प्रत्यक्ष बांधकामापर्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात.ते पाया आणि बीम, कॉलम्स, स्लॅब्स यांसारख्या संरचनात्मक घटकांचे डिझाइन करतात, ज्यावर इमारत उभारली जाते. ते बांधकामाची गुणवत्ता, वापरलेली सामग्री व प्रगती यावर देखरेख ठेवतात आणि प्रकल्प वेळेत व अंदाजित खर्चात पूर्ण होईल याची खात्री करतात. घर, कार्यालय, शाळा, कारखाने आणि इतर इमारतींच्या बांधकामामुळे सिव्हिल इंजिनीअर्ससाठी स्थिर करिअर संधी निर्माण होतात.

जलसंपदा:-सिव्हिल इंजिनीअर्स जलसंपत्ती व्यवस्थापनात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. ते पाणीपुरवठा प्रणाली, ड्रेनेज प्रणाली, सिंचन प्रकल्प, धरणे, बंधारे आणि कालवे यांच्या नियोजन व डिझाइनमध्ये सहभागी असतात. ते पाण्याच्या शुद्धीकरण, खाऱ्या पाण्याचे गोडीकरण, पूर नियंत्रण व नदी मार्गदर्शन यासारख्या प्रकल्पांवरही काम करतात. गोड्या पाण्याचा तुटवडा वाढत चालल्याने, सिव्हिल इंजिनीअर्स जलवितरण, पाणी साठवण, आणि पूर नियंत्रण यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

ऊर्जा:-सतत वाढणाऱ्या ऊर्जेच्या मागणीला पर्यावरणपूरक उत्तर देण्यासाठी सिव्हिल इंजिनीअर्स पुनरावृत्तीकरण ऊर्जा प्रकल्पांच्या डिझाइन आणि बांधकामामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामध्ये जलविद्युत प्रकल्प, सौरऊर्जा केंद्रे, वाऱ्याच्या उर्जेची केंद्रे आणि इतर प्रकल्पांचा समावेश होतो. ते उर्जा स्रोतांचा सुरक्षित व कार्यक्षम उपयोग करून उर्जा निर्मिती करतात तसेच जुनी उर्जा पायाभूत सुविधा सुधारून, वीज वाहतूकमध्ये होणारे नुकसान कमी करतात. अशा पद्धतीने ते ऊर्जा सुरक्षेत आणि हवामान बदलासारख्या समस्यांवर मात करण्यात मदत करतात.

पर्यावरण अभियांत्रिकी:-पर्यावरण अभियांत्रिकी ही सिव्हिल अभियांत्रिकीची एक शाखा असून ती पर्यावरणासंबंधी समस्या सोडवण्यासाठी उपाययोजना राबवते. यात पाणी व हवा प्रदूषण नियंत्रण, घनकचरा व्यवस्थापन, पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन व शाश्वत विकास यांचा समावेश होतो. हे अभियंते विज्ञान व अभियांत्रिकीचे तत्त्वज्ञान वापरून पुनर्वापर, कचरा निपटारा, सार्वजनिक आरोग्य आणि हवा-पाण्याची गुणवत्ता सुधारण्याचे काम करतात. त्यांच्या कामामुळे विकास व पर्यावरण यामधील समतोल राखला जातो.

नगरपालिका अभियांत्रिकी:-नगरपालिका अभियांत्रिकी म्हणजे शहरी पायाभूत सुविधा व नागरी सेवांचे नियोजन, विकास व देखभाल. यात पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था, ड्रेनेज, कचरा व्यवस्थापन, वाहतूक व्यवस्था यांचा समावेश होतो. हे अभियंते शहरांच्या मास्टर प्लॅन तयार करण्यास मदत करतात. ते शहरी भागात चांगली नागरी सुविधा, आरोग्य सेवा, वाहतूक व्यवस्था आणि स्वच्छता सुनिश्चित करतात. त्यामुळे नागरिकांचा जीवनमान सुधारतो.

पर्यावरणपूरक दृष्टिकोन-सिव्हिल इंजिनिअरिंग आज केवळ विकासापुरती मर्यादित नाही. पर्यावरण संरक्षण, जलव्यवस्थापन, अपशिष्ट व्यवस्थापन आणि ऊर्जा कार्यक्षमतेसारख्या बाबींमध्येही या क्षेत्राचा मोठा वाटा आहे.नवीन शिक्षण धोरणात सिव्हिल इंजिनिअरिंगमधील संधी.नवीन धोरणामुळे विद्यार्थ्यांना सिव्हिल इंजिनिअरिंगसोबत पर्यावरण विज्ञान, आर्किटेक्चर, व्यवस्थापन, कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सायन्स अशा विषयांचीही जोड घेता येते. यामुळे सस्टेनेबल कन्स्ट्रक्शन, स्मार्ट सिटी, ग्रीन बिल्डिंग टेक्नोलॉजी यांसारख्या नव्या क्षेत्रात करिअर संधी उपलब्ध होतात.

कौशल्याधारित शिक्षण व इंटर्नशिप:-प्रॅक्टिकल शिक्षण, इंटर्नशिप आणि ॲप्रेंटिसशिप वर भर दिला जातो. त्यामुळे विद्यार्थी बांधकाम प्रकल्प, सार्वजनिक पायाभूत प्रकल्प, आणि नियोजन संस्थांमध्ये प्रत्यक्ष अनुभव घेऊ शकतात. हे तयार अभियंते सरकारी खात्यांमध्ये, स्मार्ट सिटी प्रकल्पांमध्ये व खाजगी क्षेत्रात सहज नोकरी मिळवू शकतात.

लवचिक अभ्यासक्रम:-विद्यार्थ्यांना आता ओपन इलेक्ट्रिव्ह, साइड स्पेशलायझेशन (उदा. प्रोजेक्ट मॅनेजमेंट, पर्यावरण अभियांत्रिकी) निवडता येतो. त्याचप्रमाणे मल्टीपल एंट्री आणि एक्झिट पर्यायांमुळे, ३ वर्षांचा B.Sc. in Civil Technology पूर्ण करून नंतर B.Tech efkeâbkee M.Tech मध्ये प्रवेश घेता येतो.

नव्या क्षेत्रांवर भर:- अंतर्गत अनेक महाविद्यालये पुढील नवीन क्षेत्रांमध्ये अभ्यासक्रम सुरू करत आहेत. स्मार्ट इन्फ्रास्ट्रक्चर, जिओस्पेशियल टेक्नोलॉजी, शाश्वत शहरी नियोजन, आपत्ती-प्रतिरोधक संरचना, ग्रीन आणि नेट-झीरो इमारती

उद्योजकता व स्टार्टअप्स:-अंतर्गत इनोव्हेशन व इन्क्युबेशन सेंटर्स ची स्थापना केली जात आहे. सिव्हिल इंजिनिअरिंगचे विद्यार्थी स्वस्त घरबांधणी, जैविक बांधकाम साहित्य, ग्रामीण पायाभूत सुविधा, जल व्यवस्थापन अशा विषयांवर स्टार्टअप सुरू करू शकतात.

जागतिक संधी व ऑनलाइन शिक्षण:-नुसार जागतिक इंटर्नशिप, क्रेडिट ट्रान्सफर आणि ऑनलाइन अभ्यासक्रम हे शक्य झाले आहेत. विद्यार्थी AutoCAD, STAAD Pro, BIM, GIS यासारखी सॉफ्टवेअर्स आणि नवीन तंत्रज्ञान जागतिक पातळीवरून शिकू शकतात.

७. संशोधन व नवकल्पनांना चालना:-भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनवण्याचे उद्दिष्ट ठेवते.

सिव्हिल इंजिनिअरिंगचे विद्यार्थी वाहतूक प्रणाली, नूतनीकरणीय ऊर्जा प्रकल्प, जल व्यवस्थापन, शाश्वत शहरी विकास यावर संशोधन करू शकतात.महाविद्यालये आणि संस्थांमध्ये आता इंटर्नशिप, ऑन-फील्ड प्रोजेक्ट्स आणि स्मार्ट टेक्नॉलॉजीवर आधारित शिक्षणदिले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव आणि कौशल्यविकासाची संधीही मिळते.

**प्रा.अक्षय सुधाकरराव काळमेघ,**
स्थापत्य अभियंता
श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालीत
अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय,
बाभुळगाव, अकोला
मो नं.९५६३३३३६३६

# कुंभमेळ्याचे नवे स्टेटस! येणार 'रील'वाली गर्दी

३१ ऑक्टोबर २०२६. म्हणजे जेमतेम वर्षभराने नाशिक कुंभमेळ्याचे ध्वजारोहण होईल! आणि सुरू होईल नाशकातला सिंहस्थ! अन्यत्र कुंभमेळाच म्हणत असले तरी नाशकात असतो तो सिंहस्थच. तर असा हा दर १२ वर्षांनी नाशकात भरणारा कुंभमेळा. मात्र कुंभमेळा फक्त सांधूचाच असतो का? तर नाही. साधू समाजासह तो संसारी समाजाचा म्हणजे साधू नसलेल्या माणसांचाही असतो. साधू समाजाचे लाडकोड खूप होतात.

प्रशासन त्यांचा एकेक शब्द तळहातावर झेलतो हे सारे काही नवीन नाही. भारतभर भरणाऱ्या प्रत्येक कुंभात आणि अर्धकुंभात हे सारे मानापमान, रुसवेफुगवे, शाहीसोहळे नेमाने पार पडतात. शाही पर्वण्यांच्या दिवशी साधूंच्या मिरवणुका निघतात आणि त्यांचा पारंपरिक मान आणि ताम्रपटानुसार स्नानाचे क्रम ठरतात.

त्या गर्दीत काही 'फक्कडभाई' साधू असतात. म्हणजे केवळ भगवी कफनी घालून निवांत पोट भरायला गर्दी करणारे, ते ना कुठल्या आखाड्याचे असतात ना कोणत्या खालसाचे असतात. ते केवळ जेवणापुरते एक जागा पकडून राहतात. काही असतात हठयोगी साधू. जे आपल्या चमत्कारिक कृतींनी माध्यमांसह गर्दीचे लक्ष वेधून घेतात. त्यांचे फोटो छापून येतात ती कात्रणं गोळा करुन ते पुढच्या कुंभाच्या वाटेनं जातात. लोकेशणा-अर्थात त्या कौतुकाचे अप्रूप कितीही हठ केले तरी मनाची मोहवाट सुटत नाहीच.

बारा वर्षांनी येणाऱ्या कुंभात 'गंगा न्हायचे' पुण्य पदरात पाडून घेण्यासाठी माणसे लांबलांबून येतात. नाशिकच्या सिंहस्थात तर उत्तरेतली गर्दी असते तशी दक्षिणेतलीही. काही खालसांतून अत्यंत गोरगरीब माणसे लांब लांबून आलेली असतात.



गावखेड्यातली माणसे विविध खालसांच्या टेम्पोतून, बसमधून कुंभात येतात. खालसा म्हणजे साधूंच्या आखाड्यांशी संबंधित विविध ठिकाणच्या शाखा. त्याच खालसांच्या अन्नछत्रात पंगती धरून गरीब माणसे जेवतात आणि जागा मिळेल तिथे पथारी लावतात. या गर्दीला म्हणतात 'खालसावाली भीड'! त्या गर्दीला चेहरा नसतो, ना तिथे कुणी कुणाला जातपात विचारतो. मात्र, नुकत्याच झालेल्या प्रयागराज येथील कुंभमेळ्याचे चित्र पाहता, नाशकात होणाऱ्या कुंभमेळ्याचे हे पारंपरिक रूप येत्या सिंहस्थात बदलणार हे उघड आहे.

कुंभमेळ्याचा 'फोमो' होणारी नवी रिलवाली -मोबाइलस्नेही गर्दी आगामी सिंहस्थात नक्की दिसेल! या गर्दीचा आर्थिक स्तर वेगळा असेल आणि त्यामुळे त्यांच्यासाठीच्या विकत-मोफत सुविधाही वेगळ्याच असतील. या गर्दीचे नियोजन हा येत्या कुंभातला सगळ्यात अवघड प्रश्न आहे.

**मेघना ढोके**

# अजरामर लोक गायक प्रल्हाद शिंदे

आज २३ जून, आपल्या मधुर आवाजाने रसिकांच्या हृदयात स्थान मिळवणारे अजरामर लोक गायक प्रल्हाद शिंदे यांचा स्मृतिदिन. प्रल्हाद शिंदे यांना भक्ती गीतांचा बादशहा म्हंटले जाते कारण त्यांनी गायलेली सर्व भक्तिगीते लोकप्रिय झाली. केवळ भक्तिगीते नाही तर भावगीते, कव्वाली आणि कोळी गीतांवर देखील ठसा उलटवला. सर्व प्रकारची लोक गीते गाण्याचा आणि ती लोकगीते लोकप्रिय करण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. प्रल्हाद शिंदे यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली.

महाराष्ट्रात कोणताही सण उत्सव असो त्यांनी गायलेली गाणी वाजवल्या शिवाय तो सण उत्सव पूर्ण होतच नाही. मग तो गणपती उत्सव असो की नवरात्र उत्सव, आषाढी एकादशी असो की सत्यनारायणाची महापूजा, आंबेडकर जयंती असो की बुद्ध पौर्णिमा इतकेच काही गावातील संदल उरूस देखील त्यांच्या कव्वाली शिवाय पूर्ण होत नाही कारण त्यांनी गायलेली ऐका सत्य नारायणाची कथा, चल ग सखे पंढरीला, बाप्पा मोरया रे, उड जायेगा एक दीन पंछी रहेगा पिंजरा खाली.... अशी गायलेली शेकडो गाणी आजही लोकप्रिय आहे. ही गाणी अजरामर आहेत. ही गाणी ऐकली नाहीत असा एकही माणूस महाराष्ट्रात शोधूनही सापडणार नाही. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांनाच ही गाणी तोंडपाठ आहेत. प्रल्हाद शिंदे यांचा आवाज मुंबईत लोकप्रिय होऊ लागला. त्यांची गाणी जशी लोकप्रिय होऊ लागली तशी त्यांच्या आवाजाची जादू महाराष्ट्रभर पसरू लागली. गावागावातून त्यांना गाणी गाण्यासाठी बोलावणे येऊ लागले. नवरात्र उत्सव, आंबेडकर जयंती, गावातील यात्रा, जत्रा, बुद्ध पौर्णिमा, संदल - उरूस अशा कार्यक्रमात त्यांना बोलावणे येऊ लागले. त्यांची गाणी ऐकण्यासाठी लोक लांबून लांबून येऊ लागली. पाहता पाहता त्यांचा आवाज महाराष्ट्रभर पसरला.



महाराष्ट्रातील ते सर्वाधिक मागणी असलेले गायक बनले. प्रल्हाद शिंदे आपल्या गाण्याच्या कार्यक्रमाचा शेवट नेहमी एका आगळ्या वेगळ्या गीताने करीत. त्यांनी सर्व प्रकारची गाणी गायली.

प्रल्हाद शिंदे यांनी गायनाचा धंदा केला नाही म्हणून त्यांना कधीही आर्थिक स्थैर्य मिळाले नाही पण त्यांच्या गाण्यांमुळे कॅसेट कंपन्या मात्र गब्बर झाल्या.

२३ जून २००३ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या गाण्याची परंपरा पुढे आनंद शिंदे, मिलिंद शिंदे, चंद्रकांत शिंदे या मुलांनी जपली तीच परंपरा त्यांची नातवंडं देखील जपत आहे. आज शिंदे घराणे हे संगीत क्षेत्रातले ब्रॅंड बनले आहे याचे सर्व श्रेय प्रल्हाद शिंदे यांना जाते. मधुर गळ्याचे अजरामर लोक गायक प्रल्हाद शिंदे यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# भीमशक्तीच्या संघर्षाला यश : अकोल्यातील 'सामाजिक न्याय भवन'ला लागला नामफलक, लवकरच होणार लोकार्पण

■ प्रतिनिधी | अकोला ■

**सामाजिक न्यायासाठी सुरू असलेल्या दीर्घ संघर्षाला अखेर यश मिळाले असून तत्कालीन सामाजिक न्यायमंत्री खा. चंद्रकांत हंडोरे यांच्या ऐतिहासिक क्रांतिकारी शासन निर्णयातून अकोला जिल्ह्यातील बहुप्रतीक्षित 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन' या इमारतीवर अधिकृत सरकारी नामफलक लावण्यात आला आहे. अनुसूचित जाती मागासवर्गीय, व इतर वंचित घटकांसाठी ही एक ऐतिहासिक आणि प्रेरणादायी घटना मानली जात आहे.**



या यशामागे भीमशक्ती संघटनेचा सातत्यपूर्ण लढा, कार्यकर्त्यांचा निर्धार आणि नेतृत्वाची स्पष्ट दिशा कार्यरत होती. विदर्भ प्रदेशाध्यक्ष पंकज मेश्राम व अकोला जिल्हाध्यक्ष भूषण गायकवाड यांनी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला. आंदोलनं, निवेदने, जनजागृती मोहीम यांद्वारे या भवनाचे प्रत्यक्ष अस्तित्व शक्य झाले.या सर्वांनी प्रशासनाशी संवाद, जनजागृती, आणि सशक्त मागणी यांद्वारे या लढ्याला यशस्वी बनवले.

**सामाजिक न्याय भवनाचे महत्त्व :** ही इमारत समाजकल्याण विभागाच्या विविध योजनांचे प्रमुख केंद्र ठरणार असून, वंचित घटकांना शासकीय योजनांचा लाभ एकाच छताखाली मिळणार असून मागासवर्गीयासाठी संघर्ष, प्रेरणा आणि मार्गदर्शनाचे प्रतीक ठरेल.

**लवकरच लोकार्पण :** नामफलक लावण्यात आल्यानंतर आता या इमारतीच्या औपचारिक लोकार्पणाची तयारी सुरू झाली आहे. मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सूत्रांकडून समजते.

**भीमशक्तीचा निर्धार :** या यशस्वी पाठपुराव्या बाबत प्रतिक्रिया देताना जिल्हाध्यक्ष भूषण गायकवाड म्हणाले,

'हे फक्त पहिले पाऊल आहे. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी, हक्कांसाठी आणि सामाजिक समतेसाठी आमचा लढा आणखी जोमाने सुरू राहील.'

**या यशामध्ये विशेष योगदान :** या ऐतिहासिक कार्यात पुढील पदाधिकाऱ्यांचे विशेष योगदान लाभले आहे:

शैलेश लंकेश्वर – विदर्भ प्रदेश उपाध्यक्ष, सचिन शेजव – दिव्यांग विभाग अध्यक्ष, अंकूश गावंडे – युवा आघाडी अध्यक्ष, सचिन तिडके – युवा आघाडी शहराध्यक्ष सुशिल गायकवाड, सुशिल कांबळे, आकाश हिवराळे, अभिजीत गायकवाड, दिनेश खोब्रागडे, गौतम उमाळे, मिलींद गवई, राहुल अंभोरे यांच्यासह भीमशक्ती संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते


# वृक्ष संगोपनाच्या नावावर लाखोंची लूट!

**पातूर तालुक्यातील ग्रामीण भागात बनावट कामांचे प्रकार उघड**

■ प्रतिनिधी | पातूर ■

तालुक्यातील ग्रामीण भागात रोजगार हमी योजनेअंतर्गत वृक्ष लागवड व संगोपनाच्या नावाखाली लाखो रुपयांची उधळपट्टी सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सस्ती ते दिग्रस आणि सस्ती-जांबरून रस्त्यालगत वृक्ष लागवडीच्या नावावर कागदोपत्री काम दाखवले असले तरी प्रत्यक्षात वृक्षांचा काहीही थांगपत्ता नाही.

या गंभीर प्रकाराची तक्रार शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष दिलीप परनाटे यांनी दिनांक ९ जून रोजी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पातूर तहसीलदार व गटविकास अधिकाऱ्यांकडे केली आहे. त्यांनी आपल्या निवेदनात स्पष्ट आरोप केला आहे की, रोजगार हमी योजनेच्या



माध्यमातून कामे थेट रोजगार मजुरांऐवजी कंत्राटी पद्धतीने दिली जात आहेत आणि संबंधित अधिकारी व कंत्राटदारांच्या संगनमतातून ही आर्थिक लूट सुरू आहे.

परनाटे यांनी तक्रारीत नमूद केले की, शेकडो झाडांची लागवड केल्याचा बनाव करून लाखो रुपयांचे बिल काढण्यात आले असून शासनाच्या डोळ्यात धूळ फेकण्याचा हा प्रकार आहे. झाडे कुठेच दिसत नसतानाही संगोपनाच्या नावाखाली मजुरांची

> पातूर तालुक्यातील सस्तीसह इतर गावांमध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत वृक्ष संगोपनाच्या नावावर लाखोंची लूट सुरू आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासन गप्प आहे. जर चौकशी व कारवाई झाली नाही, तर रोहयो मंत्र्याकडे थेट तक्रार दाखल करू.
>
> **दिलीप परनाटे,**
> जिल्हाध्यक्ष, शिवसंग्राम

कागदोपत्री उपस्थिती दर्शवून निधी हडपला जात आहे.

त्यामुळे या प्रकरणात उच्चस्तरीय समिती गठित करून प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात यावी, तसेच दोषी ठरलेल्या कंत्राटदार व अभियंत्यांवर कठोर कारवाई करावी व शासनाचे नुकसान भरून काढावे, अशी जोरदार मागणी त्यांनी केली आहे.

# मराठा सेवा संघाकडून निट परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या रसिका अंधारेचा सत्कार



■ प्रतिनिधी | अकोला ■

अखिल भारतीय मराठा सेवा संघाच्या वतीने नुकत्याच झालेल्या निट परीक्षेत ५२६ गुण मिळवून गुणवत्ता यादीत स्थान मिळवलेल्या रसिका गणेश अंधारे हिचा सत्कार करण्यात आला.

रसिका अंधारे ही अकोला पंचायत समितीचे माजी उपसभापती गणेश अंधारे यांची कन्या आहे. सदरहू सत्कार सोहळा अखिल भारतीय मराठा सेवा संघाचे विदर्भ सचिव प्रा. विनायक धोरण, अकोला पंचायत समितीचे विस्तार अधिकारी डॉ. उल्हास मोकळकर, आणि महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष प्रमोद मुरुमकार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. याप्रसंगी बोलताना मान्यवरांनी रसिका अंधारे हिने केलेल्या कठोर परिश्रमाचे आणि त्यामुळे तिने मिळवलेल्या घवघवीत यशाचे कौतुक केले. त्यांनी रसिकाला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# अकोला गार्डन क्लबची झाडांच्या संगोपन व संवर्धन मोहीम

■ प्रतिनिधी | अकोला ■

दरवर्षी पावसाळ्यात विविध संस्था व व्यक्ती वृक्षारोपण मोहीम राबवितात. मात्र नंतर या झाडांची निगा राखली जात नाही. हीच बाब लक्षात घेऊन अकोला गार्डन क्लबने यावर्षीपासून झाडांचे संगोपन आणि संवर्धन करण्याची अभिनव मोहीम हाती घेतली आहे.

गार्डन क्लबचे नवनिर्वाचित अध्यक्ष संजय शर्मा यांच्या नेतृत्वात ही मोहीम मागील दोन आठवड्यांपासून सातत्याने राबविण्यात येत आहे. दर रविवारी क्लबचे सदस्य स्वतः पुढाकार घेऊन अकोल्यातील विविध भागांतील झाडांची देखभाल करत आहेत. याच उपक्रमांतर्गत या रविवारी अशोक वाटिका चौक ते तुकाराम हॉस्पिटल चौक या परिसरात झाडांचे फांद्या कापणे, खत देणे, झाडांना आधार देणे, फवारणी करणे अशा प्रकारच्या देखभालीचे काम करण्यात आले. सुमारे ३०० हून अधिक झाडांची विशेष काळजी घेण्यात आली.



या मोहिमेबाबत बोलताना क्लबचे माजी अध्यक्ष अजय सेंगर म्हणाले, 'झाडांची योग्य निगा राखली गेल्यास ती दीर्घकाळ टिकतात आणि आपल्याला ऑक्सिजन देतात. वाढते तापमान आणि पर्यावरणीय बदल लक्षात घेता अशी चळवळ अत्यंत गरजेची आहे.'

यात सामाजिक कार्यकर्ते निशिकांत बडगे व वृक्षप्रेमी शरद कोकाटे यांचा विशेष पुढाकार असून त्यांच्याच मार्गदर्शनात ही

**अकोल्यात प्रथमच वृक्ष संगोपनाची राबविण्यात येत आहे दीर्घकालीन चळवळ**

संपूर्ण मोहीम राबविली जात आहे. या वेळी क्लबचे सचिव श्याम गोटफोडे, जयप्रकाश पाटील, कोकिळ पाटील, विजय ढवळे, अनुराधा ढवळे, दिनेश पारेख, सौरभ पोफळी, संतोष अग्रवाल, नरेश अग्रवाल, गजानन मालोकार, संजय हेडा, आलोक खंडेलवाल, ब्रिजमोहन चितलांगे, डॉ. चौखंडे, वैशाली पाटील, इंद्राणी देशमुख, भूषण ताजने, नीरज आवंडेकर हे सर्व सदस्य सक्रियपणे सहभागी झाले होते.

विशेष म्हणजे या उपक्रमाला खदान पोलीस स्टेशनचे ठाणेदार मनोज केदारे यांचीही उपस्थिती लाभली.शहरात पहिल्यांदाच सुरू झालेली झाडांचे संगोपन आणि संवर्धन मोहिम नागरिकांतून भरभरून दाद मिळवत आहे. वृक्षारोपण केल्यानंतर झाड वाढवणे आणि त्यांचे रक्षण करणे ही खरी जबाबदारी आहे, हे अकोला गार्डन क्लबने कृतीतून दाखवून दिले आहे.

# आधुनिक इमॅजिंग टेक्नीक्समुळे अचूक निदान शक्य: तज्ञ

■ प्रतिनिधी | अकोला ■

आधुनिक युगाच्या गतीमान वास्तवात, अपघात आणि अनपेक्षित वैद्यकिय घटना क्षणार्धात घडू शकतात. यामध्ये सर्वात गंभीर म्हणजे पाठीच्या कण्याची आपत्कालीन स्थिती, परिस्थिती, ज्यात अत्याधिक विनाशकारी परिणामाला आळा घालण्यासाठी त्वरित वैद्यकिय मदतीची गरज असते. पाठीच्या कण्याची आपत्कालीन स्थितीमध्ये कार अपघात किवा पडल्याने झालेल्या दुखापतीपासून ते पाठीच्या कण्यातील संसर्ग किंवा ट्युमरसारख्या गैर-आघातजन्य घटनांपर्यंत विविध स्थितींचा समावेश होतो. या विविध परिस्थितींना एकत्र करणारी गोष्ट म्हणजे पॅरालीसीससह गंभीर न्यूरोलॉजिकल हानि होण्याची शक्यता असते.'स्थितीजन्य पाठीच्या कण्याच्या दुखापतीशी सामना करताना प्रत्येक सेकंद महत्वाचा असतो' असे स्पाइन सर्जरी विभागाचे संचालक डॉ. मोहम्मद फैजान यांनी सांगितले. 'दीर्घकालीन अपंगत्व कमी करण्यासाठी जलद निदान व हस्तक्षेप अत्यंत महत्वाचा आहे'.अपघातानंतर तीव्र पाठीत किंवा मानेत वेदना होणे,सुत्रपणा, मुंग्या येणे, किंवा हात किंवा पायांमध्ये अशक्तपणा येणे, आतडयावरील किंवा मुलाशयावरील नियंत्रण गमावणे. चालण्यात किंवा संतुलन ठेवण्यात अडचण येणे ही सर्व चेतावणी लक्षणे आहेतवैद्यकिय तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे पाठीच्या कण्यातील आपत्कालीन स्थिती असलेल्या रुग्णाकरिता परिणामांमध्ये लक्षणीय सुधारणा झालेली आहे.

# आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक दिनानिमित्त जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धा उत्साहात



■ प्रतिनिधी | अकोला ■

आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक दिनाचे औचित्य साधून मास्टर पावर स्विमिंग क्लबतर्फे जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हाधिकारी अजीत कुंभार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हाधिकारी अजीत कुंभार यांनी स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवलेल्या स्पर्धकांना सुवर्णपदक व प्रमाणपत्र देऊन गौरवले. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी सतीश चंद्र भट, पो.नि. शिरीष खंडारे, प्रताप पाटील आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांचे स्वागत मास्टर पावर स्विमिंग क्लबचे प्रमुख योगेश पाटील, प्रशिक्षक दीपक सदाशिव, चंचल महाजन, ज्योती पनपालिया, विशाल पोहेकर व प्रमोद खंडारे यांनी केले. सूत्रसंचालन दीपक वैष्णव यांनी केले.

१४ वर्षांखालील मुले – २५ मीटर फ्रीस्टाइल या गटात प्रथम क्रमांक अनुज पणपालिया, द्वितीय क्रमांक अहमद रहमान खान, तृतीय क्रमांक मानव वंजारे, ५० मीटर फ्रीस्टाइल – खुला गट प्रथम क्रमांक रुद्र पवार, द्वितीय क्रमांक सुनील बुंदेले, तृतीय क्रमांक प्रेम मोहोळ, १४ वर्षांखालील मुले – ५० मीटर फ्रीस्टाइल मध्ये प्रथम क्रमांक गोंड तवर, द्वितीय क्रमांक आयुष शिरसाट, तृतीय क्रमांक अवधूत राजूरकर, १४ वर्षांखालील मुली – २५ मीटर फ्रीस्टाइल मध्ये प्रथम क्रमांक तन्वी मोगरे, द्वितीय क्रमांक दीप्ती रावलकर, तृतीय क्रमांक लावण्या कटारे, २१ वर्षांखालील मुली – २५ मीटर फ्रीस्टाइल प्रथम क्रमांक प्रिसी अग्रवाल, द्वितीय क्रमांक गीता शिंदे, तृतीय क्रमांक मनीषा वंजारे, खुला गट – महिला – २५ मीटर फ्रीस्टाइल प्रथम क्रमांक ममता लवाडे, द्वितीय क्रमांक पूजा अग्रवाल,

२१ वर्षांखालील मुली – ५० मीटर फ्रीस्टाइल मध्ये प्रथम क्रमांक धनिका इंगळे, द्वितीय क्रमांक प्रेरणा वानखडे, खुला गट – मुले – २५ मीटर फ्रीस्टाइल प्रथम क्रमांक शैलेश पोहरे, द्वितीय क्रमांक जितेंद्र गांधी,

४१ वर्षांखालील पुरुष – २५ मीटर फ्रीस्टाइल मध्ये प्रथम क्रमांक आकाश बगाडे, द्वितीय क्रमांक शहाबाज खान यांना विजेतेपद मिळाले.

या यशस्वी स्पर्धेच्या आयोजनासाठी क्लबचे संचालक योगेश पाटील, गोपाल पाटील, प्रशिक्षक दीपक सदाशिव, विशाल पोहेकर, प्रमोद खंडारे, सुशील कांबळे, कौसर भाई, निशान वानखडे, ज्योती पनपालिया, चंचल महाजन, दिनेश वाघ, विनय तायडे, संतोष जगताप, सतीश पानझाडे, संदीप मेहरे, प्रथमेश डोईफोडे, विकी पवार, हर्ष कांबळे, अभी ताले, मनिषा वंजारी, कविता जावरकर, सैयद नूर, कैलास शिंदे आणि इतर सहकर्मचाऱ्यांचे मोलाचे योगदान लाभले.



# चिकाटी ठेवा, यश तुमचे होईल- उद्योगपती अशोक जैन

■ प्रतिनिधी | अकोला ■

चिकाटी, सराव आणि सातत्यामुळेच यश मिळते. त्यामुळे फक्त यशाची वाट न पाहता सातत्याने प्रयत्न करत रहा असे प्रेरणादायी उदगार जैन इरिगेशन सिस्टीम लिमी जळगावचे अध्यक्ष, उद्योगपती अशोक जैन यांनी काढले.इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या वतीने रविवारी जिल्हा महानगर बुद्धिबळ संघटनेतर्फे आयोजित मार्गदर्शन व बक्षीस वितरण सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.ते म्हणाले,खेळ म्हणजे केवळ टाइमपास नसून जीवनातील शिस्त,एकाग्रता आणि निर्णय क्षमता शिकवणारी शाळा आहे. जैन इरिगेशनमार्फत आम्ही नेहमीच बुद्धिबळ, कॅरम आणि विविध क्रीडा प्रकारांना प्रोत्साहन देत आलो आहोत असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात अशोक जैन यांच्या हस्ते विविध वयोगटांतील विजेत्या बुद्धिबळपटूंना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. विजयी खेळाडूंनी यावेळी आपल्या यशामागील मेहनतीचा आणि प्रशिक्षकांचा उल्लेख करत कृतज्ञता व्यक्त केली.या वेळी रेडक्रॉस सोसायटीचे चेअरमन डॉ. किशोर मालोकार,ॲड. महेंद्र साहू,संदीप पुंडकर, अमर गौड आदी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# संकल्प ढोल पथकचा संकल्प सोहळा संपन्न

■ प्रतिनिधी | अकोला ■

गेल्या अनेक वर्षापासून महानगरात विविध उत्सव,कार्यक्रमात युवकांचे ढोल पथक सादर करून मानधनाच्या रूपात मिळणाऱ्या निधीद्वारे वेगवेगळे सेवाभावी कार्य करणाऱ्या सेवाभावी 'संकल्प ढोल पथक'चा संकल्प सोहळा व स्नेहसंमेलन माहेश्वरी भवनात मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी अजित कुंभार, दायित्व फाउंडेशनचे योगेश मारवाडी, रोट्रॅक्ट मोक्षधामचे सुधीर रांदड,संकल्पचे मार्गदर्शक राम राठी,प्रथमेश गोखले आदी उपस्थित होते.या सोहळ्यात जिल्हाधिकारी कुंभार यांच्या हस्ते गतवर्षी दायित्व फाउंडेशनच्या आर्थिक सहकार्य साठी संकल्पने केलेल्या संकल्पची पूर्ती म्हणून फाउंडेशनचे कार्यकारी योगेश मारवाडी यांना २ लाख ५१ हजार रुपयांचा निधी बहाल करून त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी यांनी आपल्या



मार्गदर्शन परभाषणात संकल्प प्रतिष्ठान करीत असणाऱ्या सेवा कार्याचे कौतुक करीत संकल्प ढोल पथकाच्या माध्यमातून महानगरात नवे सांस्कृतिक चळवळ उभी राहत असल्याचे सांगून युवकांनी हा सांस्कृतिक वारसा पुढे न्यावा असे सांगून संकल्पच्या सेवाभावी उपक्रमास आपल्या शुभेच्छा बहाल केल्यात.योगेश मारवाडी यांनी या बद्दल संकल्पचे आभार व्यक्त करीत दायित्व फाउंडेशन हे समाजातील वंचित घटकांच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले.

दायित्व फाउंडेशन निराधार, अनाथ, अपंग आणि उपेक्षित नागरिकांसाठी अन्नदान, वैद्यकीय सहायता, निवारा आदी कार्य करीत असून प्रतिष्ठानच्या 'रोज एक रुपया वर्षभर मदतीचा हात' ही संकल्पना राबवित असून समाजातील सामान्य माणसाला पण आता मदत करणे शक्य झाले असून ही एक चळवळ झाली असल्याचे सांगितले.यावेळी संकल्पचे मार्गदर्शन राम राठी यांनी प्रास्ताविक करीत संकल्प प्रतिष्ठानच्या नव्या संकल्पची माहिती दिली. यावर्षी महानगरात विद्युत अथवा गॅस शववाहिनी स्थापन करण्यात येत असून यामुळे गरजू कुटुंबांना मदतीचा हात व पर्यावरण संतुलित राहणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमात रोट्रॅक्ट मोक्षधामचे सुधीर रांदड यांनी ही आपले मनोगत व्यक्त करीत विद्युत शवदाहिनीची तांत्रिक माहिती दिली.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक २०८
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# संतोष आडे 'जिजाऊ गौरव पुरस्काराने' सन्मानित

**अकोला :** येथील संतोष आडे यांचे सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक तथा कलावंतांना उत्तम मार्गदर्शन करून त्यांच्या अडी अडचणी दूर करीत असल्याने कलावंतांची आस्थेने विचारपूस करून त्यांचे सकारात्मक कार्याची दखल घेवून मदतीचा हात पुढे करत असल्याने पंजाबराव वर यांचे उपस्थितीत 'जिजाऊ गौरव पुरस्कार', मानपत्र, मोमेंटो, देऊन गौरवण्यात आले.

# महानगरातुन निघाली संत तुकाराम महाराज पालखी व चरण सेवा पथक

■ प्रतिनिधी | अकोला ■

आषाढी उत्सवासाठी पंढरपूरला जाणाऱ्या विठ्ठलभक्त वारकऱ्यांना वैद्यकीय, चरण आणि अन्नसेवा देण्यासाठी कानशिवनी येथील संत तुकाराम महाराज पालखी व गोपाळ कृष्ण गौसेवा व संशोधन केंद्राची पालखी, वैद्यकीय व चरण सेवा पथक शुक्रवारी पंढरपूरला रवाना झाले. स्थानिक सिंधी कॅम्प येथील बाबा हरदासराम भवन येथून या पालखी आणि वैद्यकीय सहाय्यता पथकाला भक्तिभावाने निरोप देण्यात आला.यावेळी हभप भक्तराज महाराज वाघमारे, हभप सुजित महाराज देशमुख, जेष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. अभयदादा पाटील, सिंधू ज्येष्ठ नागरिक असो चे हरीश पारवानी, या उपक्रमाचे समन्वयक प्रकाश वाघमारे इत्यादी उपस्थित होते. मान्यवरांनी प्रथम वैद्यकीय सेवा साहित्याच्या वाहनांचे पूजन व प्रार्थना केली.यानंतर झालेल्या मार्गदर्शन



भाषणात हभप भक्तराज महाराज वाघमारे, हभप. सुजित महाराज देशमुख, वरिष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. अभयदादा पाटील, सिंधू ज्येष्ठ नागरिक असोचे हरीश पारवानी इत्यादींनी या उपक्रमाचे महत्त्व विषद केले करीत उपस्थित वारकऱ्यांना शुभेच्छा दिल्यात. या टीम मध्ये पंढरपूर कडे जात असणाऱ्या वारकऱ्यांच्या सेवेसाठी वैद्यकीय वाहन विभाग,चरण सेवा, नाश्ता विभाग, चष्मा विभाग, अन्न विभाग आदी साकार करण्यात आले असून यात राजकुमार बुले, डॉ. शिवचरणसिह ठाकूर, डॉ. रमेश बरडे, डॉ.दिनेश काकड, डॉ, विजय घंगाळे, डॉ.गीता घंगाले,डॉ विद्याधर वणवे, डॉ जुनेश्वर बिडवे, डॉ.जनार्धन वानखडे, डॉ. सचिन पारसकर, डॉ.राधा पारसकर,डॉ मुकुंद साठे,डॉ प्रणाल पाटील,डॉ निलेश राऊत, डॉ अमोल दिवाने,डॉ. मंगेश कोलटकर,मुरलीधर जळमकर,डॉ सुजित राऊत, डॉ शेखर जंबुरे आदी डॉक्टर्स व मलमपट्टी विभागात गजानन कथलकर, सौ प्रमिला डोईफोडे,संदीप पातोंड, चरण सेवेत आकाश शिंदे,मंगेश चांदीवाले, मारुती वाघमारे ,दादा साबले,प्रशांत भड, गोपाल कावरे, कृष्णा छबिले,दत्ता वाघमारे, राहुल पवार,रश्मी पवार, विशाल शिंदे,दादा धवले, विपुल मेतकर,दत्ता तायडे,नारायण चिंचोलकर, विशाल शिंदे, तुषार शिंदे,अरुण शिंदे, रोहन गवाले,ज्ञानदेव ढोकने,चष्मा विभाग मे डॉ. शिवचरणसिंह ठाकुर, विजय मोडक, गोपाल घाटे आदी सेवारत आहेत.तसेच अल्पोपहार विभाग,भोजन विभाग,वाहतूक विभाग, वाहन विभाग कार्यरत असून प्रकल्प प्रमुख गोपाल घाटे,संजय वाघमारे, भारत भोर,अमोल वाघमारे, मारोती वाघमारे, दादा साबले आदी करणार आहेत.

अहो.. खासदार आमदार लक्ष देणार का ?

# मृत्यूनंतर भोगत आहे नरक यातना

## अंत्यविधीसाठी अजून पर्यंत रस्ता नाही

**कारंजा/जनमाध्यम**

तालुक्यातील सुसुंद्रा गावाच्या पुढे सुसुंद्रा हेटी हे अंदाजे २५० ते ३०० लोकसंख्येचे आदिवासीचे गाव आहे. एकमेव रस्ता त्या गावांमध्ये जाण्या-येण्याकरिता असून याच रस्त्याने सदर गावातील जवळपास २० ते २२ विद्यार्थी जिल्हा परिषद शाळा सुसुंद्रा व भाकरे महाराज विद्यालय सुसुंद्रा येथे शिकण्याकरिता येतात. पावसाळ्यातील चार महिन्याच्या कालावधीत फक्त दोनच महिने हे विद्यार्थी शाळेत येऊ शकतात. शाळेतून परतीच्या वेळेला जर पाऊस आला तर यांना नाल्याचे पाणी कमी होई पर्यंत तीन-चार तास सुसुंद्रा येथेच थांबावे लागते. मुले घरी येईपर्यंत पालकांच्या जीवात जीव नसतो. त्यांचे सतत शाळेतील शिक्षकाशी संपर्क सुरू असते. तसेच सुसुंद्रा या गावाची स्मशानभूमी याच हेटी रोडवर आहे. पावसाळ्यात अंत्यविधी करताना सर्वांना जीव मुठीत घेऊन सोपस्कार पार पाडावे लागतात. या दिवसांमध्ये कुणी आपल्या अंतिम प्रवासाला जाऊच नये असे येथील लोकांना मनोमन वाटते. मरणोपरांतही इथला संघर्ष संपत नाही.यापूर्वी तहसीलदार च्या मार्फत अनेक निवेदने देऊन कुठलेही राज्यकर्त्यांना हा पूल व्हावा अशी सद्बुद्धी सुचली नाही



हीच खरी शोकांतिका आहे. स्वातंत्र्याच्या ७६ वर्षाच्या इतिहासात आपल्या परिसरातील हे एकमेव उदाहरण असेल असे वाटते. येथील ग्रामस्थांनी आजकाल तर या संदर्भात आशा सोडलेल्या आहे. विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीला जबाबदार कोण? हा प्रश्न अनुत्तरित असला तरी पुढे राहणार नाही याची काळजी घेणे ही राज्यकर्त्यांची जबाबदारी नाही का? अशी परिस्थिती झालेली आहे, आता पाहू या विधानसभा क्षेत्रात दोन आमदार असून आता काय भूमिका बजावतात याकडे सुसुद्रा गावच्या ग्रामस्थांचे लक्ष वेधून आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद निवडणुकासाठी

## राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) पक्ष हिंगणघाट विधानसभा क्षेत्र पदाधिकारी आढावा बैठक




**हिंगणघाट/जनमाध्यम**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची हिंगणघाट, समुद्रपुर, सिंदी रेल्वे विधानसभा क्षेत्रांतील पदाधिकाऱ्याची आढावा बैठक स्थानिक साई मंदिर सभागृह येथे पार पडली..

या आढावा बैठकिला जिल्हाध्यक्ष सुनिल राऊत, माजी आमदार वसंत बोंडे, जिल्हा निरीक्षक सुरेश गुडधे, प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले, नागपूर जिल्हाध्यक्ष प्रवीण कुंठे सहकार नेते वासुदेव गौळकार, तालुका अध्यक्ष महेश झोटिंग, माजी नगराध्यक्ष बबनराव हिंगणेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हिंगणघाट विधानसभा पदाधिकारी आढावा बैठक पार पडली.

आगामी होणाऱ्या स्वराज्य संस्थेच्या निवडणूका,जिल्हा परिषद निवडणूका, पंचायत समिती निवडणुका,ग्रामपंचायत निवडणूकेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी सज्ज रहावे असे आवाहन प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संघटक हिंगणघाट विधानसभा क्षेत्रात मजबूत करण्याच्या दृष्टीकोनातून सविस्तर मार्गदर्शन नवनियुक्त जिल्हा निरीक्षक सुरेश गुडधे पाटील यांनी केले.

आगामी होणाऱ्या निवडणूका समोर ठेऊन प्रत्येकाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे धेर्य धोरणे, पक्षाचे कामे लोकांपर्यंत पोहचवणे गरजेचे आहे.तसेच लोकांच्या संपर्कात राहून त्यांच्या समस्येचे निराकरण करावे असे मनोगत जिल्हाध्यक्ष सुनिल राऊत यांनी व्यक्त केले.

यावेळी मंचावर विनोद वानखेडे, प्रशांत घवघवें, मारोती महाकाळकर, प्रभाकर रेवतकर, अशोक वांदिले, शेखर जाधव, संदीप किटे, सुधाकर खेडकर, दशरथ ठाकरे, बालू वानखेडे, अमोल बोरकर,राजू भाईमारे,गणेश वैरागडे, सचिन पारसाडे आदी उपस्थित उपस्थित होते.

## इंझाळ्याची केळी थेट प्रयागराजच्या बाजारपेठेत

### आयआयटीच्या विद्यार्थ्याने पाठविली आठ टन केळी उत्तर प्रदेशात

**वर्धा/जनमाध्यम**

हिंगणघाट तालुक्यातील इंझाळा येथील युवा शेतकरी तथा आयआयटी, मद्रासचे विद्यार्थी अभिजीत रविश सरोदे यांनी आपल्या शेतातून आठ टनांहून अधिक उत्तम दर्जाची केळी उत्तर प्रदेशातील प्रयागराजच्या बाजारपेठेत विक्रीसाठी पाठवून आपल्या आधुनिक कृषीपद्धतीकडे लक्ष वेधले आहे.



परंपरागत शेतीच्या चौकटीबाहेर जाऊन अभिजीत यांनी वैज्ञानिक पद्धतींचा अवलंब करीत हे यश प्राप्त केले. योग्य पीक नियोजन, वेळेवर खत व पाण्याचे व्यवस्थापन तसेच बाजारपेठेचा सखोल अभ्यास या सगळ्याची सांगड घालत व केळीचे सर्वोत्तम पीक घेत मोठ्या बाजारपेठेवर त्यांनी आपली छाप उमटली. या यशस्वी वाटचालीत त्यांना 'केळी रत्न' कुंदन वाघमारे व प्रकाशसिंग बैस यांचे तांत्रिक मार्गदर्शन लाभले. या मार्गदर्शनामुळे सरोदे यांनी केळी लागवडीत नवे प्रयोग करून दर्जेदार गुणवत्ता साध्य केली.

हिंगणघाट तालुक्यातून परराज्यात करण्यात आलेली ही केळीची पहिलीच मोठी निर्यात असून जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी ही गौरवाची बाब आहे.

युवा पिढीने रोजगारासाठी मोठ्या शहरांवर विसंबून न राहता आपल्या मूळ गावी पारंपरिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिल्यास भरघोस उत्पन्न मिळवता येते, अशी भावना अभिजीत सरोदे यांनी व्यक्त केली. त्यांच्या यशामागे आई मीनाक्षी रविश सरोदे व भाऊ शाम सरोदे यांचे सातत्याने मिळालेले प्रोत्साहन, तसेच अंकुश सायंकार व श्याम बोरकर यांची साथ लाखमोलाची ठरली आहे.

## नगर पालिकेकडे तक्रार करुनही दखल नाही

### नालीतील मृत जनावरामुळे परिसरात पसरली दुर्गंधी

**वर्धा** -स्थानिक भरत ज्ञान मंदिर शाळेच्या मागच्या बाजूला असलेल्या नालीत एक जनावर मृतावस्थेत असून त्याची दुर्गंधी पसरली आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून याची विल्हेवाट लावण्याकरिता भरत ज्ञान मंदिरम च्या प्राचार्यानी नगर पालिका प्रशासनाला माहिती दिली. परंतु, आमचे काम नाही, असे म्हणून हात झटकल्याचे सांगण्यात आले. सोमवारपासून शाळा सुरू होणार असल्याने विद्यार्थ्यांना नाकाला रुमाल लावूनच शाळेत बोलावावे का,? असा संतप्त प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. भरत ज्ञान मंदिर शाळा प्रशासनाने मुख्याधिकारी यांच्या कडे तीन ते चार वेळा लेखी तक्रार केली. परंतु, दखल घेतल्या गेली नसल्याचेही सांगण्यात आले. भरत ज्ञान मंदिर ही शाळा नागपूर मार्गावर असून पंधरा दिवसांपासून शाळेच्या मागच्या बाजूला नालीमध्ये जनावराचा मृतदेह पडून आहे. त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरल्याने या परिसरात वावरणे कठीण झाले आहे. शाळा सुरू झाल्यावर विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पावसाचे दिवस असून साथीचे आजार वाढत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देण्या ची मागणी परिसरातील नागरिकां कडून करण्यात येत आहे.

हिंदी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

## योगाला जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनवा-कुलगुरू

**वर्धा/जनमाध्यम**

योग हा आपल्या जीवनशैलीचा अविभाज्य भाग व्हायला



हवा. योग दिनाच्या सुरुवातीची पार्श्वभूमी आपल्याला अभिमान व आत्मसन्मानाने भरून टाकते. २७ सप्टेंबर २०१४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्त राष्ट्र महासभेत योग दिनाचा प्रस्ताव मांडला होता. योग ही आपल्या प्राचीन भारतीय परंपरेची अमूल्य देणगी आहे. शरीर, मन, विचार आणि कृती यांना एकत्र करणारा योग हा केवळ व्यायामाचा प्रकार नसून तो निसर्ग, पृथ्वी आणि संपूर्ण विश्वाशी एकरूप होण्याचा मार्ग आहे. असे प्रतिपादन महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाच्या कुलगुरु प्रो. कुमुद शर्मा यांनी केले. ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन शनिवार, २१ जून रोजी सकाळी ७:०० वाजता मेजर ध्यानचंद क्रीडांगणात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा होत्या. एक पृथ्वी, एक आरोग्य यासाठी योग ही या वर्षीच्या योग दिनाचा विषय होता.

या कार्यक्रमात जिल्हा व सत्र न्यायाधीश संजय जे. भारुका, वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव विवेक देशमुख तसेच विद्यापीठाचे वित्त अधिकारी पी. सरदार सिंह व्यासपीठावर उपस्थित होते.

विद्यापीठाचे कुलसचिव व शारीरिक शिक्षण आणि क्रीडा समितीचे अध्यक्ष तसेच कार्यक्रमाचे संयोजक प्रो. आनंद पाटील यांनी प्रास्ताविक करताना योगाचे महत्त्व अधोरेखित केले. मन, बुद्धी आणि शरीराच्या एकत्रीकरणासाठी योग आवश्यक आहे असे ते म्हणाले.

भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार योग दिनाची सुरुवात विद्यापीठाच?या गीताने करण्यात आली.

या प्रसंगी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे सहाय्यक प्राध्यापक आदित्य पुंड, योग प्रशिक्षक वैभवी प्रमोद पोटे, आणि योग प्रशिक्षक प्रताप धुमाळे यांच्या मार्गदर्शनाखाली योगासने व प्राणायामाचा सराव करण्यात आला.

या कार्यक्रमात विद्यापीठाचे शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, संशोधक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षण विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. सीमा बर्गट यांनी केले, तर शारीरिक शिक्षण व क्रीडा समितीचे पदसिद्ध सचिव आणि कार्यक्रमाचे सह-संयोजक डॉ. अनिकेत आंबेकर यांनी आभार प्रदर्शन केले. प्रयागराज येथील विद्यापीठाच्या प्रादेशिक केंद्रातही अकादमिक संचालक प्रा. अखिलेश कुमार दुबे यांच्या अध्यक्षतेखाली आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. या वेळी केंद्रातील शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## निरोगी राहण्यासाठी योगा आवश्यक : डॉ.सचिन गेडाम

### आरोग्यवर्धिनी केंद्र बोरगाव (टूमनी) येथे योग दिनाचे आयोजन



**साहूर/जनमाध्यम**

सकाळच्या मॉर्निंग वॉक सोबतच शरीरासाठी योगा खूप महत्त्वाचा आहे, योग शारीरिक मानसिक आणि भावनिक आरोग्याचे संतुलन राखण्यास मदत करतो म्हणूनच प्रत्येकाने दररोज योगासने करण्यासोबतच संतुलित आहार घेतला तर तो निरोगी राहतो स्वतःला तंदुरस्त व फिट ठेवण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने योगा करणे गरजेचे आहे असे विचार व आवाहन आरोग्यवर्धिनी केंद्र बोरगाव येथील डॉ. सचिन गेडाम यांनी योग दिनानिमित्त कर्मचारी व नागरिकांना केले.

योगा एक दिवसाचा नाही तर संपूर्ण जीवनाचा भाग बनला पाहिजे सध्याच्या जीवनशैलीत प्रत्येक जण ताण तणाव व मानसिक आरोग्याने ग्रासला आहे अशा वेळी योग हा अनेक समस्यावर एकमेव उपाय आहे आज पतंजली योग गुरु रामदेव बाबा ते आपल्या देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी पर्यंत सर्वांनी संपूर्ण देशाला योगाचा संदेश दिला आहे. म्हणूनच संयुक्त राष्ट्र महासभेने २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून घोषित केला आहे त्या अनुषंगाने योग दिनाचे महत्त्व विशद करताना डॉक्टर सचिन गेडाम बोलत होते याप्रसंगी आरोग्य केंद्राचे कर्मचारी आरोग्य सेवक रामेश्वर राऊत आरोग्य सेविका उज्जीता मंगाम आशा वर्कर अरुणा मनोहरे योगिता रिठे व गावातील महिला उपस्थित होत्या.

## गांधी ज्ञान मंदिर, वाचनालयात आंतरराष्ट्रीय योग दिवस

**वर्धा/जनमाध्यम**

गांधी ज्ञान मंदिर वाचनालय- ग्रंथालय येथे २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून साजरा करण्यात आला.हा दिवस संपूर्ण जगामध्ये साजरा केल्या जातो, शारीरिक तंदुरुस्त साठी योग हा उत्तम पर्याय आहे. शारीरिक आरोग्य इतकाच, एकाग्रता, मानसिक ताण दूर करण्यासाठी योग अभ्यास मदत



करतो, शालेय वर्गापासून आपण जर योग केला तर तो फायदेशीर ठरतो . आपल्या संस्कृती मध्ये योग अभ्यासाला खूप महत्त्व दिले आहे, म्हणून सर्वांनी योगा करावा असे मार्गदर्शन, गांधी ज्ञान मंदिर वाचनालयाच्या ग्रंथपाल अर्चना उगले यांनी विद्यार्थ्यांना योगाचे धडे देताना सांगितले.

श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने

## प्रार्थना मंदिरात योग दिवस साजरा



**समुद्रपूर/जनमाध्यम**

जागतिक योगा दिनाचे औचित्य साधून गिरड येथील प्रार्थना मंदिरात योग प्राणायाम शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या योग प्राणायाम आसन शिबिराचे मुख्य मार्गदर्शक म्हणून डॉ.राजेंद्र मुंढे डॉ. रवींद्र डरे डॉ. विजय खोंड डॉ.नथुजी भिसेकर प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी गिरड गावतील विद्यार्थी व ग्रामस्थ यांना योग प्राणायाम आसन या विषयी मार्गदर्शन करून प्रात्यक्षिक कार्यक्रम घेण्यात आला.श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या माध्यमातून गिरड गावामध्ये वर्षेभर नाविन्यपूर्ण वेगवेगळे उपक्रम राबवल्या जातात यातच जागतिक योगा दिनाचे औचित्य साधून मानवी आरोग्य ,आहार, स्वच्छता, मन ,बुद्धी ,चित्त आणि शरीर निरोगी राहण्याकरिता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांनी ग्राम आरोग्य याविषयी अतिशय मार्मिक विचार ग्रामगीतेतील चौदाव्या अध्यायमध्ये आरोग्य विषयक माहिती सांगितली आहे. असे मत गुरुदेव सेवा मंडळाचे ज्येष्ठ प्रचारक वामनरावजी झिंगरे यांनी केले.या शिबीराला यशस्वी करण्यासाठी विष्णू ब्राह्मणवाडे, पुरुषोत्तम थुटे, गोपीकृष्ण थुटे,साहिल सोनवणे ,बादल बोरेकर,भावेश ब्राह्मणवाडे ,साई कांबडी प्रसाद महाकाळकर आदिसह गुरुदेव सेवा मंडळाच्या उपासकांनी सहकार्य केले.

## संक्षिप्त

### गळफास घेत आत्महत्या

**वर्धा-**हिवरा दिंदोडा येथे शेतातील चिंचेच्या झाडाला दोरीच्या साहाय्याने गळफास आत्महत्या केल्याची घेत घटना घडली. मधुकर गुलाबराव कोल्हे (वय ५५, रा. हिवरा दिंदोडा) असे मृताचे नाव आहे.मंगेश चावरे यांनी सिंदी रेल्वे पोलिसात तक्रार दिली. यावरून पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली. मृत मधुकर कोल्हे यांच्या घरचे सदस्य बाहेरगावी गेले होते. मृतक घरी एकटाच होता अशातच त्यांनी गळफास घेतला.

### एकास विटांनी मारले

**वर्धा :** शहरातील सानेगुरुजी नगरमध्ये क्षुल्लक कारणावरून तिघांनी एकाला विटांनी मारहाण करीत जखमी केल्याची घटना घडली. या प्रकरणी प्रीतम सूर्यकांत तपासे (वय ३४, सानेगुरुजी नगर) यांनी रामनगर पोलिसात तक्रार दिली. यावरून पोलिसांनी अविनाश नामदेव डोगरे, सौरभ प्रकाश दरवाई व अभिषेक इरपाचे यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद केला. फिर्यादी यांनी आपली दुचाकी घरासमोर उभी करून ठेवली होती. तेवढ्यात तिला जोरात ठोस मारल्याचा आवाज आला. त्यावेळी आरोपी खाली उभे होते. तेव्हा प्रीतम यांनी आरोपीला गाडीची नुकसानभरपाई मागितली असता आरोपीने प्रीतम यास चाकूचा धाक दाखवत शिवीगाळ केली व विटांनी मारहाण केली. घटनेनंतर प्रीतम यांनी रामनगर पोलिसात तक्रार दिली. यावरून पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा नोंद केला आहे. याप्रकरणी पोलिसांकडून तपास सुरु केला असून योग्य कारवाई केली जाणार आहे.

### हिंगणघाटच्या गिमाटेक्स मध्ये आग, दीड कोटींचे नुकसान

**हिंगणघाट :** शहरानजीकच्या गीमाटेक्स इंडस्ट्रीजच्या कॉटन विभागामध्ये आग लागली. त्यामध्ये दीड कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. आगीत कॉटन विभागाचे महागड्या ब्लेडर, एमपीएम मशीन, कापूस व इतर सामग्री जळून खाक झाली. आग विझविण्यासाठी कंपनीमधील अग्निशामक दलासह हिंगणघाट येथून नगरपरिषद व कृषि उत्पन्न बाजार समितीचे अग्निशामक दल घटनास्थळी दाखल झाले होते. गिमाटेक्सच्या सुरक्षा दलाने दोन तासाच्या अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळविले. आगीच्या कारणाचा शोध सुरू आहे. याबाबत पोलीस स्टेशन, महसूल विभाग व संबंधितांना सूचना देण्यात आल्याचे सांगण्यात येते.

### सेलू येथे एकाच घरी निघाले सात साप

**सेलू :** येथे एकाच घरात एक-दोन नव्हे तर तब्बल सात साप निघाल्याने परिवारातील सदस्यांमध्ये धावपळ उडाली. याची माहिती सर्पमित्रांना मिळताच त्यांनी घटनास्थळ गाठून सेलू येथील राजू तळवेकर यांच्या घरी पांदिवड जातीचे बिनविषारी असलेले सात साप निघाले. तळवेकर परिवारातील सदस्यांना ते निदर्शनास येताच सर्वत्र धावपळ उडाली. लगेच त्या सापांबाबत सर्पमित्र ओम टवलारे यांना माहिती दिली. त्यांनी लगेच घटनास्थळी पोहोचून त्यांना जेरबंद करीत सुरक्षित जागी नेऊन सोडण्यात आले. त्यानंतर तळवेकर कुटुंबाने सुटकेचा निश्वास सोडला. हे साप पांदिवड जातीचे असून ३० ते ४० पिल्लांना जन्म देते, अशी माहिती सर्पमित्र ओम टवलारे यांनी दिली.

स्कूल ऑफ स्कॉलर्स, तर्फे

## आंतरराष्ट्रीय योगा दिन आणि प्लास्टिकमुक्त पर्यावरण अभियान



**हिंगणघाट-**येथील स्कूल ऑफ स्कॉलर्स शाळेने विवेकानंद पार्क येथे सामुदायिक योग सत्राचे आयोजन करून आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. परिसरातील स्थानिक रहिवाशांना आरोग्य, निरोगीपणा आणि पर्यावरणीय जागरूकता याविषयी संबोधित करून या उत्सवात सहभागी करून घेण्यात आले.या कार्यक्रमाला योगा प्रशिक्षक म्हणून - डॉ. नाखले, संगीता आगरकर आणि शुभांगी गावंडे या उपस्थित होत्या. त्यांनी विविध योगासनांद्वारे सहभागींना मार्गदर्शन केले. त्यांच्या तज्ञ मार्गदर्शनात शारीरिक तंदुरुस्ती आणि मानसिक शांती राखण्यात योगाची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करण्यात आली.

यावर्षी शाळेने योग दिनासोबतच प्लास्टिकमुक्त अभियान राबवून विद्यार्थी तसेच नागरिकांमध्ये पर्यावरण जागरूकता निर्माण करण्याचा स्तुत्य उपक्रम हाती घेतला. विद्यार्थ्यांनी जनतेला कापडी पिशव्या वाटून, प्लास्टिकच्या हानिकारक परिणामांबद्दल जागरूकता पसरवून आणि स्वच्छ, हिरवे भविष्य सुनिश्चित करण्यासाठी पर्यावरणपूरक पर्यायांचा वापर करण्यास प्रोत्साहित केले. त्यांनी या अभियानातून एकच संदेश दिला की 'प्लास्टिक टाळा, पर्यावरण वाचवा!'

शाळेच्या मुख्याध्यापिका शिल्पा चव्हाण यांनी सर्व विद्यार्थ्यांना दररोज योगा करण्याचे आवाहन केले. त्यांनी म्हटले की,'योग हा केवळ शारीरिक व्यायाम नसून मानसिक शांती व एकाग्रतेचा मार्ग आहे. शाळेचे सह प्रशासकीय अधिकारी प्रदीप जोशी म्हणाले की,'योगामुळे विद्यार्थी तणावमुक्त राहतात आणि शिक्षणातही चांगली कामगिरी करतात.तसेच प्लास्टिक मुक्त अभियाना अंतर्गत संदेश दिले की,**कापड पिशवी घरोंघरी, पर्यावरणाचे रक्षण करी.**

कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी सामूहिक 'ध्यान' करून योग दिनाचा समारोप केला. कार्यक्रमाचे सूत्र संचालन शालेय शिक्षिका सचिता भोयर यानी केले तर तर आणि या कार्यक्रमाच्या यशस्विते कारिता शालेय समन्वयक सारिका नरड, ममता दायमा, क्रीडा शिक्षक सत्येंद्र झोटिंग, महेश गंधारे, प्रफुल्ल कासर, आकाश जवादे, शिक्षिका, अमीना शेख,कल्याणी चांदेकर, चेतना वाणी, दीपाली ठाकरे, महक पाख़रानी यानी अथक परिश्रम घेतले.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक २०८
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयाने योग दिंडीतून दिला आरोग्याचा मंत्र

## योग सप्ताहात विविध स्पर्धेद्वारे जनजागृती

**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ द्वारा संचालित विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय, अमरावती येथे १६ जून ते २० जून २०२५ दरम्यान योग सप्ताह उत्साहात आणि विविध उपक्रमांद्वारे साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे संचालक डॉ. रवींद्र वाघमारे, प्राचार्य तथा स्वस्थवृत्त विभाग प्रमुख डॉ. संजय चोपकर, आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या समन्वयक डॉ. प्रणिता शिंदे, विद्यालयाच्या निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.वैशाली वानखडे, शल्य विभाग प्रमुख डॉ. मंजुषा कालमेघ, शालाक्य विभाग प्रमुख डॉ. ज्योती डाखोरे, क्रिया शरीर विभाग प्रमुख डॉ. प्रज्ञा शिंदे, रोग निदान विभाग प्रमुख डॉ. रमेश वाघमारे, रचना शरीर विभाग प्रमुख डॉ. अतुल जैन, पंचकर्म विभाग प्रमुख डॉ. शिल्पा देशपांडे, बालरोग विभाग प्रमुख डॉ. नीलेश इंगळे, डॉ. देवेंद्र चौधरी, इ. प्राध्यापक



वर्ग तसेच विद्यालयाचे पदव्युत्तर विद्यार्थी, इंटर्न्स आणि विद्यार्थ्यांसह कर्मचाऱ्यांनी सक्रीय सहभाग घेतला.

या सप्ताहामध्ये योगासने, प्राणायाम, ध्यानधारणा या सत्रांतून सर्वांना योगाचे शारीरिक व मानसिक लाभ अनुभवता आले. या योग सप्ताहामध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते, जसे दि.१६ रोजी निबंध स्पर्धा, १७ रोजी स्लोगन स्पर्धा, १८ रोजी योगासन स्पर्धा, दि.१९ रोजी रांगोळी स्पर्धा, दि.२० रोजी योग नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धांना विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला. विविध वर्गातील विद्यार्थ्यांनी आपली सर्जनशीलता, कला व योग कौशल्य दाखवले. योग प्रचार आणि जनजागृतीसाठी 'योग दिंडी' चे आयोजन करण्यात आले. या योग दिंडीमध्ये विद्यार्थ्यांनी हातात फलक, बॅनर्स, घोषवाक्य घेत शिस्तबद्ध संचलन केले आणि जनतेमध्ये योगाचे महत्त्व पोहोचवले.

या सर्व स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांचा गौरव दि.२० तारखेला पुरस्कार वितरण सोहळ्याद्वारे करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व बक्षिसे देण्यात आली. २१ जून रोजी, आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून, महाविद्यालयात योगा प्रोटोकॉल अंतर्गत सामूहिक योग सत्र पार पडले. सर्व सहभागी सदस्यांनी योगाभ्यासात सहभाग घेत योग दिनाचा सार्थ उत्सव साजरा केला. या सर्व उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये योगाबद्दल आत्मभान, आरोग्याचे भान व सांस्कृतिक जागरूकता निर्माण झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व विभागप्रमुख, शिक्षकवृंद व विद्यार्थी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# तक्षशिला अभियांत्रिकी दारापुर येथे आंतराष्ट्रीय योग दिन उत्साहात







**अमरावती/प्रतिनिधीः-** 'योग ही केवळ कसरत नाही, तर ती आत्मशोधाची, जीवनशैली घडवण्याची एक प्रक्रिया आहे.' या विचाराला साकार रूप देत तक्षशिला अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय, दारापुर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन अत्यंत शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि दादासाहेब गवई यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली.

त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात योगशास्त्राचा विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला. यामध्ये सूर्यनमस्कार, विविध योगासने, प्राणायाम, ध्यान आणि अंतर्मनाशी नाते जोडणारी मौनप्रार्थना या सत्रांमधून विद्यार्थ्यांनी योगाच्या शारीरिक व मानसिक लाभांची प्रचीती घेतली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. टी. इंगोले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले की, 'आजचा दिवस केवळ योगासनांचे प्रदर्शन नाही, तर आपल्या जीवनशैलीत सकारात्मक बदल घडवणारा एक संकल्प दिवस आहे.योग ही आपल्या प्राचीन परंपरेची अमूल्य देणगी असून, त्याचा सन्मान केवळ उत्सवात नव्हे, तर रोजच्या कृतीतून होणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने योगाला आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनवावा, हाच जागतिक योग दिनाचा खरा संदेश आहे.' या कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी 'योगाबद्दल माझा अनुभव' या विषयावर आपले विचार मांडले. काही विद्यार्थ्यांनी योगावर आधारित पोस्टर्स आणि घोषवाक्य सादर केले. विशेष म्हणजे, 'नेहमीच्या स्पर्धेच्या युगांपासून दूर, हे काही क्षण शांततेचे होते' असा अनुभवही अनेक विद्यार्थ्यांनी शेअर केला, जो या कार्यक्रमाचा खरा आत्मा ठरला. या कार्यक्रमाला योगशिक्षक भानुदासजी काळे यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. संतोष यावले यांनी केले. या प्रसंगी कार्यक्रमाला डॉ. एस. टी. वरघट, डॉ. एन. एस. घोटकर, डॉ. बी. एस. शेटे, प्रा. ए. एस. बोंबटकर आदि उपस्थित होते.

# उपजिल्हा रुग्णालय येथे एकाच दिवशी ३० रुग्णांवर सामान्य शस्त्रक्रिया



**मोर्शी/प्रतिनिधीः-** जागतिक योगदिनाचे औचित्य साधून दि.२२ जून रोजी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य व आयुष्यमान भारत जनआरोग्य योजनेअंतर्गत स्थानिक उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे हर्निया, हायड्रोसिल, अमबिलीकल हर्निया, अपेनडिक्स सारख्या इतर ३० रुग्णांवर उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रमोद पोतदार यांच्या उपस्थितीत यशस्वीरित्या शस्त्रक्रिया पार पडल्या.

हे शस्त्रक्रिया शिबिर सर्जन डॉ.प्रविण बिजवे,डॉ.राहुल खन्ना,भुलतज्ञ डॉ. जगदीश काळभोर,डॉ. अश्विनी वंजारी यांच्या प्रत्यक्ष सहभागातून संपन्न झाले.सदर शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन जिल्हाशल्य चिकित्सक डॉ.दिलीप सौदंळे,डॉ.संदीप हेडाऊ यांचे मार्गदर्शनाखाली पार पडले.या शिबिराच्या यशस्वीतेसाठी उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथील वरूड व मोर्शीचे वैद्यकीय समन्वयक डॉ.घनश्याम मानकर, मिनाक्षी वगारे, रेशमा बहुरूपी,भागश्री नागले, अकिंत नेवारे,स्वाती पाटील,ज्ञानेश्वर टाकले,सागर झटाले, प्रवीण कापडे,आकाश जवंजाळ,शोभा इंगळे,शिला राऊत,आचल तायवाडे,नौशाद शहा, महात्मा जोतिराव फुले जन व आयुष्यमान भारत जनआरोग्य योजनेमधील वशीम शेख,प्रकाश पांडे,सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी अथक परीश्रम घेतले.शिबिराचा समारोप रुग्णांच्या वैयक्तिक भेटी घेऊन व सविस्तरपणे माहिती देऊन करण्यात आला.

# जिल्हाधिकारी यांची मोर्शी येथे आढावा बैठक

## -वननिसर्ग पर्यटन केंद्रास भेट

**मोर्शी/प्रतिनिधीः-** गटविकास अधिकारी यांनी घरकुल लाभार्थ्यांच्या घरकुल अद्यावत फोटोसह टॉपिंग याद्या तहसील कार्यालयात त्वरित सादर करून तहसीलदार यांनी घरकुल लाभार्थ्यांना तातडीने रॉयल्टी देऊन त्यांना एक ब्रास प्रमाणे वाळू उपलब्ध करून देण्यात यावी.घरकुल करिता रेती रॉयल्टी वाहतूक पास दिल्यानंतर त्यांच्या नोंदी घेणे व रेती उचल केल्यानंतर सदरच्या पास लाभार्थ्यांकडून परत घेण्याबाबत निर्देश देण्यात आले.घरकुल रॉयल्टीचा कोणत्याही परिस्थितीत गैरवापर होणार नाही याची ग्राम महसूल अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीबाबत सर्व ग्राम महसूल अधिकारी मंडळ अधिकारी यांनी पथक निहाय कार्यवाही करावी.गौण खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनांची ॲप्सद्वारे तपासणी करणे अवैध वाहतूक आढळून आल्यास तशा प्रकारचा प्रस्ताव सादर करण्यात यावा.असे निर्देश मोर्शी येथे जिल्हाधिकारी यांनी आढावा बैठकीत दिले.

गावनिहाय पी एम किसान लाभार्थी यांची नोंदणीबाबत आढावा घेण्यात आला.यामध्ये गावनिहाय नियोजन करून तीन कॅडरमध्ये विभागणी करावी. तहसीलदार,गटविकास अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांनी नियोजन करून कृषी सेवक,ग्रामसेवक व ग्राम महसूल अधिकारी यांनी शेतकऱ्यांपर्यंत पोहचून काम पूर्ण करून घेणे आवश्यक असल्याचे निर्देश देऊन सदर कामे ३० जून २०२५ पर्यंत पूर्ण करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या. संजय गांधी,श्रावण बाळ योजनेबाबत डीबीटी पोर्टल आढावा व प्रत्यक्ष पाहणी करून लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळण्याचे अनुषंगाने ३० जूनपर्यंत पूर्ण करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

नैसर्गिक आपत्ती विषयक घरपडझडचे अनुदान तातडीने वाटप करणे.तसेच शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनामा करून यादी तयार करणे. सामायिक शेतीबाबत संमतीपत्र तिथेच घेणे याबाबत ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांना निर्देश देण्यात आले. अनुदान वाटप करतांना pending e-kyc काम तातडीने पूर्ण करणे बाबत संवेदनशील होऊन काम करणे. त्याचप्रमाणे पुरवठा विभागामध्ये सुद्धा पेंडिंग इ केवायसी ३० जूनपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.

मोर्शी येथील वननिसर्ग पर्यटन केंद्रास भेट देऊन पर्यटन केंद्राची माहिती जिल्हाधिकारी यांनी जाणून घेतली व त्यांच्या हस्ते त्या ठिकाणी वृक्षारोपण सुद्धा करण्यात आले.

तदनंतर नगरपरिषद अंतर्गत डंपिंग डेपो येथील कचरा व्यवस्थापनबाबत भेट दिली.संपूर्ण कचरा व्यवस्थापन प्रक्रिया याबाबत माहिती घेण्यात आली व तेथे वृक्षारोपण करण्यात आले.

# विद्यार्थ्यांनी राबविली शेतीच्या बांधावर पेरणी प्रक्रिया

**तिवसा/प्रतिनिधीः-** स्व.आर जी देशमुख कृषी महाविद्यालय तिवसा येथील ग्रामीण कृषी कार्यानुभव आणि कृषी औद्योगिक प्रशिक्षण संस्था रावे उपक्रमाअंतर्गत सुरवाडी गावालगत असलेल्या शेतीच्या बांधावर जाऊन विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांना सोयाबीन पेरणी बाबत मार्गदर्शन केले.



तिवसा तालुक्यात सोयाबीन हे शेतकऱ्यांचे पसंतीचे पीक आहे. सोयाबीन बियाणे RVSM-२०११-३५ आणि रुची ५००१ या बियाण्यांची पेरणी येथील युवा शेतकरी अंकुश प्रमोदराव देशमुख, उत्तमराव गौरखेडे,दिलीपराव गौरखेडे, योगेश बीरे यांच्या शेतात व मार्गदर्शनाखाली पेरणी पार पडली. महाविद्यालयाचे प्राचार्य अरुण डहाके,रा वे समनव्यक सावन राठी,प्रा.भोजने,सुधीर उमप यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी चांदणी राठोड, यामिनी पटले, तृप्ती पांडव,यश पाटील,गोपाल पोल्हाड यांनी ही पेरणी प्रक्रिया पार पाडली.

# विकासराव खांडपासोळे यांचे निधन

**तिवसा/प्रतिनिधीः-** शिक्षक कॉलनी,तिवसा येथील रहिवासी विकासराव खांडपासोळे यांचे बुधवारी दुपारी १२ वाजेच्या सुमारास अल्पशा आजाराने राहत्या घरी निधन झाले.मृत्यूसमयी ते ७० वर्षाचे होते.त्यांच्या मृत्यूपश्चात बराच मोठा आप्त परिवार आहे.

# सौर कृषी पंपांच्या समस्या सोडविण्यासाठी महावितरणचा पुढाकार

## -शेतकऱ्यांसाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यात विविध योजनांमध्ये बसविण्यात आलेल्या एकूण सौर कृषी पंपांची संख्या ५ लाख ६५ हजारांवर पोहोचली असून महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. आणखी पाच लाख सौर कृषी पंप बसविण्यात येणार आहेत. सौर कृषी पंप बसविल्यानंतर त्यात काही बिघाड होण्याच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी महावितरणने पुढाकार घेतला असून शेतकऱ्यांना घरबसल्या फोनवरून अथवा ऑनलाईन तक्रार करता येईल, अशी सुविधा उपलब्ध केली आहे. शेतकऱ्यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले आहे.





मे महिन्याच्या अखेरीस आलेल्या वादळी वाऱ्यांमुळे आणि मुसळधार पावसामुळे काही ठिकाणी सौर ऊर्जा निर्मिती पॅनेल्स कोसळून नुकसान झाले. अशा प्रकारच्या विविध समस्या सोडविण्यासाठी व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. सौर कृषी पंप बसविल्यानंतर पंप चालत नसणे, सौर पॅनेलची नासधूस होणे, सौर ऊर्जा संच काम करत नाही, सौर पॅनेल्सची किंवा पंपाची चोरी होणे अथवा पंपातून कमी दाबाने पाणी येणे अशा विविध तक्रारी शेतकरी करू शकतील. सौर कृषी पंप संचाचा विमा उतरविण्यात आला आहे.

लाभार्थी शेतकऱ्यांना महावितरणच्या टोल फ्री नंबरवर फोन करून किंवा महावितरणच्या संबंधित वेबसाईटवर ऑनलाईन नोंदणी करून किंवा थेट संबंधित पुरवठादार कंपनीच्या वेबसाईटवर नोंदणी करून तक्रार नोंदविता येईल. तक्रार नोंदविताना शेतकऱ्याने सौर कृषी पंपाचा लाभार्थी क्रमांक लिहिला तर पुरेसे आहे. शेतकरी आपला नोंदणीकृत मोबाईल क्रमांक लिहूनही तक्रार करू शकतात. आपला जिल्हा, तालुका, गाव व स्वतःचे नाव अशी माहिती देऊनही तक्रार करता येईल.

शेतात सौर कृषी पंप बसविल्यानंतर पाच वर्षे त्याची देखभाल दुरुस्ती करण्याची जबाबदारी संबंधित पुरवठादार कंपनीवर आहे. शेतकऱ्यांनी तक्रार नोंदविल्यानंतर तीन दिवसात तक्रारीचे निवारण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. सर्व कंत्राटदारांना त्यांनी ज्या जिल्ह्यात पंप बसविले आहेत त्या जिल्ह्याच्या ठिकाणी सेवा केंद्र उभारणे बंधनकारक करण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या तक्रारीचे निराकरण झाल्यावर त्यांना मोबाईलवर संदेश मिळेल. शेतकऱ्यांच्या तक्रारी व त्यांचे निराकरण याबाबत कंत्राटदार कंपन्यांच्या कामावर महावितरणच्या प्रत्येक मंडलाच्या अधीक्षक अभियंत्यांची देखरेख राहील.

### अशी तक्रार करा –

महावितरणच्या माध्यमातून बसविलेल्या सौर कृषी पंपांविषयी काही तक्रार असल्यास खालील प्रकारे ती तक्रार नोंदविता येईल.

-महावितरणचा टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-३४३५ व १८००-२१२-३४३५

-मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेची वेबसाईट - https://www.mahadiscom.in/solar_MTSKPY

**-पुरवठादार कंपनीची वेबसाईट** - यावर थेट जाता येईल किंवा महावितरणच्या वेबसाईटवर एकत्रितपणे सर्व ४४ पुरवठादार कंपन्यांच्या लिंक उपलब्ध केल्या आहेत.

# अमरावतीच्या वृद्ध तीर्थयात्रेकरूंचे जबलपूर रेल्वे स्टेशनवर योग प्रात्यक्षिक

## -विजय गोहत्रे मित्र परिवाराचा स्तुत्य उपक्रम

**अमरावती/प्रतिनिधीः-** वृद्ध, दुर्बल व सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांना तीर्थयात्रा घडवून आणण्याचा स्तुत्य उपक्रम राबविणाऱ्या विजय गोहत्रे मित्र परिवाराच्या वतीने १५ ते २२ जूनदरम्यान अयोध्या, काशी, वाराणसी, जबलपूर या पवित्र ठिकाणी धार्मिक यात्रेचे आयोजन करण्यात आले. सुमारे १०० यात्रेकरू या कीर्तनात्मक यात्रेत सहभागी झाले असून, शनिवार दि.२१ जून रोजी यात्रेकरूंचे जबलपूर रेल्वे स्थानकावर आगमन झाले. विशेष म्हणजे त्या दिवशी जागतिक योग दिन असल्याचे औचित्य साधून, यात्रेकरूंनी रेल्वे स्थानकावरच योगाचे प्रात्यक्षिक करून योग दिन साजरा केला.

यावेळी रायजी प्रभू शेलुडकर व पतंजलीचे ललीता शेलूडकर यांनी सर्व यात्रेकरूंना योगाचे मार्गदर्शन केले व प्रत्यक्ष प्रात्यक्षिके करून दाखवली. या कार्यक्रमास जबलपूर रेल्वे पोलीस स्टेशनचे एस.आय. अरविंद सिंग, हरवान बघेल, सविता बघेल, निमेन तिवारी, विजय गोहत्रे, अक्षय गोहत्रे यांच्यासह अनेक मान्यवर व शेकडो यात्रेकरू उपस्थित होते. या तीर्थ दर्शनाचे आयोजन संस्थेने केले, या संस्थेची शिस्त आणि संस्कार येथे दिसून आले, आपण इतक्या मोठ्या संख्येने असून देखील नियमांचे पालन करीत आहात हे कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन करीत आयोजकांचे व यात्रीकरुंचे एस आय अरविंद सिंग यांनी कौतुक केले. पुढील प्रवासाच्या शुभेच्छा दिल्या,तसेच रेल्वे पोलिसांच्या वतीने सर्वांना पाणी बॉटलचे वाटप करण्यात आले. या आगळ्यावेगळ्या उपक्रमामुळे तीर्थयात्रा आणि आरोग्यदायी योगसाधना यांचा सुंदर संगम पाहायला मिळाला, अशी प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केली. कार्यक्रमकरिता मोझरी आश्रम येथील सितारामजी गुंडवाले महाराज ,संदीप शेंडे, अरुणा गुडदे, जीवन चव्हाण, रामेश्वर यउतकर, ज्ञानेश्वर मानकर, बलदेव मोहिते, अजबराव मडीकर, राजू निर्मळ, अक्षय गोहत्रे, प्रणय गोहत्रे, प्रज्वल गोहत्रे ,उमेश घायवट, अमन पुनसे, मंगेश गावनेर ,यश अलोने ,सचिन काकडे यांनी परिश्रम घेतले.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

निविदा सूचना "४" २०२५ - २०२६

खाली नमूद केलेल्या कामांकरीता येणा-या अंदाजे खर्चासह मोहरबंद निविदा मागविण्यांत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | खर्च | वेबसाईटवर निविदेची उपलब्धता | |
|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | अति. अमरावती औ. क्षे., अतिथीगृह इमारतींचे देखभाल व दुरुस्ती अंतर्गत २०२४-२५ करीता रस्ता व पाणी पुरवठा योजनेची वार्षिक देखभाल करणे. पंचतारांकित औद्योगिक क्षेत्र, मुख्य रस्ते, अग्निशमन केंद्र परिसर आणि WTP परिसराचे रखरखाव करणे. वृक्षारोपण आणि लॉन इत्यादींचे देखरेख करणे. (२ री वेळ) | [illegible] | [illegible] | [illegible] |
| २ | अति. अमरावती (नांदगांव पेठ) औ. क्षे...... पा.पु.यो. देखभाल व दुरुस्ती अंतर्गत अमरावती, अति. अमरावती आणि यवतमाळ औ. क्षेत्राकरीता १२ महिन्यांच्या कालावधीसाठी फिटकरी आणि ब्लीचिंग पावडरचा पुरवठा करणे. (२ री वेळ) | [illegible] | [illegible] | [illegible] |
| ३ | अति. अमरावती (नांदगांव पेठ) औ. क्षे...... पा.पु.यो. देखभाल व दुरुस्ती अंतर्गत यवतमाळ, अति. अमरावती आणि अमरावती औ. क्षेत्राकरीता १२ महिन्यांच्या कालावधीसाठी क्लोरीन गॅस सिलेंडरचा पुरवठा करणे. (२ री वेळ) | [illegible] | [illegible] | [illegible] |

उपरोक्त कामांचे निविदा प्रपत्र https://mahatender.gov.in या संकेत स्थळावर वरिल कालावधिपासुन उपलब्ध राहिल.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३६ अंक २८८
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# शहरात वृक्ष लागवड अभियानाकरिता महापालिकेला ४० हजार रोपांची उपलब्धता

## आ.सुलभा खोडके यांचा यशस्वी पाठपुरावा

### वृक्ष लागवड व पर्यावरण संवर्धन अभियानात सहभागी व्हा

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात पायाभूत सुविधांची पूर्तता होत असतांना स्वच्छ, सुंदर व हरित अमरावतीची संकल्पना प्रत्यक्षात उतरविणे सुद्धा महत्वाचे आहे. त्या अनुषंगाने वृक्ष लागवड अभियान मोठ्या प्रमाणावर राबविण्यासाठी आ.सुलभा खोडके यांचा विशेष भर आहे. वृक्ष लागवड हि एका यंत्रणेची जबाबदारी नसून ती एक लोक चळवळ व्हावी म्हणून 'एक व्यक्ती एक वृक्ष' या अभिनव संकल्पनेतून प्रत्येकाचा लोक सहभाग वाढावा म्हणून अमरावती महानगर पालिकेला शासनाच्या वन विभागाकडून ४० हजार रोपांची उपलब्धता करण्यात येत आहे. या संदर्भात आ. सुलभा संजय खोडके यांनी शासनाकडे केलेले प्रयत्न फळास आले असल्याने आता शहरात वन महोत्सव साजरा करण्यात येणार आहे.

ग्लोबल वॉर्मिंगमुळे पर्यावरणात झालेले किंवा होत असलेले बदल बघता, स्वच्छ,हरीत आणि सुदंर अशा पर्यावरणाची कास धरणे व प्रदूषण मुक्त नैसर्गिक वातावरणाची निर्मिती करणे आवश्यक आहे. दोनवर्ष कोरोना काळात ऑक्सीजनची कमतरता निर्माण झाली होती. तर सद्या ऋतुचक्र बदलत चालले असल्याने वातावरणात प्रचंड दाहकता निर्माण होतांना दिसत आहे. बदलत्या वातावरणामुळे जनजीवन प्रभावित होत आहे. हे असेच चालत राहिले, तर वसुंधरेवर जनजीवन धोक्यात येईल. पर्यावरणाचा असमतोल व ग्लोबल वार्मिंग पासून जर वसुंधरेला वाचवायचे असल्यास मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करणे काळाची गरज आहे.



त्याकरिता अमरावती महानगर पालिकेच्या वृक्ष लागवड अभियान राबविण्यासंदर्भात आ. खोडके यांनी गेल्या २२ मे २०२५ रोजी महापालिकेत बैठक घेऊन उद्यान विभागाच्या कामकाजाचा आढावा घेतला. दिवसेंदिवस पर्यावरणाचे संतुलन बिघडत असून जागतिक तापमानवाढीमुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहे. वृक्ष संतुलन राखले जावे. पर्यावरण जोपासावे. याकरिता वृक्ष संवर्धन ही काळाची खरी गरज आहे. लवकरच पावसाळा सुरु होत असून अमरावती शहरातील ओपन स्पेस, गार्डन व सौंदर्यीकरणाच्या व पर्यावरणाच्या दृष्टीने इतर ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्याचे नियोजन करावे, अशा सूचना आमदार महोदयांनी बैठकीत केल्या होत्या.

मात्र शहरात वृक्ष लागवड अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी जवळपास ४० हजार वृक्षांची उपलब्धता करणे आवश्यक आहे. अशी माहिती मनपा आयुक्तांनी दिली होती. वृक्षांच्या मुबलकते अभावी मनपाची माझी वसुंधरा अभियानाला सुद्धा खीळ बसली असल्याचे कारण समोर आले होते.

पावसाळा सुरु होऊनही शहरात वृक्ष लागवड होत नसल्याने आमदार सुलभा खोडके यांनी शहरात मोठ्या प्रमाणात वृक्षांची उपलब्धता करण्याला घेऊन शासनाकडे पाठपुरावा केला. आगामी काळात शाळा - महाविद्यालय सुरु होणार आहे. त्यामुळे शासनाच्या वन महोत्सव या महत्वकांशी उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी सुद्धा वृक्षांची मोठ्या प्रमाणावर उपलब्धता होणे महत्वाचे असल्याचे आमदार महोदयांनी शासनाला अवगत केले. अशातच शासनाच्या महसूल व वन विभागाने १९ जून २०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित करून वृक्ष महोत्सव मध्ये रोपांचे वाटप करण्याचे निर्देश दिले. या अंतर्गत अमरावती महानगर पालिकेला शासनाच्या वन विभागाकडून ४० हजार रोपांची उपलब्धता करण्यात येत आहे.

मागील काळात आ.खोडके यांच्या प्रयत्नाने शहरातील मनपाच्या खुल्या जागांना चैनलिंग फेन्सिंग करण्यात आले आहे. त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात विविध प्रजातींच्या वृक्षाची लागवड करायची आहे. यासाठी मनपाद्वारे 'मागेल त्याला वृक्ष' या संकल्पनेतून प्रत्येकाला वृक्षाचे वाटप करण्यात येणार आहे. तसेच शाळा , महाविद्यालय , सेवाभावी संस्था, मंडळे व कार्यालये आदीं ठिकाणी सुद्धा वृक्ष लागवड अभियान राबविण्यात येणार आहे. वसुंधरेवर हरित सृष्टी साकारण्याकरिता सर्वांनी वृक्षारोपण व संवर्धन अभियानात सहभागी होण्याचे आवाहन आ. सुलभा खोडके यांनी केले आहे.

# चिमुकल्यांच्या स्वागतासाठी शाळा सज्ज

**अमरावती/का.प्र.**

प्रवेशोत्सव हा उपक्रम स्थानिक शाळा स्वराज्य संस्थेच्या शाळांची गुणवत्ता व मुलांची उपस्थिती वाढविण्यासाठी राबविण्यात येत आहे. या शैक्षणिक वर्षाची सुरुवात २३ जून २०२५ पासून सुरु होत आहे. सदर उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांमधून नवागतांचा प्रवेशोत्सव जल्लोषात करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

त्या अनुषंगाने शाळेचा उंबरठा पहिल्यांदाच ओलांडणाऱ्या चिमुकल्यांच्या स्वागतासाठी शाळा प्रशासनातर्फे तयारी सुरू करण्यात आली असून आज तालुक्यातील जि. प. शाळेत प्रवेशोत्सव कार्यक्रम घेण्यात आला आहे. तालुक्यातील जि. प. शाळांना आ. प्रवीण तायडे यांच्यासह गटशिक्षणाधिकारी तसेच १०० अधिकारी भेटी देणार आहे.



शाळा प्रवेशोत्सव उपक्रमांच्या नियोजनासाठी जिल्हयामध्ये शाळा प्रवेशोत्सव कक्ष स्थापन करावा. सदर कक्षामध्ये आवश्यक कर्मचारी व अधिकारी यांची नेमणूक करावी, अशी सूचना जिल्हास्तरावर या पत्रकात दिली आहे.

पंचायत समिती अंतर्गत शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना गणवेश, बूट, मोजे व नवीन कोरे पाठ्यपुस्तके मोफत देण्यात येणार आहेत. २३ जूनचा शाळेचा पहिला दिवस म्हणजेच प्रवेशोत्सव जल्लोषात व्हावा, यासाठी प्रत्येक शाळेत मुख्याध्यापक व त्यांचे सहकारी शिक्षक जोमाने तयारीला लागले आहेत. मुख्याध्यापकांची बैठक घेऊन शाळा पूर्वतयारीच्या सर्व सूचना देण्यात आल्या आहेत.

शाळा प्रवेशोत्सव' या उपक्रमाबाबत गटशिक्षणाधिकारी यांच्या लॉगीनला शाळा प्रणालीमध्ये शाळा भेटीचा अहवाल नोंदविण्याची सुविधा देण्यात आली आहे.

२३ जून रोजी शाळेला भेट देणाऱ्या लोकप्रतिनिधी व अधिकारी यांच्या शाळा भेटीच्या अहवालाची नोंद करावयाची आहे, असेही पत्रकात म्हटले आहे. नवागत म्हणजेच पहिल्यांदाच प्राथमिक शाळेत प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जीवनात त्याचा पहिला शाळा प्रवेश यादगार व्हावा, असा प्रयत्न युद्ध पातळीवर प्राथमिक शिक्षण विभागात सुरू आहे.

# ५ वर्षात ४३९ जणांना आंतरराष्ट्रीय ड्रायव्हिंग लायसन्स

**अमरावती/का.प्र.**

ड्रायव्हरकडे लायसन्स असणे खूप महत्वाचे आहे. त्याचेही अनेक महत्त्व आहेत. शहरात बहुतेक नागरिक ड्रायव्हिंग लायसन्स घेतात. पण आता प्रत्येकाकडे त्यांच्या सोयीनुसार स्कूटर, बाईक, कार, ट्रक अशी वाहने आहेत. या चालकांच्या सुरक्षिततेसाठी प्रादेशिक परिवहन महामंडळाचा परवाना असणे आवश्यक आहे. आता वाहतुकीचा दृष्टिकोन बदलला आहे. अनेक कुटुंबे बाहेरील गावांमध्ये जातात. सोयीसाठी ते ट्रेन किंवा बसऐवजी त्यांच्या वैयक्तिक वाहनाने जाणे पसंत करतात. अशाप्रकारे, शिक्षणाची व्याप्ती देखील खूप वाढली आहे. अनेक विद्यार्थी पुढील उच्च शिक्षणासाठी इतर भागात जाऊ लागले. शिक्षण घेतल्यानंतर, हे विद्यार्थी नोकरीसाठी घर सोडून सोयीनुसार राज्यात किंवा इतर राज्यात काम करण्यासाठी जातात. यामुळे, नियमांनुसार प्रत्येकासाठी वाहन परवाना असणे आवश्यक झाले आहे. या आंतरराष्ट्रीय परवान्यासाठी सरकारी फॉर्म क्रमांक ४ आवश्यक आहे. जो परिवहन कार्यालयात उपलब्ध आहे. यामध्ये संपूर्ण आणि अचूक माहिती भरावी लागेल. याशिवाय ऑनलाइन वैद्यकीय प्रमाणपत्र, वैध व्हिसा, वैध पासपोर्ट, वैध स्थानिक ड्रायव्हिंग लायसन्स आवश्यक आहे. ड्रायव्हिंग लायसन्समधील ड्रायव्हरचा पत्ता सारखाच असणे आवश्यक आहे. अन्यथा, अडथळा येऊ शकतो. प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, २०२० ते २०२५ या ५ वर्षात आंतरराष्ट्रीय ड्रायव्हिंग परवानग्या (आयडीपी) अंतर्गत एकूण ४३९ परवाने जारी करण्यात आले आहेत.



## उत्तमसरा येथे योग दिन

**अमरावती/का.प्र.**

पंचायत समिती भातकुली मधिल उत्तमसरा येथे २१जूनला आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विशेष योग सत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात शाळेतील शिक्षक, विद्यार्थी तसेच पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावतीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

या कार्यक्रमात चंद्रकांत करपते, वरुण मावळे, साहिल शेगोकार, प्रथमेश मालधुरे, जयदत्त मुंडे आणि विश्वजीत जाधव या कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन केले व तसेच डॉ. मुकुंदा सवई (Art of living) यांनी ध्यान साधने बद्दल मार्गदर्शन व विद्यार्थांनी विविध योगासनांचे प्रात्यक्षिक दाखवले व योगाभ्यासाचे महत्व सांगितले. शाळेतील शिक्षक राजेश सावरकर,गजानन येलोणे,प्रमोद कांबळे व विद्यार्थ्यांनीही त्यात सक्रिय सहभाग घेत आपल्या आरोग्यासाठी योगाचे महत्त्व समजून घेतले. योगामुळे शरीरासोबत मनही ताजेतवाने राहते, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे शिक्षक व कृषी महाविद्यालयाच्या अंतीमवर्षाच्या सातव्या सत्राच्या विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. ग्रामीण भागातील मुलांमध्ये आरोग्य जागृती निर्माण करण्याचा या उपक्रमाचा उद्देश सफल झाला.



## एडिफाय स्कूल येथे योग व संगीत दिन

**अमरावती-** एडिफाय स्कूल, येथे आंतरराष्ट्रीय योग दिन व जागतिक संगीत दिन मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुण्या म्हणून योगा शिक्षिका कोमल देशपांडे यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमाचे संचालन मनस्वी धुळे व श्रेया कुकडे (इ. ९ वी) या विद्यार्थिनींनी त्रुष्णा राठी यांच्या मार्गदर्शनाखाली केले. पल्लवी शिरभात, निरज गावंडे सर आणि भूषण वानखडे सर यांच्या संयुक्त सादरीकरणाने कार्यक्रमात रंग भरले. त्रुष्णा राठी यांनी आभार प्रदर्शन केले तर निधी कडू,यांनी प्रमुख पाहुण्यांना धन्यवाद पत्र दिले. संपूर्ण कार्यक्रम व्यवस्थापन आणि शिस्त क्रीडा शिक्षिका प्राची किन्नाके ,आणि क्रीडा प्रमुख आनंद उइके,अनुराग शिरसाट सर यांनी सांभाळली.कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन सीसीए प्रमुख भारत मोंढे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. शाळेचे डायरेक्टर प्रिन्सिपॉल डॉ. जेकब दासयांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. शाळेचे अध्यक्ष पूरनलाल हबलानी तसेच संचालक शिवारामकृष्णम ,रवि इंगले आणि पल्लवी चकीलाला यांनी कार्यशाळेच्या कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या आणि भविष्यातही अशाप्रेरणादायी कार्यक्रमांचे आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# राष्ट्रीय प्रधान मुखीया सरपंच संघाची कार्यकारिणी बैठक

**अमरावती/का.प्र.**

'गाव बदलायचं तर नेतृत्व सजग हवं!' या ठाम संकल्पनेने प्रेरित होऊन राष्ट्रीय प्रधान मुखीया सरपंच संघ या देशव्यापी संघटनेची वार्षिक राष्ट्रीय कार्यकारिणी बैठक नुकतीच नवी दिल्लीतील पुसा गेस्ट हाऊस येथे अत्यंत उत्साही आणि ऐक्यदर्शक वातावरणात संपन्न झाली.



देशभरातील १६ राज्यांतील सरपंच, उपसरपंच व पदाधिकाऱ्यांची सुसंवादपूर्ण उपस्थिती ही या बैठकीची खास वैशिष्ट्य ठरली.उपस्थित नेतृत्वाची ताकद बैठकीस अध्यक्षस्थानी राष्ट्रीय अध्यक्ष ठाकुर चंदन सिंग (बिहार) होते.

वरिष्ठ राष्ट्रीय उपाध्यक्ष राहुल उके (अमरावती, महाराष्ट्र),सचिव रवींद्र यादव (नोएडा),राष्ट्रीय प्रभारी प्रेम साहू (छत्तीसगड),महासचिव मुकेश सकीया (गुजरात),महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रमोद सांगोले,राष्ट्रीय प्रवक्ता गौरव जयराम (उत्तर प्रदेश),संघटक नानकचंद शर्मा,महिला प्रदेशाध्यक्षा कस्तुरीबाई (गुजरात),प्रमोद जोशी व महेंद्र यादव (उत्तराखंड) यांच्यासह अनेक मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

**एकात्मतेचा जागर आणि राज्यस्तरीय सहभाग**

महाराष्ट्र, गोवा, मध्यप्रदेश, तेलंगणा, ओडिशा, छत्तीसगड, झारखंड, जम्मू-काश्मीर, पंजाब, उत्तर प्रदेश, गुजरात, हरियाणा, राजस्थान, बिहार व उत्तराखंड या राज्यांतील प्रदेशाध्यक्ष व पदाधिकारी या बैठकीत उपस्थित होते.राष्ट्रीय अध्यक्ष ठाकुर चंदन सिंग यांच्या हस्ते प्रत्येक प्रदेशाध्यक्षांचा पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

या सन्मान सोहळ्यातून संघटनेतील एकात्मता, आदर व सहभागाची भावना प्रकर्षाने जाणवली.सूत्रसंचालन आणि आभार बैठक व कार्यक्रमाचे ओघवते सूत्रसंचालन राष्ट्रीय प्रवक्ता गौरव जयराम यांनी केले,तर महासचिव मुकेश सकीया यांनी आपल्या मनापासून दिलेल्या शब्दांत उपस्थितांचे आभार मानले.

# विठ्ठलाचे दर्शन झाले स्वस्त

**अमरावती / का.प्र.**

आषाढी एकदशीलपंढरपूरकडे मोठ्या प्रमाणात भाविकांचा ओघ सुरू आहे. भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने एक विशेष योजना सुरू केली आहे. यामध्ये एका गावातून ५० किंवा त्याहून अधिक भाविकांनी एकत्र येऊन बुकिंग केल्यास त्याच गावातून थेट पंढरपूरकडे विशेष बस सोडण्यात येणार आहेत. ही सेवा जिल्ह्यातील कोणत्याही गावासाठी उपलब्ध आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील भाविकांना आधी तालुक्याला किंवा जिल्हा मुख्यालयात जाऊन बस पकडण्याची आवश्यकता राहणार नाही.

आषाढीनिमित्त हजारो भाविक अमरावती जिल्ह्यातील विविध गावांतून पंढरपूरकडे जात असतात. यामुळे या भाविकांच्या सोयीसाठी एसटी महामंडळ सज्ज झाले आहेत. जिल्ह्यातून आषाढी एकादशीनिमित्त १७५ बस सोडण्यात येणार आहेत. मागील वर्षीही महामंडळाने १४८ बस सोडल्या होत्या.जिल्ह्यातील विविध भागांतील हजारो भाविक दरवर्षी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरकडे जात असतात. या भाविकांच्या सोईसाठी एसटी महामंडळ सज्ज झाले आहे. विविध आगारांतून बस सोडण्यात येणार आहे.१७५ बस



आषाढीसाठी जिल्ह्यातून जाणारयंदा भाविकांसाठी एसटी महामंडळाकडून १७५ बस सोडण्यात येणार आहे. परतीच्या प्रवासासाठी देखील बस उपलब्ध असतील.पंढरपूर येथे दर्शन घेतल्यानंतर परतीच्या प्रवासासाठी देखील एसटी महामंडळाकडून जादा बसची व्यवस्था करण्यात आलेली आहे.आषाढी यात्रेला जाणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी एसटी महामंडळाने १५० हून अधिक बसचे नियोजन केले आहे. जादा बस सोडण्यात येणार आहेत.

एकत्र तिकिटाचे बुकिंग असणाऱ्या गावातून थेट एसटी बस पाठविण्याचा निर्णय एसटी महामंडळाने घेतला आहे. यामुळे भाविकांना गावातूनच प्रवासाची सोय उपलब्ध होईल.

पंढरपूरकडे जाण्यासाठी ५० भाविक तयार असतील, तर त्यांच्यासाठी गावातून बससेवा देण्याचा निर्णय एसटी महामंडळाने घेतला आहे. त्यानुसार आषाढीला पंढरपूरा जाणाऱ्या भाविकांना या सुविधेचा लाभ घेता येणार आहे.

# युरियाच्या सेवनामुळे जनावरांना विषबाधा

**अमरावती/ का.प्र.**

बऱ्याचदा पाळीव जनावरे युरिया खातात आणि युरियाच्या सेवनामुळे जनावरांना तीव्र विषबाधा होते आणि त्यांच्या शरीरात अमोनियाची पातळी वाढते. त्यामुळे कधीकधी जनावरांचा मृत्यू देखील होतो. अशा परिस्थितीत पाळीव जनावरे युरियाच्या संपर्कात येऊ नयेत आणि ते सेवन करू नये याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे.

हे लक्षात घेण्यासारखे आहे की बहुतेक शेतकरी शेतीच्या कामात युरियाचा वापर खत म्हणून करतात. त्यामुळे अनेक वेळा जाणूनबुजून किंवा नकळत युरिया पशुखाद्यात मिसळतो. त्याचे सेवन केल्याने प्राण्यांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे अशा परिस्थितीत प्राण्यांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. प्राण्यांमध्ये युरियामुळे होणाऱ्या विषबाधेवर उपचार करण्यासाठी व्हिनेगर म्हणजेच ॲसिटिक ॲसिडचा वापर केला जातो. युरियामुळे होणाऱ्या विषबाधेमुळे प्राण्यांमध्ये अमोनियाची पातळी वाढते. दुसरीकडे, व्हिनेगरमध्ये असलेले असिटिक ॲसिड अमोनियाला निष्क्रिय करते आणि पोटाच्या रुमेन नावाच्या भागात पीएच पातळी कमी करते, ज्यामुळे विषारीपणाचा परिणाम कमी होतो. यामुळेच, युरियामुळे विषारीपणा झाल्यास, प्राण्यांना ५% ॲसिटिक ॲसिड असलेले २ ते ४ लिटर द्रावण दिले जाते. यामुळे विषारीपणाचा परिणाम कमी होतो. प्राण्यांसाठी तयार केलेले अन्न पूर्णपणे युरियामुक्त ठेवावे. तसेच, चारा पिकांना खताचा जास्त डोस देऊ नये. कारण त्याचा प्राण्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो आणि त्यांना युरियामुळे विषारीपणा देखील होऊ शकतो. म्हणून, योग्य प्रक्रियेसह संतुलित प्रमाणात युरिया वापरणे आवश्यक आहे.

## जनता विद्यालयात योग दिन साजरा



**अंजनगाव बारी-**जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय अंजनगाव बारी येथे'आंतरराष्ट्रीय योग दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. योग साधनेचे मूळ उगमस्थान भारत देश आहे आणि ग्रामीण भागापासून ते शहरापर्यंत योगाचे महत्त्व पटवून देणे ही काळाची गरज आहे. जगभरातील अनेक भागांमध्ये या दिवसाचे विशेष महत्त्व आहे

सर्वप्रथम या योग दिनाच्या निमित्ताने मुख्याध्यापक विनोद मुगल यांनी योगा विषयीचे महत्त्व विशद केले. त्यानंतर पर्यवेक्षक गजेंद्र अवघड तसेच शारिरीक शिक्षक रितेश खुळसाम यांनी योगासनाची प्रात्यक्षिके करून दाखविली आणि सोबत सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी योगासनाची प्रात्यक्षिके सादर केली यावेळी सूर्यनमस्कार, प्राणायाम, ध्यान आणि विविध योगासने सादर करण्यात आली. निसर्गरम्य वातावरणात योग दिन संपन्न झाला.

# डॉ.हेडगेवार हॉस्पिटल आणि श्री माहेश्वरी पंचायतच्या विद्यमाने योगदिन

**अमरावती/का.प्र.**

जनकल्याण सेवा संस्था संचालित डॉ.हेडगेवार हॉस्पिटल आणि श्री माहेश्वरी पंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक योग दिन कार्यक्रम, धनराज लेन येथील श्री माहेश्वरी भवनाच्या सुसज्ज आणि भव्य सभागृहात आयोजित करण्यात आला.

श्री माहेश्वरी पंचायतचे अध्यक्ष प्रो.जगदीश कलंत्री,उपाध्यक्ष सुरेश साबू,सचिव नंदकिशोर राठी यांचे स्वागत विश्वस्त आनंद दशपुते , जनकल्याण सेवा संस्थेचे डॉ.हेडगेवार हॉस्पिटलचे प्रकल्प संचालक डॉ.यशोधन बोधनकर



आणि अध्यक्ष अजय श्रॉफ यांनी केले. तर योग प्रशिक्षकांचे स्वागत प्रा.कलंत्री आणि राठी यांनी केले.

प्रास्ताविक डॉ.यशोधन बोधनक, संचालन अनिता कुलकर्णी, आभार प्रो . कलंत्री यांनी मानले. कार्यक्रमाला श्रॉफ, दशपुते, डॉ.बोधनकर , लक्ष्मीकांत गोंडियाजी, खंडेलवालजी, स्वाती दशपुते, डॉ.स्मिता पचीगर, श्री माहेश्वरी पंचायतचे अध्यक्ष प्रो. कलंत्री, साबू, सचिव नंदकिशोर राठी, संजयकुमार सारडा, नितीन सारडा, विजयप्रकाश चांडव, राधेशाम भुतडा, डॉ.नंदकिशोर भुतडा,अशोक जाजू, बिहारीलाल बूब, घनश्याम नावंदर ,प्रकाश पनपालिया, मधुसूदन करवा, विनोद जाजू, डॉ.नंदकिशोर करवा, डॉ.पुरुषोत्तम झंवर, ओमप्रकाश नावंदर, कमलकिशोर सोनी, पूजा तापडिया, राजेंद्रजी सोमाणी, सोनाली राठी, सी.ए.श्याम राठी, सीएडीडी. खंडेलवाल, अजय जोशी, अशोक जाजू, प्रणीत सोनी, प्रमोद करवा, राजश्री सुनील सरोदे, उर्मिला कलंत्री, ज्येष्ठ पत्रकार अशोकभाई जोशी यांच्यासह नागरिक उपस्थित होते. आरोग्यदायी ज्यूस वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली.



# सातरगाव येथे कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून योगदिन साजरा

## शाळा, अंगणवाडी व ग्रामस्थांचा सहभाग

**तिवसा/वार्ताहर**

जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा, सातरगाव येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत स्व. आर. जी. देशमुख कृषी महाविद्यालय, तिवसा येथील रावे (ग्रामीण कृषी कार्यानुभव) अंतर्गत कार्यरत कृषी विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी शाळेतील विद्यार्थी, अंगणवाडीतील बालक, तसेच गावातील नागरिकांनाही आमंत्रित करण्यात आले होते. सर्वांनी मिळून शाळेच्या प्रांगणात योग सत्रात सक्रिय सहभाग घेतला.रावे प्रशिक्षणार्थी मोनीष बावनकर, प्रणय बैगणे, हिमांशु कोंडे, साक्षी भगत आणि रूची अलोने यांनी योगासने, प्राणायाम व सूर्यनमस्काराचे प्रात्यक्षिक घेतले व उपस्थितांना योग्य प्रकारे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी योगाचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांनी सांगितले की, 'योग हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य असून तो शरीर, मन व आत्मा यामध्ये संतुलन निर्माण करतो. योग नियमित केल्याने तणाव कमी होतो, रोगप्रतिकारशक्ती वाढते आणि मानसिक आरोग्य चांगले राहते.'कार्यक्रमात मुख्याध्यापिका रेखा भोजने, तसेच शाळेचे मार्गदर्शक शिक्षक जनार्धन शेंडे, अंगणवाडी सेविका रजनी बेलसरे व माला वढनारे, मदतनीस अल्का गोबरे, मंगला मस्के आणि प्राची काटकर यांनी विद्यार्थ्यांसोबत योग सत्रात सहभाग घेतला. या उपक्रमासाठी प्राचार्य अरूण डहाके, रावे समन्वयक सावन राठी, आणि विस्तार शिक्षण विषयाचे मार्गदर्शक मनोज लुंगे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# भांबोरा गावात कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून योग शिबीर

**तिवसा /वार्ताहर**

तिवसा तालुक्यातील स्व.राजाभाऊ गणेशराव देशमुख कृषी पदवी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत भांबोरा गावात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्ताने विशेष योग शिबिराचे आयोजन केले. 'एक पृथ्वी, एक आरोग्य' या संकल्पनेवर आधारित या शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या शिबिरात विद्यार्थ्यांनी योगाचे शारीरिक व मानसिक फायदे समजावून दिले. त्याचबरोबर त्यांनी विविध योगासनांचे प्रात्यक्षिके करून उपस्थितांना योग्य पद्धतीने योग कसा करावा याचे मार्गदर्शन केले.

गावातील महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिक यांनीही उत्साहाने सहभाग घेतला. शिबिराच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापकांनी विशेष परिश्रम घेतले. गावातील सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले व विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले.

या योग शिबिरामुळे गावकऱ्यांमध्ये योगाबद्दलची जागरूकता वाढली असून, पुढील काळात नियमितपणे योगाचे आयोजन करण्याचा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला.यावेळी पोलिस पाटील भालचंद्र पोल्हाड,जि. प. शिक्षक कंगाले सर,शिक्षिका शूभांगिनी पेठे, गुरुदेव सेवा मंडळ अध्यक्ष भांबोरा मोरेश्वर काळमेघ,वरिष्ठ नागरिक साहेबराव गोरे आणि राजु तिवारी आदी उपस्थित होते.सदर कार्यक्रम कॉलेजचे प्राचार्य अरुण



डहाके, सावन राठी , मनोज लुंगे, गिरीश मेश्राम यांच्या मार्गदर्शनाखाली कॉलेजचे विद्यार्थी सर्वेश सोळंके, सुशील वैद्य, सर्वेश विरुळकर, भूषरा शेख यांनी राबविला.

# बिबट्याची एसआरपीएफ कार्यालयात रात्रीची भ्रमंती

## सीसीटीव्ही कॅमेऱ्यात मुक्त संचार कैद





**अमरावती/प्रतिनिधीः-** येथील वडाळी परिसरातील राज्य राखीव पोलीस दलाच्या (एसआरपीएफ) मुख्य कार्यालयात शनिवारी (दि.२१) रात्री एक बिबट शिरल्याची धक्कादायक घटना घडली. या बिबट्याच्या हालचाली सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्या असून, पहाटेपर्यंत तो इमारतीत फिरत होता. सुदैवाने यावेळी कोणतीही जीवितहानी झाली नाही.

वनविभागाच्या बचाव पथकाला माहिती मिळताच ते तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यावेळी बिबट्या इमारतीत निवांतपणे फिरत असल्याचे आढळले. संपूर्ण इमारत पाहिल्यानंतर हा बिबट्या जवळच्या संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या कुंपण भिंतीवरून उडी मारून विद्यापीठ परिसरातील झुडपांमध्ये पळून गेला, अशी माहिती वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी दिली. वडाळी आणि पोहरा(पान २ वर)


### पोहरा-चिरोडी जंगलात बिबट्यांचे वास्तव्य

वन विभागाच्यानुसार, पोहरा आणि चिरोडीच्या घनदाट जंगलात सुमारे २० बिबटे राहतात. सहसा ते जंगलात उपलब्ध असलेल्या लहान शाकाहारी प्राण्यांची शिकार करतात.मात्र शिकार नसणे किंवा श्वानांचा वास त्यांना शहरी हद्दीत ओढतो. स्वभावाने बिबटे मानवांशी संघर्ष टाळतात.

# प्रेम नाकारले म्हणून जीव घेण्याची धमकी

**अमरावती/प्रतिनिधीः-** प्रेमसंबंध ठेवण्यास नकार दिल्याने २१ वर्षीय तरुणीला जीव घेण्याची धमकी, शिवीगाळ आणि पाठलाग यांना तोंड द्यावे लागले. पण तिने धैर्य दाखवत पोलिसांत तक्रार केली आणि पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपीला अटक केली. ही घटना तिवसा पोलिस स्टेशनच्या हद्दीत घडली आहे. अनिरुद्ध सुभाष झटाले (वय २५, लुंबिनी नगर, तिवसा) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. त्याच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पीडित तरुणी व अनिरुद्ध यांची दोन वर्षांपूर्वी ओळख झाली. सुरुवातीला सर्वकाही सामान्य होते. मोबाईलवर नियमित संवाद होत होता. पण कालांतराने अनिरुद्धने तिच्यावर लग्नाचा दबाव आणण्यास सुरुवात केली. तरुणीने स्पष्ट नकार दिल्यावर त्याने तिचा पाठलाग, वेगवेगळ्या

### मुलीच्या धैर्यामुळे थांबला त्रास



नंबरवरून फोन, मानसिक त्रास सुरू केला. इतकंच नव्हे तर, तू माझ्यासोबत प्रेमसंबंध ठेवले नाहीस तर तुला जिवंत ठेवणार नाही, अशी धक्कादायक धमकी दिली.१६ जून रोजी तर हद्दच झाली. तरुणीच्या नकारानंतर अनिरुद्धने तिला रस्त्यात अडवले, अश्लील भाषेत बोलून शिवीगाळ केली आणि 'मी तुला सोडणार नाही' असे धमकावले. यावेळी तिच्या वडिलांनी हस्तक्षेप केल्यास त्यांनाही ठार मारण्याची धमकी दिली.

या सगळ्या धक्कादायक अनुभवाने त्रासलेल्या तरुणीने अखेर २१ जून रोजी तिवसा पोलिस ठाण्यात धाव घेतली. तिच्या (पान २ वर)

# शहरात वाहतूक शाखेचे आता तीन विभाग

## शिस्तबद्ध वाहतुकीसाठी नवे पाऊल



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील वाहतूक व्यवस्थेला अधिक कार्यक्षम आणि शिस्तबद्ध करण्याच्या दृष्टीने अमरावती पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी मोठा निर्णय घेतला असून वाहतूक शाखेची पुनर्रचना केली आहे. आतापर्यंत पूर्व आणि पश्चिम अशा दोन विभागांमध्ये विभागलेली वाहतूक शाखा आता तीन स्वतंत्र विभागांमध्ये कार्यरत राहणार आहे. विशेष म्हणजे, या तिन्ही विभागांना स्वतंत्र पोलीस निरीक्षक नियुक्त करण्यात आले आहेत. त्यांना सहाय्यक अधिकारी आणि अंमलदारांचाही भक्कम पाठिंबा देण्यात आला आहे. राजापेठ वाहतूक विभागाच्या नेतृत्वाची धुरा पोलीस निरीक्षक प्रवीण वांगे यांच्याकडे देण्यात आली आहे. या विभागात कोतवाली, राजापेठ, खोलापुरी गेट आणि भातकुली पोलीस ठाण्यांचा समावेश आहे. गाडगेनगर वाहतूक विभागाच्या प्रमुख म्हणून पोलीस निरीक्षक रिता उईके यांची नियुक्ती झाली असून, त्यांच्या कार्यक्षेत्रात गाडगेनगर, नागपुरी गेट आणि वलगाव पोलीस ठाणे येतात. फ्रेजरपुरा वाहतूक विभागात पोलीस निरीक्षक ज्योती विल्लेकर यांच्या नेतृत्वात फ्रेजरपुरा विभाग काम करणार असून, फ्रेजरपुरा, नांदगाव पेठ आणि बडनेरा पोलीस ठाणे या विभागात समाविष्ट आहेत. ही बदललेली रचना अमरावती शहराच्या वाढत्या रहदारीचा भार पेलण्यास उपयुक्त ठरेल(पान २ वर)

### मनुष्यबळातही वाढ

या नव्या पुनर्रचनेमध्ये केवळ निरीक्षकच नव्हे, तर सहाय्यक अधिकारी आणि अंमलदार यांचाही समावेश आहे. यामध्ये राजापेठ विभागात दोन अधिकारी, ६० अंमलदार, गाडगेनगर विभागात २ अधिकारी, ४७ अंमलदार व फ्रेजरपुरा विभागात दोन अधिकारी, ३७ अंमलदार वाहतूकीची जबाबदारी सांभाळत आहे.

# विदेशी दारूची वाहतूक करताना रंगेहाथ अटक

## -शेगाव नाका ते कठोरा मार्गावर तस्करी, -३.१६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहरातील शेगाव नाका ते कठोरा मार्गावर परवानगीशिवाय विदेशी दारूची बिनधास्त तस्करी करणाऱ्या इसमाला गुन्हे शाखा युनिट क्र. २ च्या पथकाने गजाआड केले. अटकेतील आरोपीकडून तब्बल ३.१६ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे दारूबाजांच्या गोटात खळबळ उडाली आहे. मनोज उर्फ मनोहर दगडू चौधरी (वय ३८, रा. हनुमान नगर, खोलापुरी गेट, अमरावती) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. या इसमाकडून ३६४ विदेशी मद्याच्या बाटल्या, तसेच एक टाटा झिप चारचाकी वाहनदेखील जप्त करण्यात आले आहे.

२२ जून रोजी गुन्हे शाखेचे पथक शहरात पेट्रोलिंग करत असताना त्यांना माहिती मिळाली की, एक इसम शेगाव नाक्यापासून कठोरा रोडकडे अवैधरीत्या दारूची तस्करी करत आहे. यानंतर गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या (पान २ वर)

### दारूचा माल गोपीचंद भांबोरेचा

पोलिसांनी जेव्हा चौधरीची कसून चौकशी केली, तेव्हा या विदेशी दारूचा माल गोपीचंद भांबोरे याचा असल्याचे उघड झाले. त्यामुळे आता चौधरीसोबतच भांबोरे याच्याविरोधातही महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गाडगेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, कल्पना बारवकर, सागर पाटील व सहाय्यक आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पोनि संदीप चव्हाण, एपीआय महेश इंगोले, तसेच पोलिस कर्मचारी संजय वानखडे, दीपक सुंदरकर, गजानन ढेवले, मनोज ठोसर, आस्तिक देशमुख, मंगेश शिंदे, विशाल वाकपांजर, सागर ठाकरे, योगेश पवार, राजीक रायलीवाले, संदीप खंडारे, चेतन शर्मा आणि राहुल दुधे यांनी केली.

# मोटर सायकल चोरटा जेरबंद



**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोटर सायकल चोराला पकडण्यात मोर्शी पोलिसांनी यश प्राप्त केले.पोलीस स्टेशन मोर्शी येथे दि. १९ जुन २०२५ रोजी फिर्यादी नामे अविनाश नारायणराव ठाकरे (वय ६३ वर्षे,रा.दिपकॉलनी मोर्शी) यांनी तक्रार दाखल केली की दि. १८ जुन २०२५ रोजी दुपारी २.३० वाजताचे दरम्यान त्यांना आयसीआयसीआय बँकेमध्ये काम असल्याने ते त्यांच्या मालकीची होंडा ॲक्टीव्हा कंपनीची मोपेड गाडी क्र.एम.एच २७ बि.वाय ६२२८ ने गेले असता त्यांनी त्यांची मोटर सायकल बँकेसमोर उभी केली होती. त्यांचे काम करून ते १० ते १५ मिनिटामध्ये परत आले असता त्यांना त्यांनी लावलेली त्यांची मोटर सायकल दिसुन आली नाही.त्यांनी त्यांच्या मोटर सायकलचा शोध घेतला असता मिळुन आली नाही. ती कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.या अनुषंगाने पोलीस स्टेशनला अपराध क्र. ३३७/२०२५ कलम ३०३(२) भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद करून तपासात घेतला.मोशीचे ठाणेदार नितीन देशमुख यांनी त्यांचे अधिनस्त गुन्हे प्रकटीकरण पथक यांना सदर गुन्हयाचा (पान २ वर)


### २५ ला पीपल्स रिपब्लिकन पार्टीची

# जळगाव येथे राज्य कार्यकारिणीची बैठक

**अमरावती/प्रतिनिधीः-** पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या राज्य कार्यकारणीची महत्त्वपूर्ण बैठक येत्या बुधवार दि.२५ जून २०२५ रोजी जळगाव (खान्देश) येथे आयोजित करण्यात आली आहे. पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी खासदार प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली जळगाव येथील रेल्वे स्टेशन जवळ असलेल्या हॉटेल सिल्वर पॅलेस येथे दुपारी १ वाजता बैठक घेण्यात येणार आहे. पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा महाराष्ट्र लघु - उद्योग विकास महामंडळाचे उपाध्यक्ष जयदीप कवाडे, पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश प्रभारी समाजभूषण गोपाळराव आटोटे (गुरुजी) यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित बैठकीच्या अध्यक्षस्थानी पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष गणेश उनवणे हे असतील. सदर बैठकीमध्ये सामाजिक ,धार्मिक व राजकीय विविध अशा ज्वलंत प्रश्नांसह आगामी काळात होऊ घातलेल्या स्थानिक(पान २ वर)

# टाकरखेडा संभू ते आष्टी रस्त्यावर बंगाली काटेरी झाडे

### -अपघाताला निमंत्रण



**टाकरखेडा संभू / प्रतिनिधीः-**टाकरखेडा संभू ते आष्टी मार्गावरील मुख्य रस्त्यावर गेल्या अनेक वर्षांपासून दुरुस्तीचा अभाव असून रस्ता खड्ड्यांमुळे आधीच धोकादायक बनला आहे. या खराब रस्त्याच्या समस्येत आता आणखी भर पडली आहे. बंगाली काटे नावाच्या काटेरी झाडांची वाढ इतकी झाली आहे की काही ठिकाणी ती थेट रस्त्यावर आलेली आहेत.या झाडांमुळे वाहनचालकांचे मार्गात अडथळले जात असून अनेक वेळा अपघाताचे प्रसंग निर्माण होत आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी अंधारात या झाडांचे अस्तित्व लक्षात न आल्यास वाहनचालक थेट झाडांवर आदळू शकतात. त्यामुळे या मार्गावरून प्रवास (पान २ वर)

# श्री विठोबा संस्थान सावंगाचे विश्वस्तपदी प्रविण कुकडकर



**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** तालुक्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आणि कापुराची यात्रा म्हणून ओळख असलेल्या सावंगा विठोबा येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे दि.२१ जुन २०२५ रोजी विश्वस्त मंडळाची सामान्य सभा संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. संस्थानचे विश्वस्त स्व. अनिल बेलसरे यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या पदावर प्रविण नानाजी कुकडकर यांची बहुमताने निवड करण्यात आली.या निवडीमुळे ग्रामस्थ आणि संस्थान भक्तांतून समाधान व्यक्त होत आहे. नियुक्ती (पान २ वर)

# जनावरांची कत्तल करून गोमास विक्री

### मोर्शी पोलिसांनी धाड टाकून केली कारवाई

**मोर्शी/प्रतिनिधीः-**अवैध गोमास विक्रीचा गोरखधंदा सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाल्याच्या आधारे दि.२० जून रोजी मोर्शी पोलिसांनी पेठपुरा परिसरात धाड टाकून गोवंश जनावरांच्या मासांचे तुकडे व कातडे इतर साहित्य मिळून जवळपास ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केले. पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार न्याज अहेमद मोहम्मद हनिफ रा.मोर्शी यांचे राहते घरी गोवंश जनावरांची कत्तल करून अवैधरित्या गोमास विक्री होत असल्याची खात्रीलायक बातमी मिळाल्याने ठाणेदार नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली स्कॉड विभागाचे पोलीस उपनिरीक्षक अमोल बुरुकुल व त्यांच्या अधिनस्त टीमने दि.२० जून रोजी सायंकाळी ५:३० न्याज अहेमद मोहम्मद हनिफ यांच्या घरी धाड टाकून त्यांच्या घराची झडती घेतली असता त्याचे घराचे समोरील खोलीमध्ये अंदाजे ७० किलो वजनाचे मांसाचे तुकडे व १० नग कातडे मिळून आले.त्यास विचारणा केली असता त्याने सदरचे मासाचे तुकडे व कातडे हे विक्रीकरीता त्याने साठवणूक करून ठेवले असल्याचे पंचासमक्ष सांगीतल्याने त्याचे ताब्यातून अंदाजे ७० किलो वजनाच्या मांसाचे तुकडे कि.अं. १४००० रू.गोवंश जनावरांच्या कातड्यांचे १० नग कि.अं. १०००० तसेच गोमास कापण्याच्या साहीत्यासह एकुण २९.२०० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर मांसाचे तुकडे व कातडे हे गोवंश जनावरांचे असल्याचा अभिप्राय पशुधन विकास अधिकारी यांनी दिला.गोवंश(पान २ वर)

# सापडलेली खरेदीखताची कागदपत्रे पोलिस स्टेशनला केली जमा

### युवासेनेच्या जिल्हाप्रमुखांचा प्रामाणिकपणा



**खल्लार/प्रतिनिधीः-** अमरावती वरून भातकुली मार्गे दर्यापूरला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर हे आपल्या गाडीने येत असतांना ओरिजनल खरेदी खत कागदपत्रे रोडवर बेवारस पडलेल्या अवस्थेत त्यांना सापडली. ज्या नागरिकाचे कागदपत्रे असतील त्यांना लवकरात लवकर सुखरूप मिळावे व या कागदपत्राचा कुणीही दुरुपयोग करू नये करिता सर्व महत्त्वाची कामे बाजूला ठेवत ताबडतोब पोलिस स्टेशन दर्यापूर येथे पोहोचून युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांनी कागदपत्रे जमा केली.

या वेळी यांच्या समवेत शिवसेना विधानसभा संघटक बबनराव विल्हेकर, युवासेना शहर प्रमुख रुपेश मोरे, विजय चव्हाण, मोहन खरबडकर, शरद आठवले, विशाल बगाडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# तडीपारीचे आदेश डावलत शस्त्र घेऊन फिरणारे ताब्यात

### गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** तडीपारीचा आदेश मिळूनही शहरात शस्त्र घेऊन मुक्तपणे फिरणाऱ्या दोघांच्या गुन्हे शाखा युनिट २ च्या पथकाने मुसक्या आवळल्या. दोघेही घातक शस्त्रांसह अटकेत असून, त्यांच्यावर विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही कारवाई शुक्रवारी (२१ जून) पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या निर्देशावरून करण्यात आली. दोन्ही आरोपींच्या ताब्यातून पोलिसांनी दोन घातक शस्त्रे जप्त केली असून त्यांची एकूण किंमत सुमारे २ हजार रुपये आहे. फ्रेजरपुरा पोलीस स्टेशन हद्दीतील यशोदानगर स्मशानभूमी परिसरात फिरणाऱ्या महेश कृष्णा खोब्रागडे (वय २२, लुंबिनी नगर) या तडीपार गुन्हेगाराची माहिती मिळाल्यानंतर गुन्हे शाखा युनिट-२ च्या पथकाने तत्काळ कारवाई करत त्याला अटक केली. तो शस्त्रासह असल्याचे निष्पन्न झाले. त्याच्याविरुद्ध फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दुसऱ्या घटनेत, गाडगेनगर पोलिसांच्या हद्दीत असलेल्या विलासनगर स्मशानभूमीत स्वप्नील उर्फ खट्या सुभाष भगत (वय २५, विलासनगर) हा देखील शस्त्र लपवून फिरत (पान २ वर)

# नागपूर महानगर अध्यक्षपदी अनिरुद्ध गुप्ते तर जिल्हाध्यक्षपदी गणेश शिरोळे

### अखिल भारतीय ग्राहक पंचायतची घोषणा



**नागपूर/प्रतिनिधीः-** अखिल भारतीय ग्राहक पंचायत विदर्भ प्रांत उपाध्यक्ष श्रीपाद भट्टलवार यांनी प्रांत कोषाध्यक्ष संजय धर्माधिकारी यांचे प्रमुख उपस्थितीत नागपूर जिल्हा अध्यक्षपदी गणेश शिरोळे तर नागपूर महानगर अध्यक्षपदी अनिरुद्ध गुप्ते यांची घोषणा केली.

सन २०२५ ते २०२८ या तीन वर्षीसाठी ही घोषणा करण्यात आली आहे. याशिवाय महानगर सचिव राजू पुसदेकर तर जिल्हा सचिव प्रकाश भुजाडे यांची पुनश्च निवड करण्यात आली. महानगर उपाध्यक्ष उदय दिवे ,जिल्हा उपाध्यक्ष अरविंद हाडे, 'नरेंद्र कुलकर्णी 'महानगर सहसचिव, जीवन झाडे आणि समीर जोशी, विधी आयाम प्रमुख एड.केतन भोसकर, कोषाध्यक्ष महानगर आणि जिल्हा श्रीपाद हरदास, जिल्हा महिला प्रमुख योगिता बैतुले हिंगणा यांची निवड करण्यात आली. उर्वरित सर्व पदांची यादी(पान २ वर)

# आंदोलनाच्या इशाऱ्याने नगरपालिका प्रशासनाने टाकला मुरुम

### नागरिकांना तात्पुरता दिलासा,सिमेंटचे रस्ते कधी?



**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर नगरपालिका क्षेत्रातील सांगळूदकर नगरात जाणाऱ्या प्रमुख रस्त्यासह पंजाबराव कॉलनी,जागृती कॉलनी ,हिंगणी रस्ता, कोकाटे कॉम्पलेक्स या रस्त्याच्यी अतिशय दयनिय अवस्था झाली आहे. दरम्यान नगरपालिका प्रशासन, खासदार, आमदार यांना कित्येक वेळा या परिसरातील रहिवासी नागरिकांनी निवेदन देऊन सुद्धा या रस्त्याच्या पक्क्या कामासंदर्भात दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी सदर रस्त्यावर मुरूम टाकावा अन्यथा आंदोलन करण्यात येत असा इशारा सामाजिक कार्यकर्ते विक्की होले यांनी नगरपालिका प्रशासनाला दिला होता. सदर आंदोलनाच्या इशाऱ्याचा धसका घेत नगरपालिका प्रशासनाने तात्काळ दुसऱ्याच (पान २ वर)